SPEAK | READ | WRITE



# माय मराठी १
# My Marathi 1

पाठ्यपुस्तक | TEXTBOOK FOR COMMUNICATIVE MARATHI



Suhas Limaye
Jayavant Chunekar

दृकश्राव्य डीव्हीडी सहित
INCLUDING AUDIO-VISUAL DVD

UNIVERSITY OF MUMBAI

सुहास लिमये / Suhas Limaye
जयवंत चुनेकर / Jayavant Chunekar

गिरीषा सावंत टिळक / Girissha Sawant Tilak
मानसी सामंत / Manasi Samant
कृत्तिका भोसले / Kruttika Bhosale

# माय मराठी १
# My Marathi 1

## पाठ्यपुस्तक / Textbook for Communicative Marathi

**संपादक / Editor**
विभा सुराणा / Vibha Surana

**संकल्पना आणि निर्मिती / Concept & Production**
**मुंबई विद्यापीठ**

जर्मन विभाग, मुंबई विद्यापीठ
Department of German, University of Mumbai

प्रकाशन क्रमांक : ६०१ | Publication No.: 601

**ISBN No.: 978-93-84475-07-9**

**First Edition**
13th August 2014 (Birth Anniversary of Acharya Atre)
**पहिली आवृत्ती**
१३ ऑगस्ट २०१४ (आचार्य अत्रे जयंती)

All rights reserved
© 2014 Copyright: Vibha Surana
Department of German, University of Mumbai,
Kalina, Santacruz (East), Mumbai - 400 098.

- **प्रकल्प समन्वयक / Project Co-ordinators**
विभा सुराणा / Vibha Surana
दीपक पवार / Deepak Pawar

- **लेखक / Authors**
सुहास लिमये / Suhas Limaye
जयवंत चुनेकर / Jayavant Chunekar

- **सहलेखक / Co-authors**
गिरीषा सावंत टिळक / Girissha Sawant Tilak
मानसी सामंत / Manasi Samant
कृत्तिका भोसले / Kruttika Bhosale

- **संपादक / Editor**
विभा सुराणा / Vibha Surana

- **संपादकीय मंडळ / Editorial Team**
माधुरी पुरंदरे / Madhuri Purandare
प्र. ना. परांजपे / P. N. Paranjape
मेहेर भूत / Meher Bhoot
सोनाली गुजर / Sonalee Gujar

- **मराठीसाठी तांत्रिक साहाय्य / Technical Support for Marathi**
गुरुनाथ कळमकर / Gurunath Kalamkar

- **सहकार्य / Collaboration**
मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ / Department of Marathi, University of Mumbai
मराठी अभ्यास केंद्र, मुंबई / Marathi Abhyas Kendra, Mumbai
मराठी अभ्यास परिषद, पुणे / Marathi Abhyas Parishad, Pune

- **कला, मांडणी, चित्रे / छायाचित्रे / अक्षर जुळणी**
**Layout Design / Photos / Typesetting**
नागेश सिरसाळ / Nagesh Sirsal, तेजस नेरूरकर / Tejas Nerurkar, सुभाष गोपाळे / Subhash Gopale

- **प्रकाशक / Publisher**
**Granthali**
Woolen Mill Municipal School, Gr. Floor, J.K. Sawant Marg,
Near Yashwant Natya Mandir, Matunga (West), Mumbai - 400 016.
Tel.: 022 2421 6050 / 2430 6624, Email: granthali01@gmail.com/granthali02@gmail.com
Online access link: https://mu.ac.in/mymarathi1
**Textbook, Workbook and 1 Free DVD**

₹ 1250 | $ 25 | € 20

# प्रस्तावना | Preface

*My Marathi* Level 1 is a Marathi textbook for beginners, the first of its kind, prepared using an integrated communicative approach. It is a modest attempt to offer latest language learning tools for Marathi to learners who wish to learn the language systematically and effectively. It teaches how to communicate in Marathi by imparting understanding, speaking, reading as well as writing skills in Marathi, speaking being the focus from day one.

This book addresses a heterogeneous target group of non-native (sic) learners, who wish to learn Marathi as beginners: particularly teen and adult learners, Indian and foreign learners, learners with or without knowledge of the Devnagari script, even learners with prior little/random knowledge of Marathi. Hence, in each chapter, particularly in the first two chapters there is a variation of difficulty levels. On the one hand there is a thrust on the Marathi alphabet and on the other communicative situations are introduced from the beginning with pattern drills and conversations for oral practice for all. Learners knowing the Devnagari script can right away begin not only speaking but also reading and writing. Learners not knowing the script can start with learning it for about initial 20 hours, during which they simultaneously learn how to speak and introduce themselves in Marathi. The intermittent tests address the medium difficulty level.

Using the integrated communicative approach, the My Marathi Level 1 textbook consists of units such as communicative texts, pattern drills (saraav), grammar, vocabulary overview, 'do and learn' exercises, learning games, idioms and proverbs, poems and songs,cartoons, audio and audio visual components and self evaluation in all chapters.

The textbook is to be used along with the free audio and audio-visual DVD attached to it as well as the Communicative Marathi Level 1 workbook, which consists of exercises for each chapter as well as regular tests, answer-keys and a comprehensive chapter-wise glossary.

The entire Communicative Marathi Level 1 Course is designed for approximately 120 teaching hours. So the teacher may take about 12 hours for each chapter. Though enough exercises and tests have been given, the teacher is expected to give not only dictation regularly but also more exercises and tests as per requirement. The learners are advised to learn the nouns along with their gender as well as singular and plural forms in order to learn to speak correct Marathi.

Though the book is meant for classroom teaching, self learners too can make use of it with the help of the comprehensive glossary given at the end of the workbook. The first two chapters of the glossary also contain the pronunciation of the script in the International Phonetic Alphabet (IPA). The IPA would be useful for learners not knowing the Devanagri script used for Marathi.

The audio-visual DVD at the end comes free with the book and is meant purely for educational purpose. It consists of the audio section and a wide spectrum of av clips from the media which have been collated in accordance with the language proficiency level of the learners. The teachers are expected to use audio-visual material along with specific MCQs and other questions (written & oral).

The teachers using this book are advised to undergo rigorous teachers' training for the integrated communicative approach and may contact the editor for the same.

It has taken two years of sustained intensive work to prepare this material and we are extremely thankful to the entire team for making it happen. We thank each one of them mentioned on the team page. We are particularly grateful to Suhas Limaye, Jaywant Chunekar, Girija Gondhalekar and Rupa Poojary who helped us set the ball rolling for this idea and passion on 8th August 2012. Renowned actor, Aamir Khan helped us transform our dream into reality for which we shall forever remain indebted to him.

Along with the expertise of our Marathi experts, the extensively well-researched and advanced methods, techniques and material of language teaching used to teach German to foreigners have formed the basis of our orientation for which we remain indebted to the discipline DaF (Teaching German as a Foreign Language).

Like German, Marathi too is a rich and old Indo-European Language and similarly requires at least 6 levels of language learning, i.e. 120x6= 720 hours for near native language proficiency. Preparing standardized material for further 5 levels for learning Marathi is a daunting task ahead of us and requires resources. Similarly, teaching of other Indian languages, including Hindi needs to be revolutionized. Such enterprises require expert inputs from diverse domains and substantive funding.

We appeal to all those who believe in our cause to support the project and make it self-sustaining.

We thank the authorities of the University of Mumbai led by the Vice Chancellor, Dr. Rajan Welukar, the Pro Vice Chancellor, Dr. Naresh Chandra, the Registrar, Dr. M.A. Khan and the Finance Officer A.A. Phalnikar for their sustained support.

Vibha Surana
Editor
July 2014

# आभार | Acknowledgement

| **Aamir Khan** | **Nilesh Gupta** |
|---|---|
| *(Chief Donor of the Project)* | *(First Donor of the Project)* |

Abhay Pethe
Abhijeet Ranadive
Alaknanda Kale
Alka Matkar
Ambuja Salgaonkar
Amit Varandekar
Anagha Mandavkar
Anand Katikar
Anvaya Sardesai
Aroon Tikekar
Ashish Sawant
Beena Khemchandani
Bimal Parekh
Biswamohan Pradhan
Dhanashree Dharap
Dhanshree Kavishwar
Dipti Tambe
Gabriele Siebert
Gaurav Dhokle
Girija Gondhalekar
Girish Mehta
Girish Sahasrabuddhe
Harish Kamble
Jose George
Jyotsna Bhide
Kalika Mehta
Kamala Ganesh
Kavita Gawde
Kiran Sawant *(M.U.S.T. Radio)*
Lajwanti Oza
Lata Panchal
Laxmi Mikaelyan
Meena Mohan Desai
Madhura Deshpande
Madhuri Prabhu
Mangesh Karandikar
Manjiri Paranjape
Mihir Kulkarni
Milind Inamdar
Milind Malshe
Nagnath Kotapalle
Namrata Sule
Neeti Badwe
Neha Upadhyaya
Niranjan Javir
Nirupama Joshi
Nitin Nimkar
Pankaj Athavle *(M.U.S.T. Radio)*
Prakash Parab
Prasad Waghmare
Prasanna Bhave
Prashant Gharat
Pushkar Sarad
Pushpa Bhave
Pushpalata Rajapure - Tapas
Rajashree Joshi
Rakesh Nanda
Ramji Tiwari
Reshma Paul
Ritika Gondhalekar
Rohini Parulekar
Rohit Kokil
Rupa Poojary
Sakina Khan
Sameedha Gandhi
Sanjay Bhagwat
Sanjay Deshmukh
Satish Bhavsar
Sebastian Griese
Seema Bhalekar
Shafaat Khan
Shalaka Deshmukh
Shivkumar Dhale
Shobhna Nadkarni
Shreya Patwardhan
Shrikant Pathak
Shruti Deorukhkar
Smita Gandhi
Sneha Deuskar
Sonal Kulkarni
Sudarshan Waghmare
Sudesh Hinglaspurkar
Suhasini Kirtikar
Sujata Bansode
Sukanya Kulkarni
Surekha Karode
Surekha Wavhal
Swati Dhoke
Swati Lele
Sylvia Mattauch
Tanmay Sawant
Trupti Salavkar
Tukaram B. Rawal
Urmee Ranade
Veena Sanekar
Vijay Tayde
Vijaya Dev
Vikas Gaitonde
Vikas Paranjape
Vikrant Pathak
Vinayak Durge
Vishal Pawar
Vishwas Tawade

**Permission from copyright holders**

Anil Kalelkar
Asmita Mohite
Charuhas Pandit
Girish Kuber
Keshav Shirsekar
Madhavi Samant
Madhuri Purandare
Prasad Gogate
Raghav Mardhekar
Vidyadhar Amrite

**IPA**

Vivek Bhat

# अनुक्रमणिका


| पाठ | विषय | संवादकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | ओळख | अभिवादन करणे.<br>आपले नाव-गाव आणि व्यवसाय सांगणे व इतरांना त्यांबद्दल विचारणे. आवडता रंग सांगणे.<br>मराठी वर्णमाला वाचणे आणि लिहिणे. सोपे मराठी शब्द वाचणे आणि लिहिणे. | स्वर-स्वरादी<br>व्यंजन<br>स्वरचिन्हे<br>शब्द | काय, कोणता, कुठे<br>अच्छा, टाटा, उद्या भेटू<br>नमस्कार/नमस्ते<br>व्यवसाय, देशांची नावे<br>रंग | 9 |
| २ | मी आणि तुम्ही | स्वतःची मातृभाषा सांगणे आणि इतरांची विचारणे.<br>स्वतःचे राष्ट्रीयत्व सांगणे आणि इतरांचे विचारणे.<br>स्वतःची खुशाली सांगणे आणि इतरांची विचारणे.<br>घरी काय काय करता, हे सांगणे आणि विचारणे.<br>महिने.<br>मराठी वाक्ये वाचणे. | शब्द (श्रुतलेखन)<br>जोडाक्षरे<br>विशेष उच्चार<br>वाक्ये | कोणती, कोण<br>कसा, कशी, कसे<br>भाषा<br>राष्ट्रीयत्व<br>खुशाली<br>महिने<br>शिव्या | 35 |
| ३ | परिचय | संपर्क साधणे.<br>'नाही' म्हणणे.<br>किती वाजले हे विचारणे आणि वेळ सांगणे. | प्रश्न, व्यक्तिवाचक सर्वनामे<br>'असणे' (अनियमित रूप)<br>'नाही'<br>अकारान्त सामान्य नाम (वचन) | कुठले, कुठल्या<br>किती<br>मूलभूत व्यवसाय<br>१ - १२ अंक<br>घड्याळ | 51 |
| ४ | देश आणि छंद | भारताचा नकाशा आणि महत्त्वाची ठिकाणे ओळखणे.<br>स्वतःबद्दल सांगणे आणि इतरांबद्दल विचारणे.<br>स्वतःचा छंद सांगणे आणि इतरांचा विचारणे. | सामान्य वर्तमानकाळ,<br>क्रियापद चालवणे,<br>आकारान्त सामान्य नाम (वचन) | कोणता, कोणती,<br>कोणते, कोणत्या,<br>कुठला, कुठली,<br>कुठले, कुठल्या<br>शहरे, राज्ये, देश<br>व्यवसाय, छंद | 73 |
| ५ | दैनंदिन व्यवहार | स्वतःचा आणि इतरांचा दिनक्रम सांगणे.<br>मराठी वार.<br>दैनंदिन व्यवहारातील गोष्टींविषयी बोलणे.<br>दिवसाच्या वेळा. | सामान्य वर्तमानकाळ (पुढे)<br>अपूर्ण (चालू) वर्तमानकाळ<br>(दोन्हींतील फरक आणि दोन्हींची नकारार्थी रूपे)<br>अपूर्ण (चालू)<br>वर्तमानकाळाची लिखित व बोली भाषेतली रूपे<br>इकारान्त सामान्यनाम (वचन) | दिनक्रम<br>केव्हा/कधी<br>वार<br>१३ - ५० अंक<br>दिवसाच्या वेळा | 93 |

| पाठ | विषय | संवादकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| ६ | आहार | हॉटेलमध्ये ऑर्डर देणे, बिल मागणे.<br>विविध खाद्यपदार्थांविषयी बोलणे व खाद्यपदार्थांचे वर्णन करणे.<br>आपल्या इच्छा व्यक्त करणे<br>इतरांचे वर्णन करणे.<br>एखाद्या प्रसंगाचे वर्णन करणे. | अविकारी विशेषणे<br>द्वितीया चतुर्थी (संप्रदान)<br>सर्वनाम<br>'असणे', 'नसणे'<br>(नियमित रूपे)<br>पण/आणि<br>इकारान्त सामान्यनाम<br>(वचन) | खाद्यपदार्थ<br>हवंय, पाहिजे<br>कळतंय, पटतंय<br>विरुद्धार्थी विशेषणे | 116 |
| ७ | खरेदी | गरज व्यक्त करणे.<br>बाजारात/दुकानात खरेदी करणे.<br>वस्तूंच्या किमती सांगणे आणि विचारणे.<br>वजने आणि मापे. | दर्शक सर्वनामे (एकवचनी आणि अनेकवचनी)<br>नामे (लिंग)<br>एकारान्त, ओकारान्त सामान्यनाम (वचन) | हा, ही, हे, तो, ती, ते<br>किलो, डझन<br>भाज्या, फळे<br>वस्तूंची नावे<br>५१ - १०० अंक | 133 |
| ८ | लक्षात ठेवा | आज्ञा देणे.<br>विनंती करणे.<br>सावध करणे.<br>परवानगी देणे/नाकारणे.<br>आभार मानणे.<br>सूचना देणे.<br>सल्ला मागणे/देणे.<br>मूल्ये | आज्ञार्थी<br>विध्यर्थी क्रियापदे व त्यांची नकारार्थी रूपे<br>विशेषण + पण (मोटेपण) | फिरणे<br>आज्ञा देणे - कर, करा<br>करू नका, करू नकोस<br>कृपया...<br>लवकर, हळू<br>सावकाश, जपून | 149 |
| ९ | कुटुंब | संबंध दाखवणे.<br>स्वतःच्या कुटुंबाबद्दल माहिती सांगणे<br>मालकी हक्क | षष्ठी<br>अप्रत्ययी द्वितीया<br>रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यय<br>संख्यावाचक क्रियाविशेषण अव्यय<br>अकारान्त स्त्रीलिंगी, पुल्लिंगी आणि नपुंसकलिंगी सामान्यनामांची आणि विशेषनामांची सामान्य रूपे | कोणाचा, कोणाची कोणाचे<br>चा, ची, चे, च्या<br>माझा, माझी...<br>हळू, जलद, अनेकदा क्वचित, भरपूर<br>१००च्या पुढील अंक | 168 |
| १० | आनंदाचे प्रसंग | आवडनिवड सांगणे आणि विचारणे.<br>शुभेच्छा देणे.<br>वाढदिवस सांगणे आणि विचारणे.<br>वाढदिवसाचे आमंत्रण करणे.<br>होकार व नकार देणे. | हेतुदर्शक प्रत्यय (-आयला, -आयचा)<br>कालवाचक क्रियाविशेषण अव्यय<br>स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यय | शुभेच्छा<br>नेहमी, हल्ली, आता<br>कधीतरी, कधीच नाही<br>करायचंय, जायचंय...<br>करायला, जायला...<br>मागे, पुढे, वर, खाली<br>जवळ, लांब, मध्ये | 185 |

# IPA - International Phonetic Alphabet

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | आ | इ | ई | उ | ऊ | ए | अॅ | ऐ | ओ | ऑ | औ |
| a | ā | i | ī | u | ū | e | ae | ai | o | ɔ | au |
| [ə] | [a] | [i] | [i:] | [u] | [u:] | [e] | [æ] | [ə͜i] | [o] | [ɒ] | [ə͜u] |

| | | | |
|---|---|---|---|
| अं | अः | ऋ | ऌ |
| am | ah | r | le |
| [əm] | [əh] | [r̩] | [l̩] |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क | ख | ग | घ | ङ |
| ka | kha | ga | gha | na |
| [kə] | [kʰə] | [gə] | [gʰə] | [ŋə] |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| च | छ | ज | झ | ञ |
| ca | cha | ja | jha | ña |
| [tʃə] | [tʃʰə] | [dʒə] | [dʒʰə] | [ɲə] |

| | | |
|---|---|---|
| च | ज | झ |
| tsa | dza | dzha |
| [t̪sə] | [d̪ʒə] | [d̪ʒʰə] |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ट | ठ | ड | ढ | ण |
| ta | tha | da | dha | na |
| [ʈə] | [ʈʰə] | [ɖə] | [ɖʰə] | [ɳə] |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| त | थ | द | ध | न |
| ta | tha | da | dha | na |
| [t̪ə] | [t̪ʰə] | [d̪ə] | [d̪ʰə] | [nə] |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प | फ | ब | भ | म |
| pa | pha | ba | bha | ma |
| [pə] | [pʰə] | [bə] | [bʰə] | [mə] |

| | | | |
|---|---|---|---|
| य | र | ल | व |
| ya | ra | la | va |
| [jə] | [rə] | [lə] | [ʋə] |

| | | |
|---|---|---|
| श | ष | स |
| śa | ṣa | sa |
| [ʃə] | [ʂə] | [sə] |

| | |
|---|---|
| ह | ळ |
| ha | la |
| [hə] | [ɭə] |

| | |
|---|---|
| क्ष | ज्ञ |
| ksa | dnya |
| [kʂə] | [d̪njə] |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | का | कि | की | कु | कू | के | कॅ | कै | को | कॉ | कौ | कं | कः |
| ka | kā | ki | kī | ku | kū | ke | kae | kai | ko | kɔ | kau | kam | kah |
| [kə] | [ka] | [ki] | [ki:] | [ku] | [ku:] | [ke] | [kæ] | [kə͜i] | [ko] | [kɒ] | [kə͜u] | [kəm] | [kəh] |


# ओळख १



## चला, शिकू या...

- अभिवादन करणे
- आपले नाव-गाव आणि व्यवसाय सांगणे व इतरांना त्यांबद्दल विचारणे
- आवडता रंग सांगणे
- मराठी वर्णमाला वाचणे आणि लिहिणे
- सोपे मराठी शब्द आणि वाक्ये वाचणे आणि लिहिणे
- प्रश्नशब्द : काय, कोणता, कुठे

## चला, आपण एकमेकांची ओळख करून घेऊ या.



| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>नमस्कार. माझं नाव नेहा जोशी.<br>आपलं नाव काय?<br>nəməskar. madʒʰə naʊ neha dʒoʃi.<br>aplə naʊ kaj? | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>नमस्कार. माझं नाव नेहा जोशी.<br>nəməskar. madʒʰə naʊ neha dʒoʃi. |
| **शिक्षक/शिक्षिका**<br>आपलं नाव काय?<br><br>आपलं नाव काय?<br>आपलं नाव काय?<br>आपलं नाव काय?<br>आणि आपलं?<br>आणि आपलं?<br>... | **विद्यार्थी/विद्यार्थिनी**<br>नमस्कार. माझं नाव पीटर जॉब्ज.<br>nəməskar. madʒʰə naʊ pi:ʈər ʤɒbdʒ.<br>नमस्कार. माझं नाव...<br>नमस्कार. माझं नाव...<br>नमस्कार. माझं नाव...<br>नमस्कार. माझं नाव...<br>नमस्कार. माझं नाव...<br>... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>नमस्कार. माझं नाव नेहा कदम.<br>आपलं नाव काय?<br>nəməskar. madʒʰə naʊ neha kədəm.<br>aplə naʊ kaj? | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>नमस्कार. माझं नाव नेहा कदम.<br>आपलं नाव काय?<br>nəməskar. madʒʰə naʊ neha kədəm.<br>aplə naʊ kaj? |
| **विद्यार्थी/विद्यार्थिनी**<br>नमस्कार. माझं नाव सारा गोम्स.<br><br>आपलं नाव काय?<br>नमस्कार. माझं नाव...<br>आपलं नाव काय?<br>नमस्कार. माझं नाव...<br>आपलं नाव काय?<br>नमस्कार. माझं नाव...<br>आपलं नाव काय?<br>नमस्कार. माझं नाव...<br>आपलं नाव काय?<br>... | **विद्यार्थी/विद्यार्थिनी**<br>नमस्कार. माझं नाव पीटर डीसुजा.<br>nəməskar. madʒʰə naʊ pi:ʈər disudʒa.<br>आपलं नाव काय?<br>नमस्कार. माझं नाव...<br>आपलं नाव काय?<br>नमस्कार. माझं नाव...<br>आपलं नाव काय?<br>नमस्कार. माझं नाव...<br>आपलं नाव काय?<br>नमस्कार. माझं नाव...<br>आपलं नाव काय?<br>... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>आपण काय करता? (शिक्षिका) | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>मी शिक्षिका आहे. |
| **शिक्षक/शिक्षिका**<br>आपण काय करता? (विद्यार्थी)<br>आपण काय करता? (डॉक्टर)<br>आपण काय करता? (शिक्षिका)<br>आपण काय करता? (विद्यार्थिनी)<br>आपण काय करता? (शिक्षक)<br>आपण काय करता? (इंजिनियर)<br>... | **विद्यार्थी/विद्यार्थिनी**<br>मी विद्यार्थी आहे.<br>मी डॉक्टर आहे.<br>मी शिक्षिका आहे.<br>मी विद्यार्थिनी आहे.<br>मी शिक्षक आहे.<br>मी इंजिनियर आहे.<br>... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>शिक्षिका [ʃikʂika] | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>मी शिक्षिका आहे.<br>आपण काय करता? |
| **शिक्षक/शिक्षिका**<br>विद्यार्थी [ʋidjarʈʰi:]<br>डॉक्टर [dɒkʈər]<br>शिक्षिका [ʃikʂika]<br>विद्यार्थिना [ʋidjarʈʰini:]<br>शिक्षक [ʃikʂək]<br>इंजिनियर [inʤinijər]<br>... | **विद्यार्थी/विद्यार्थिनी**<br>मी विद्यार्थी आहे. आपण काय करता?<br>मी डॉक्टर आहे. आपण काय करता?<br>मी शिक्षिका आहे. आपण काय करता?<br>मी विद्यार्थिनी आहे. आपण काय करता?<br>मी शिक्षक आहे. आपण काय करता?<br>मी इंजिनियर आहे. आपण काय करता?<br>... |

# १ ओळख



- आपलं नाव काय ?
- माझं नाव माधुरी पुरंदरे. मी लेखिका आहे.
- अच्छा, आपणच का माधुरी पुरंदरे! मी आपली लहान मुलांसाठीची पुस्तकं वाचली आहेत. मला आपली पुस्तकं आवडतात.
- धन्यवाद.

## १ उत्तरे देऊ या.




नमस्कार. आपलं नाव काय ? माझं नाव ---------------------------

आणि आपण काय करता ? मी --------------------------- आहे.

## २ प्रश्न विचारू या.

--------------------------- नाव काय ? माझं नाव अमर मटकर.

--------------------------- काय करता ? मी शिक्षक आहे.

संवाद

## ३ रिकाम्या जागी पुढीलपैकी योग्य शब्द लिहू या.

| | | |
|---|---|---|
| नमस्कार/नमस्ते/हॅलो/हाय | आपलं नाव काय ? | माझं नाव.../मी... |
| आपण काय करता ? | मी... आहे. | अच्छा/टाटा/उद्या भेटू/ उद्या भेटू या |

अभिवादन : नमस्कार /--------------/--------------/--------------

प्रश्न : ------------------------------------------------------------

उत्तर : ------------------------------------------------------------

प्रश्न : ------------------------------------------------------------

उत्तर : ------------------------------------------------------------

निरोप घेणे : ------------/--------------/ उद्या भेटू /--------------

४ ऐकू या आणि वाचू या.

**स्वर :-**

# अ आ इ ई

# उ ऊ ए ॲ ऐ

# ओ ऑ औ

# ऋ ऌ

**स्वरादी :-**

# अं अः

ऌ **क्लृप्ती** = युक्ती
या एकाच शब्दात ऌ हा स्वर आहे.

## ५ खालील अक्षरे योग्य क्रमात लावू या.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ 1 | ओ | उ | ई | अॅ | ऊ | अः |
| अं | ऑ | ऐ | इ | औ | आ 2 | ए |

## ६ रिकाम्या जागी योग्य स्वर/स्वरादी लिहू या.

अ आ इ ----- उ ----- ए अॅ ----- ओ ----- औ ----- ॡ अं -----




संवाद

## ७ उत्तरे देऊ या.




तुमचं नाव काय?

माझं नाव --------------------.

तुम्ही काय करता?

--------------- ----------------- आहे.

आणि तुम्ही इथे काय करता?

मी इथे ------------------ शिकतो/शिकते.

## ८ रिकाम्या जागी पुढीलपैकी योग्य शब्द लिहू या.

- नमस्कार/नमस्ते/हॅलो/हाय
- तुमचं नाव काय?
- माझं नाव.../मी...
- तुम्ही काय करता?
- मी... आहे.
- तुम्ही इथे काय करता?
- मी इथे मराठी शिकतेय/शिकतोय.
- अच्छा/टाटा/उद्या भेटू/उद्या भेटू या

अभिवादन : ------------/------------/------------/------------

प्रश्न : तुमचं नाव काय?

उत्तर : ------------------------------------

प्रश्न : ------------------------------------

उत्तर : ------------------------------------

प्रश्न : ------------------------------------

उत्तर : ------------------------------------

निरोप घेणे : ----------/---------------/--------------/------------

उदा. **शिक्षक/शिक्षिका**
नमस्कार. माझं नाव नेहा जोशी.
तुमचं नाव काय?
nəməskar. madʒʰə naʊ neha dʒoʃi.
tumtsə naʊ kaj?

उदा. **शिक्षक/शिक्षिका**
नमस्कार. माझं नाव नेहा जोशी.
nəməskar. madʒʰə naʊ neha dʒoʃi.

**शिक्षक/शिक्षिका**
तुमचं नाव काय?

तुमचं नाव काय?
तुमचं नाव काय?
तुमचं नाव काय?
तुमचं नाव काय?
...

**विद्यार्थी/विद्यार्थिनी**
नमस्कार. माझं नाव पीटर जॉब्ज.
nəməskar. madʒʰə naʊ pi:ʈər dʒɒbdʒ.
नमस्कार. माझं नाव...
नमस्कार. माझं नाव...
नमस्कार. माझं नाव...
नमस्कार. माझं नाव...
...

उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**
नमस्कार. माझं नाव नेहा कदम.
nəməskar. madʒʰə naʊ neha kəd̪əm.
t̪umt̪sə naʊ kaj?

**विद्यार्थी/विद्यार्थिनी**
नमस्कार. माझं नाव सारा गोम्स.
तुमचं नाव काय?
नमस्कार. माझं नाव...
तुमचं नाव काय?
नमस्कार. माझं नाव...
तुमचं नाव काय?
नमस्कार. माझं नाव...
तुमचं नाव काय?
...

उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**
नमस्कार. माझं नाव नेहा कदम.
nəməskar. madʒʰə naʊ neha kəd̪əm.
t̪umt̪sə naʊ kaj?

**विद्यार्थी/विद्यार्थिनी**
नमस्कार. माझं नाव पीटर डिसुजा.
nəməskar. madʒʰə naʊ pi:t̪ər d̪isud̪ʒa.
तुमचं नाव काय?
नमस्कार. माझं नाव...
तुमचं नाव काय?
नमस्कार. माझं नाव...
तुमचं नाव काय?
नमस्कार. माझं नाव...
तुमचं नाव काय?
...

उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**
तुम्ही काय करता?
t̪umʰi: kaj kərt̪a?

**शिक्षक/शिक्षिका**
तुम्ही काय करता? विद्यार्थी [ʊid̪jart̪ʰi:]
तुम्ही काय करता? डॉक्टर [d̪ɒkt̪ər]
तुम्ही काय करता? शिक्षिका [ʃikşika]
तुम्ही काय करता? विद्यार्थिनी [ʊid̪jart̪ʰini:]
तुम्ही काय करता? शिक्षक [ʃikşək]
तुम्ही काय करता? इंजिनियर [indʒinijər]
...

उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**
मी शिक्षिका आहे.
mi: ʃikşika ahe.

**विद्यार्थी/विद्यार्थिनी**
मी विद्यार्थी आहे.
मी डॉक्टर आहे.
मी शिक्षिका आहे.
मी विद्यार्थिनी आहे.
मी शिक्षक आहे.
मी इंजिनियर आहे.
...

उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**
शिक्षिका [ʃikşika]

**शिक्षक/शिक्षिका**
विद्यार्थी [ʊid̪jart̪ʰi:]
डॉक्टर [d̪ɒkt̪ər]
शिक्षिका [ʃikşika]
विद्यार्थिनी [ʊid̪jart̪ʰini:]
शिक्षक [ʃikşək]
इंजिनियर [indʒinijər]
...

उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**
मी शिक्षिका आहे.
तुम्ही काय करता?
mi: ʃikşika ahe.
t̪umʰi: kaj kərt̪a?

**विद्यार्थी/विद्यार्थिनी**
मी विद्यार्थी आहे.
तुम्ही काय करता?
मी डॉक्टर आहे.
तुम्ही काय करता?
मी शिक्षिका आहे.
तुम्ही काय करता?
मी विद्यार्थिनी आहे.
तुम्ही काय करता?
मी शिक्षक आहे.
तुम्ही काय करता?
मी इंजिनियर आहे.
तुम्ही काय करता?
...

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| तुम्ही इथे काय करता ? | मी इथे मराठी शिकतो. |
| t̪umʰi: it̪ʰe kaj kərt̪a? | मी इथे मराठी शिकते. |

| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
|---|---|
| तुम्ही इथे काय करता ? | मी इथे मराठी शिकतो / शिकते. |
| तुम्ही इथे काय करता ? | मी इथे मराठी शिकतो / शिकते. |
| तुम्ही इथे काय करता ? | मी इथे मराठी शिकतो / शिकते. |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| तुम्ही इथे काय करता ? | मी इथे मराठी शिकतो. |
| | मी इथे मराठी शिकते. |

| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
|---|---|
| तुम्ही इथे काय करता ? (मराठी) | मी इथे मराठी शिकतो / शिकते. |
| तुम्ही इथे काय करता ? (मराठी) | मी इथे मराठी शिकतो / शिकते. |
| तुम्ही इथे काय करता ? (हिंदी) | मी इथे हिंदी शिकतो / शिकते. |
| तुम्ही इथे काय करता ? (गुजराती) | मी इथे गुजराती शिकतो / शिकते. |
| तुम्ही इथे काय करता ? (स्पॅनिश) | मी इथे स्पॅनिश शिकतो / शिकते. |
| तुम्ही इथे काय करता ? (जर्मन) | मी इथे जर्मन शिकतो / शिकते. |
| तुम्ही इथे काय करता ? (फ्रेंच) | मी इथे फ्रेंच शिकतो / शिकते. |
| तुम्ही इथे काय करता ? (चिनी) | मी इथे चिनी शिकतो / शिकते. |
| ... | ... |

सराव

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| मराठी | मी इथे मराठी शिकतो. |
| | मी इथे मराठी शिकते. |
| | तुम्ही इथे काय करता ? |

| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
|---|---|
| मराठी | मी इथे मराठी शिकतो / शिकते.<br>तुम्ही इथे काय करता ? |
| हिंदी | मी इथे हिंदी शिकतो / शिकते.<br>तुम्ही इथे काय करता ? |
| गुजराती | मी इथे गुजराती शिकतो / शिकते.<br>तुम्ही इथे काय करता ? |
| स्पॅनिश | मी इथे स्पॅनिश शिकतो / शिकते.<br>तुम्ही इथे काय करता ? |
| जर्मन | मी इथे जर्मन शिकतो / शिकते.<br>तुम्ही इथे काय करता ? |
| फ्रेंच | मी इथे फ्रेंच शिकतो / शिकते.<br>तुम्ही इथे काय करता ? |
| चिनी | मी इथे चिनी शिकतो / शिकते.<br>तुम्ही इथे काय करता ? |
| ... | ... |

९ ऐकू या आणि वाचू या.

**व्यंजने :-**

# क ख ग घ ङ
# च छ ज झ ञ
# ट ठ ड ढ ण
# त थ द ध न
# प फ ब भ म
# य र ल व
# श ष स
# ह ळ क्ष ज्ञ

उच्चार

## १० ऐकू या आणि वाचू या.

| | |
|---|---|
| क | कप, कटकट, कमळ, कळ, कस, पकड |
| ख | खट, खण, मखर, खप, खत, नख |
| ग | गडबड, गड, मग, ढग, नगर, मगर, गज |
| घ | घर, बघ, घन, उघड, घण, घट, घटक |
| च | चल, चरण, चपळ, चलन, वचन, अचल |
| च | चटकन, चळवळ, चटई, चढण, चढ, चमचम, लचक, चळ |
| छ | छत, छमछम, छळ |
| ज | जग, जप, जय, जन, अजब, जनक, गजर, जल, जलद |
| ज | जण, जर, गरज, आज, जवस, जवळ, सहज |
| झ | झलक, झनक |
| झ | झटपट, झटकन, झपझप, झडप, झगमग, झड, झकझक |
| ट | टपटप, पटपट, टणक, लटपट, सटक, गट, सट, वट, अट |
| ठ | ठग, ठणठण, मठ |
| ड | डर, डमडम, दगड, बडबड, सडक, कडक |
| ढ | ढग, चढ, चढण, कढई, कढण, कढत |
| ण | पण, सण, रण, खण, घण, गण, आण, फणस |
| त | तर, तप, मत, गत, तण, तन, तम, तळमळ, आत |
| थ | थर, कथन, रथ, नथ, पथ |
| द | दल, दर, दगड, दम, दगदग |
| ध | धन, धस, धर, धग, धड, धरण |
| न | नळ, नस, नख, नथ, नर, नट, मन, नमन |
| प | पण, पर, पट, कप, आपण, पळ |

उच्चार

| | |
|---|---|
| फ | फळ, फणस, फडफड, फट, फड |
| ब | बस, बघ, बक, बल, बळ, बदक, बडबड |
| भ | भर, भट, भजन, भरभर, मळभ |
| म | मन, मळ, मगर, मखर, गमन, मनन |
| य | यश, यम, यज्ञ, वय, चय, आय, यमन |
| र | रस, रथ, रण, रड, रग, सर, मर, भर, रमण |
| ल | लव, लय, लढ, लड, चल, कल, लवकर |
| व | वन, वय, गवत, नवल, वर, लव |
| श | शपथ, शरण, शहर, शह, यश |
| ष | चषक |
| स | सण, सकल, सतत, सखल |
| ह | हस, कहर, सहल, हर, हल, हळद, हजर |
| ळ | फळ, बळ, नळ, पळ, गळ, कमळ, घळ |
| क्ष | क्षण, पक्ष, रक्षक, भक्षक, अक्षर |
| ज्ञ | यज्ञ |

## ११ उदाहरण पाहू या आणि शब्द पूर्ण करू या.



ट - टपटप



घ - ---ण---ण



छ - ---म---म



झ - ---प---प



प - ---ट---ट



ब - ---ड---ड



व - ---ळ---ळ



स - ---र---र

## १२ मोठ्याने वाचू या आणि लिहू या.

अजब ---------------- कप ----------------

खण ---------------- छत ----------------

झटपट ---------------- ढग ----------------

थरथर ---------------- नमन ----------------

गवत ---------------- लवकर ----------------

तज्ञ ---------------- बदक ----------------



## १३ वाचू या.

अक्षर बदक भर अननस बस पटकन ऊस

उसळ इसम इतर अभय चटई उतर

आई ऐट लप एकदम समई धर

इतर चटकन अमर अंक ओळख

रस आण अनय मन कमळ

उदय कप दम कर

इसम गजर नथ पदर

एकदम रथ उखळ

गड सनई समई



## १४ ऐकू या आणि भरू या.

अ ---- ---- ई, ---- ---- मका,
मी तुझा मामा, दे मला मुका!

---- ---- पतंग आभाळात उडे,
---- ---- ढगांत चांदोमामा दडे,
---- ---- घड्याळ, ---- ---- थवा,

---- ---- हम्मा गोड दूध देते,
---- ---- चिऊ अंगणात येते,
---- ---- भटजी, ---- ---- ससा,

---- ---- कमळ पाण्यावर डुले,
---- ---- बदक तुरुतुरु चाले,
---- ---- गाडी झुकझुक जाई,
बाळ माझे कसे गोड गाणे गाई!

## १५ स्वरचिन्हे.

| | | | |
|---|---|---|---|
| क् + अ = क | क् + आ = का | क् + इ = कि | क् + ई = की |
| क् + उ = कु | क् + ऊ = कू | क् + ए = के | क् + ऐ = कै |
| क् + ओ = को | क् + औ = कौ | क् + ॲ = कॅ | क् + ऑ = कॉ |
| क् + ऋ = कृ | क् + लृ = क्लृ | क् + अ + ं = कं | क् + अ + ः = कः |

## १६ वाचू या.

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | का | कि | की | कु | कू | के | कॅ | कै | को | कॉ | कौ | कं | कः |
| ख | खा | खि | खी | खु | खू | खे | खॅ | खै | खो | खॉ | खौ | खं | खः |
| ग | गा | गि | गी | गु | गू | गे | गॅ | गै | गो | गॉ | गौ | गं | गः |
| घ | घा | घि | घी | घु | घू | घे | घॅ | घै | घो | घॉ | घौ | घं | घः |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| च | चा | चि | ची | चु | चू | चे | चॅ | चै | चो | चॉ | चौ | चं | चः |
| छ | छा | छि | छी | छु | छू | छे | छॅ | छै | छो | छॉ | छौ | छं | छः |
| ज | जा | जि | जी | जु | जू | जे | जॅ | जै | जो | जॉ | जौ | जं | जः |
| झ | झा | झि | झी | झु | झू | झे | झॅ | झै | झो | झॉ | झौ | झं | झः |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ट | टा | टि | टी | टु | टू | टे | टॅ | टै | टो | टॉ | टौ | टं | टः |
| ठ | ठा | ठि | ठी | ठु | ठू | ठे | ठॅ | ठै | ठो | ठॉ | ठौ | ठं | ठः |
| ड | डा | डि | डी | डु | डू | डे | डॅ | डै | डो | डॉ | डौ | डं | डः |
| ढ | ढा | ढि | ढी | ढु | ढू | ढे | ढॅ | ढै | ढो | ढॉ | ढौ | ढं | ढः |
| ण | णा | णि | णी | णु | णू | णे | णॅ | णै | णो | णॉ | णौ | णं | णः |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| त | ता | ति | ती | तु | तू | ते | तॅ | तै | तो | तॉ | तौ | तं | तः |
| थ | था | थि | थी | थु | थू | थे | थॅ | थै | थो | थॉ | थौ | थं | थः |
| द | दा | दि | दी | दु | दू | दे | दॅ | दै | दो | दॉ | दौ | दं | दः |
| ध | धा | धि | धी | धु | धू | धे | धॅ | धै | धो | धॉ | धौ | धं | धः |
| न | ना | नि | नी | नु | नू | ने | नॅ | नै | नो | नॉ | नौ | नं | नः |
| प | पा | पि | पी | पु | पू | पे | पॅ | पै | पो | पॉ | पौ | पं | पः |
| फ | फा | फि | फी | फु | फू | फे | फॅ | फै | फो | फॉ | फौ | फं | फः |
| ब | बा | बि | बी | बु | बू | बे | बॅ | बै | बो | बॉ | बौ | बं | बः |
| भ | भा | भि | भी | भु | भू | भे | भॅ | भै | भो | भॉ | भौ | भं | भः |
| म | मा | मि | मी | मु | मू | मे | मॅ | मै | मो | मॉ | मौ | मं | मः |
| य | या | यि | यी | यु | यू | ये | यॅ | यै | यो | यॉ | यौ | यं | यः |
| र | रा | रि | री | रु | रू | रे | रॅ | रै | रो | रॉ | रौ | रं | रः |
| ल | ला | लि | ली | लु | लू | ले | लॅ | लै | लो | लॉ | लौ | लं | लः |
| व | वा | वि | वी | वु | वू | वे | वॅ | वै | वो | वॉ | वौ | वं | वः |
| श | शा | शि | शी | शु | शू | शे | शॅ | शै | शो | शॉ | शौ | शं | शः |
| ष | षा | षि | षी | षु | षू | षे | षॅ | षै | षो | षॉ | षौ | षं | षः |
| स | सा | सि | सी | सु | सू | से | सॅ | सै | सो | सॉ | सौ | सं | सः |
| ह | हा | हि | ही | हु | हू | हे | हॅ | है | हो | हॉ | हौ | हं | हः |
| ळ | ळा | ळि | ळी | ळु | ळू | ळे | ळॅ | ळै | ळो | ळॉ | ळौ | ळं | ळः |
| क्ष | क्षा | क्षि | क्षी | क्षु | क्षू | क्षे | क्षॅ | क्षै | क्षो | क्षॉ | क्षौ | क्षं | क्षः |
| ज्ञ | ज्ञा | ज्ञि | ज्ञी | ज्ञु | ज्ञू | ज्ञे | ज्ञॅ | ज्ञै | ज्ञो | ज्ञॉ | ज्ञौ | ज्ञं | ज्ञः |

## १७ ऐकू या आणि वर्तुळ (◯) करू या.

**क ख ग घ ङ**

| क | ख | ग | घ |
|---|---|---|---|
| कमळ<br>बाक<br>वाकडा | खण<br>नख<br>साखर | गड<br>मग<br>दगड | घर<br>रेघ<br>वाघरू |

**च छ ज झ ञ**

| च | छ | ज | झ |
|---|---|---|---|
| चहा<br>पंच | छत | जग<br>आजी<br>अजब | झिंगा<br>माझी |

| च | छ | ज | झ |
|---|---|---|---|
| चमचा<br>नाच<br>पाचर | | जमा<br>आवाज<br>गजरा | झरा<br>माझा<br>पाझर |

**ट ठ ड ढ ण**

| ट | ठ | ड | ढ | ण |
|---|---|---|---|---|
| टपालपेटी<br>चटई | ठसा<br>माठ | डमरू<br>डबा | ढग<br>वाढ | कण<br>बाण |

**त थ द ध न**

| त | थ | द | ध | न |
|---|---|---|---|---|
| तलवार<br>तबला | थवा<br>साथ | दरवाजा<br>दगड | धरण<br>धन | नट<br>मन |

**प फ ब भ म**

| प | फ | ब | भ | म |
|---|---|---|---|---|
| पण<br>कप | फणस<br>फळ | बळ<br>बदक | भजन<br>भारत | मन<br>मी |

य र ल व

| य | र | ल | व |
|---|---|---|---|
| यम<br>वय | रवा<br>कर<br>फराळ | लकेर<br>लोकर | वन<br>नाव<br>गवत |

श ष स

| श | ष | स |
|---|---|---|
| यश<br>शहाणपण | खुष<br>षट्कोन | ससा<br>सतत |

ह ळ

| ह | ळ |
|---|---|
| हस<br>सहल | बाळ<br>फळ |

क्ष ज्ञ

| क्ष | ज्ञ |
|---|---|
| कक्ष<br>पक्ष | यज्ञ<br>ज्ञान |



## १८ मोठ्याने वाचू या.

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | जग जग गज | जग गज जग | गज जग जग |
| 2 | चक चक कच | कच चक कच | चक कच चक |
| 3 | टण टण णट | णट टण टण | टण णट टण |
| 4 | ठणठण ठणठण दणदण | ठणठण दणदण ठणठण | दणदण ठणठण ठणठण |
| 5 | दणदण दणदण कणकण | दणदण कणकण दणदण | कणकण दणदण दणदण |
| 6 | ढणढण ढणढण तणतण | ढणढण तणतण ढणढण | तणतण ढणढण ढणढण |
| 7 | दल दल बल | दल बल दल | बल दल दल |
| 8 | भर भर वर | भर वर भर | वर भर भर |
| 9 | वय वय लय | वय लय वय | लय वय वय |
| 10 | फळ फळ बळ | फळ बळ फळ | बळ फळ फळ |




## १९ उत्तरे देऊ या.

1. तुझं नाव काय? माझं नाव सारा.
2. तू काय करतोस? ----------------------
3. तू काय करतेस? ----------------------
4. तू इथे काय करतोस? ------------------
5. तू इथे काय करतेस? ------------------

## २० प्रश्न लिहू या.

1. ---------------------- माझं नाव...
2. ---------------------- मी ... आहे.
3. -------------------- मी इथे मराठी शिकतो.
4. -------------------- मी इथे मराठी शिकते.

## गुळाचा गणपती

हॅलो
हाय
तुझं नाव काय ?
मी सदा झोपे.
तू काय करतोस ?
मी गप्पा मारतो.
मी जेवतो.
मी माश्या मारतो.
मी जेवतो.
मी झोपा काढतो.
मी जेवतो.
मी टिव्ही बघतो.
मी जेवतो.




## २१ रिकाम्या जागी पुढीलपैकी योग्य शब्द लिहू या.

नमस्कार/नमस्ते/हॅलो/हाय | तुझं नाव काय ? | माझं नाव.../मी...

तू काय करतेस / करतोस ? | मी... आहे. | तू इथे काय करतेस / करतोस ?

मी इथे मराठी शिकतेय/ शिकतोय. | अच्छा/टाटा/उद्या भेटू/ उद्या भेटू या

अभिवादन : -------------/------------/-------------/-------------
प्रश्न : ----------------------------------------
उत्तर : ----------------------------------------
प्रश्न : ----------------------------------------
उत्तर : ----------------------------------------
निरोप घेणे : ------------/------------------/---------------/---------------

| | |
|---|---|
| उदा. **शिक्षक/शिक्षिका**<br>तुझं नाव काय ?<br>ṯuḏʒʰə naʊ kaj? | उदा. **शिक्षक/शिक्षिका**<br>हॅलो, माझं नाव नेहा जोशी.<br>hælo, maḏʒʰə naʊ neha ḏʒoʃi. |
| **शिक्षक/शिक्षिका**<br>तुझं नाव काय ?<br>तुझं नाव काय ?<br>तुझं नाव काय ?<br>तुझं नाव काय ?<br>तुझं नाव काय ?<br>... | **विद्यार्थी/विद्यार्थिनी**<br>हॅलो, माझं नाव पीटर जॉब्ज.<br>hælo, maḏʒʰə naʊ pi:ṯər ʤɒbḏʒ.<br>हॅलो, माझं नाव...<br>हॅलो, माझं नाव...<br>हॅलो, माझं नाव...<br>हॅलो, माझं नाव...<br>... |

सराव

उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**
हाय, माझं नाव नेहा कदम.
तुझं नाव काय?
haj, madʒʰə naʋ neha kəd̪əm.
t̪udʒʰə naʋ kaj?

**शिक्षक/शिक्षिका**
हाय, माझं नाव सारा.
तुझं नाव काय?
हाय, माझं नाव...
तुझं नाव काय?
हाय, माझं नाव...
तुझं नाव काय?
हाय, माझं नाव...
तुझं नाव काय?
...

उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**
हाय, माझं नाव नेहा कदम.
तुझं नाव काय?
haj, madʒʰə naʋ neha kəd̪əm.
t̪udʒʰə naʋ kaj?

**विद्यार्थी/विद्यार्थिनी**
हाय, माझं नाव पीटर जॉब्ज.
haj, madʒʰə naʋ pi:ʈər dʒɒbdʒ.
तुझं नाव काय?
हाय, माझं नाव...
तुझं नाव काय?
हाय, माझं नाव...
तुझं नाव काय?
हाय, माझं नाव...
तुझं नाव काय?
...

मी सचिन लेले
मी भावी चेस चॅम्पियन



## आपला / तुमचा / तुझा देश कोणता?


माझा देश भारत (आहे).



माझा देश पाकिस्तान (आहे).


माझा देश भूतान (आहे).


माझा देश चीन (आहे).


माझा देश रशिया (आहे).


माझा देश स्पेन (आहे).

| उदा॰ शिक्षक/शिक्षिका | उदा॰ शिक्षक/शिक्षिका |
|---|---|
| आपला देश कोणता ? (भारत)<br>apla deʃ konta? [bʰarat] | माझा देश भारत आहे.<br>madʒʰa deʃ bʰarat ahe. |

| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
|---|---|
| आपला देश कोणता ? चीन [ʧi:n] | माझा देश चीन (आहे). |
| आपला देश कोणता ? जपान [ʤəpan] | माझा देश जपान (आहे). |
| आपला देश कोणता ? नेपाळ [nepaɭ] | माझा देश नेपाळ (आहे). |
| आपला देश कोणता ? रशिया [rəʃija] | माझा देश रशिया (आहे). |
| आपला देश कोणता ? फ्रान्स [frans] | माझा देश फ्रान्स (आहे). |
| आपला देश कोणता ? इंग्लंड [iŋglənd] | माझा देश इंग्लंड (आहे). |
| आपला देश कोणता ? पोर्तुगाल [portugal] | माझा देश पोर्तुगाल (आहे). |
| आपला देश कोणता ? भूतान [bʰu:tan] | माझा देश भूतान (आहे). |
| आपला देश कोणता ? अमेरिका [əmerika] | माझा देश अमेरिका (आहे). |
| आपला देश कोणता ? अफगाणिस्तान [əfgaɳistan] | माझा देश अफगाणिस्तान (आहे). |
| आपला देश कोणता ? कॅनडा [kænəda] | माझा देश कॅनडा (आहे). |
| आपला देश कोणता ? पाकिस्तान [pakistan] | माझा देश पाकिस्तान (आहे). |
| ... | ... |

| उदा॰ शिक्षक/शिक्षिका | उदा॰ शिक्षक/शिक्षिका |
|---|---|
| तुमचा देश कोणता ? (भारत)<br>tumtsa deʃ konta? [bʰarat] | माझा देश भारत आहे.<br>madʒʰa deʃ bʰarat ahe. |

| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
|---|---|
| तुमचा देश कोणता ? चीन [ʧi:n] | माझा देश चीन (आहे). |
| तुमचा देश कोणता ? जपान [ʤəpan] | माझा देश जपान (आहे). |
| तुमचा देश कोणता ? नेपाळ [nepaɭ] | माझा देश नेपाळ (आहे). |
| तुमचा देश कोणता ? रशिया [rəʃija] | माझा देश रशिया (आहे). |
| तुमचा देश कोणता ? फ्रान्स [frans] | माझा देश फ्रान्स (आहे). |
| तुमचा देश कोणता ? इंग्लंड [iŋglənd] | माझा देश इंग्लंड (आहे). |
| तुमचा देश कोणता ? पोर्तुगाल [portugal] | माझा देश पोर्तुगाल (आहे). |
| तुमचा देश कोणता ? भूतान [bʰu:tan] | माझा देश भूतान (आहे). |
| तुमचा देश कोणता ? अमेरिका [əmerika] | माझा देश अमेरिका (आहे). |
| तुमचा देश कोणता ? अफगाणिस्तान [əfgaɳistan] | माझा देश अफगाणिस्तान (आहे). |
| तुमचा देश कोणता ? कॅनडा [kænəda] | माझा देश कॅनडा (आहे). |
| तुमचा देश कोणता ? पाकिस्तान [pakistan] | माझा देश पाकिस्तान (आहे). |
| ... | ... |



मी हिलरी जाधव.
माझे देश अमेरिका आणि भारत.
आणि तुमचे ? ...

सराव

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>तुझा देश कोणता? (भारत)<br>ṯudʒʰa ḏeʃ konṯa? [bʰarəṯ] | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>माझा देश भारत आहे.<br>तुझा देश कोणता?<br>mad̠ʒʰa ḏeʃ bʰarəṯ ahe.<br>ṯudʒʰa ḏeʃ konṯa? |

| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
|---|---|
| चीन [ʧi:n] | माझा देश चीन (आहे).<br>तुझा देश कोणता? |
| जपान [ʤəpan] | माझा देश जपान (आहे).<br>तुझा देश कोणता? |
| नेपाळ [nepaḻ] | माझा देश नेपाळ (आहे).<br>तुझा देश कोणता? |
| रशिया [rəʃija] | माझा देश रशिया (आहे).<br>तुझा देश कोणता? |
| फ्रान्स [frans] | माझा देश फ्रान्स (आहे).<br>तुझा देश कोणता? |
| इंग्लंड [iŋglənḏ] | माझा देश इंग्लंड (आहे).<br>तुझा देश कोणता? |
| पोर्तुगाल [porṯugal] | माझा देश पोर्तुगाल (आहे).<br>तुझा देश कोणता? |
| भूतान [bʰu:ṯan] | माझा देश भूतान (आहे).<br>तुझा देश कोणता? |
| अमेरिका [əmerika] | माझा देश अमेरिका (आहे).<br>तुझा देश कोणता? |
| अफगाणिस्तान [əfgaṉisṯan] | माझा देश अफगाणिस्तान (आहे).<br>तुझा देश कोणता? |
| कॅनडा [kænəḏa] | माझा देश कॅनडा (आहे).<br>तुझा देश कोणता? |
| पाकिस्तान [pakisṯan] | माझा देश पाकिस्तान (आहे).<br>तुझा देश कोणता? |
| ... | ... |

## २२ वाचू या.






| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>हिरवा<br>[hirʋa] | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>मला हिरवा रंग आवडतो.<br>məla hirʋa rəŋgə aʋəd̪t̪o. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| केशरी [keʃri:] | मला केशरी रंग आवडतो. |
| निळा [niɭa] | मला निळा रंग आवडतो. |
| गुलाबी [gulabi:] | मला गुलाबी रंग आवडतो. |
| पांढरा [panɖʰra] | मला पांढरा रंग आवडतो. |
| तपकिरी [t̪əpkiri:] | मला तपकिरी रंग आवडतो. |
| लाल [lal] | मला लाल रंग आवडतो. |
| काळा [kaɭa] | मला काळा रंग आवडतो. |
| राखाडी [rakʰaɖi:] | मला राखाडी रंग आवडतो. |
| जांभळा [d̪ʒambʰɭa] | मला जांभळा रंग आवडतो. |
| पिवळा [piʋɭa] | मला पिवळा रंग आवडतो. |
| ... | ... |

## २३ ऐकू या.

नदी पिवळी, झाडं जांभळी
लाल डोंगर, वाट निळी!
पांढरं आकाश अन् हिरवा ढग?
जगावेगळं रंगांचं जग.



## २४ वाचू या.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ | | क् + अ | क | कप |
| आ | ा | छ् + ा | छा | छान |
| इ | ि | द् + ि | दि | दिवस |
| ई | ी | ह् + ी | ही | बहीण |
| उ | ु | क् + ु | कु | कुलूप |
| ऊ | ू | फ् + ू | फू | फूल |
| ए | े | ख् + े | खे | खेळ |
| ॲ | ॅ | ब् + ॅ | बॅ | बॅट, हॅट |
| ऐ | ै | प् + ै | पै | पैसे |
| ओ | ो | म् + ो | मो | मोदक |
| ऑ | ॉ | ह् + ॉ | हॉ | हॉल |
| औ | ौ | ह् + ौ | हौ | हौस |
| अं | ं | प् + ं | पं | पंख |
| अ: | : | त् + : | त: | अंत:करण |
| ऋ | ऋ | न् + ृ | नृ | नृप, नृत्य |

सराव

उच्चार

उच्चार

## २५ मिळत्याजुळत्या उच्चारांचे शब्द शोधू या.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| वैरी | जंमत | घोडा | लोकर | काख | |
| कान | नाच | खोके | केस | खेळ | |
| डोके | चोर | पान | पीठ | राख | |
| टिळा | छाया | मीठ | नाग | मोर | |
| राग | हार | बॉल | काच | गार | माया |
| हॉल | कैरी | भेळ | बॅट | गंमत | |
| जोडा | नोकर | खिळा | कॅट | फेस | |

## २६ ऐकू या.

**'ट' ला 'ट'**

'ट' ला 'ट'
'धी' ला 'धी'
मी खातो भाकर साधी.



'ट' ला 'ट'
'डू' ला 'डू'
तुम्ही खा सगळे लाडू.

'ट' ला 'ट'
'जी' ला 'जी'
मी खातो पालेभाजी.



'ट' ला 'ट'
'री' ला 'री'
तुम्ही खा श्रीखंडपुरी.

'ट' ला 'ट'
'ठी' ला 'ठी'
या आतां कुस्तीसाठी.

■ विंदा करंदीकर

संवाद




## २७ उत्तरे देऊ या.

तुम्ही कुठे राहता ? ----------------------------------------

तू कुठे राहतोस / राहतेस ? --------------------------------

## २८ शब्द शोधू या.

**आभाळ - पक्षी - साप - नळ - बाबा - एकदम - बटाटा - भाकरी - पतंग - इतिहास - मिटाई - जेवण - औषध - कमळ**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | भा | ळ | हा | से | ए | क | द | म | अ |
| भ | क | जॅ | कृ | का | ह | म | गा | स | ने |
| फ | री | तौ | प | क्षी | ब | ळ | रा | वा | मि |
| रा | जा | तॉ | तं | ग | टा | न | ळ | प | ठा |
| सा | प | ही | ग | दै | टा | ल | क | आ | ई |
| मे | वो | इ | ति | हा | स | ब | रौ | व | ळ |
| दा | औ | ष | ध | दै | झ | ञ | बा | लै | ख |
| तो | हे | जे | व | ण | कै | ऋ | बा | ढ | थ |

## २९ करा आणि शिका.

१. तुम्हाला शिकवलेले प्रश्न वर्गातील इतरांना विचारा आणि त्यांची ओळख करून घ्या.

### दृष्टिक्षेप

**वर्णमाला/मुळाक्षरे**

अ आ इ ई उ ऊ ए अॅ ऐ ओ ऑ औ ऋ ऌ अं अः

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क | ख | ग | घ | ङ |
| च | छ | ज | झ | ञ |
| ट | ठ | ड | ढ | ण |
| त | थ | द | ध | न |
| प | फ | ब | भ | म |
| य | र | ल | व | |
| श | ष | स | | |
| ह | ळ | | | |
| क्ष | ज्ञ | | | |

शब्द संपदा

करा आणि शिका

दृष्टिक्षेप

## नाम

| | | |
|---|---|---|
| तो / ते शिक्षक (ते -) | ती / त्या शिक्षिका (त्या -) | ते नाव (ती नावे) |
| तो / ते डॉक्टर (ते -) | ती / त्या डॉक्टरीण (त्या डॉक्टरिणी/ डॉक्टरणी) | ते पुस्तक (ती पुस्तके) |
| तो विद्यार्थी (ते -) | ती विद्यार्थिनी (त्या -) | ते उत्तर (ती उत्तरे) |
| तो इंजिनियर (ते -) | ती इंजिनियर (त्या -) | ते अभिवादन |
| तो रंग (ते -) | ती लेखिका (त्या -) | |
| तो देश (ते -) | ती ओळख (त्या ओळखी) | |
| तो प्रश्न (ते -) | | |
| तो निरोप (ते -) | | |

| सर्वनाम | क्रियापद | शिष्टाचार शब्द | प्रश्नशब्द | इतर शब्द |
|---|---|---|---|---|
| मी | शिकणे | नमस्कार | काय | इथे |
| तू | राहणे | अच्छा | कोणता | |
| तुम्ही | करणे | टाटा | कुठे | |
| आपण | असणे | बरं | | |
| माझं / माझा | आवडणे | उद्या भेटू / भेटू या | | |
| आपलं / आपला | ऐकणे | | | |
| तुमचं / तुमचा | वाचणे | | | |
| | शोधणे | | | |
| | विचारणे | | | |

## आता मला हे येतं.

**अभिवादन करणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**आपले नाव-गाव आणि व्यवसाय सांगणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**इतरांना त्यांचे नाव-गाव आणि व्यवसाय विचारणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**आवडता रंग सांगणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**मराठी वर्णमाला वाचणे आणि लिहिणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**सोपे मराठी शब्द आणि वाक्ये वाचणे आणि लिहिणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**प्रश्नशब्द : काय, कोणता, कुठे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी



# मी आणि तुम्ही २




## चला, शिकू या...

- स्वतःची मातृभाषा सांगणे आणि इतरांची विचारणे
- स्वतःचे राष्ट्रीयत्व सांगणे आणि इतरांचे विचारणे
- स्वतःची खुशाली सांगणे आणि इतरांची विचारणे
- घरी काय काय करता, हे सांगणे आणि विचारणे
- महिने
- मराठी वाक्ये वाचणे
- प्रश्नशब्द : कोणती, कोण, कसा, कशी, कसे

## आपली / तुमची / तुझी मातृभाषा कोणती?

माझी मातृभाषा हिंदी



माझी मातृभाषा इंग्लिश



माझी मातृभाषा नेपाळी



माझी मातृभाषा उर्दू



माझी मातृभाषा जर्मन



माझी मातृभाषा मराठी



माझी मातृभाषा रशियन



माझी मातृभाषा फ्रेंच



| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>मराठी<br>[məraʈʰi] | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>माझी मातृभाषा मराठी आहे.<br>madʒʰi: mat̪rbʰaʂa məraʈʰi: ahe. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| स्पॅनिश [spæniʃ] | माझी मातृभाषा स्पॅनिश आहे. |
| इंग्लिश [iŋgliʃ] | माझी मातृभाषा इंग्लिश आहे. |
| जपानी [ʤəpani:] | माझी मातृभाषा जपानी आहे. |
| नेपाळी [nepaɭi:] | माझी मातृभाषा नेपाळी आहे. |
| फ्रेंच [frenʧ] | माझी मातृभाषा फ्रेंच आहे. |
| जर्मन [ʤərmən] | माझी मातृभाषा जर्मन आहे. |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>आपली मातृभाषा कोणती ? (मराठी)<br>apli: mat̪rbʰaʂa kont̪i:? [məraʈʰi:] | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>माझी मातृभाषा मराठी आहे.<br>आपली मातृभाषा कोणती ?<br>madʒʰi: mat̪rbʰaʂa məraʈʰi: ahe.<br>apli: mat̪rbʰaʂa kont̪i:? |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| स्पॅनिश [spæniʃ] | माझी मातृभाषा स्पॅनिश आहे.<br>आपली मातृभाषा कोणती ? |
| इंग्लिश [iŋgliʃ] | माझी मातृभाषा इंग्लिश आहे.<br>आपली मातृभाषा कोणती ? |
| जपानी [ʤəpani:] | माझी मातृभाषा जपानी आहे.<br>आपली मातृभाषा कोणती ? |
| नेपाळी [nepaɭi:] | माझी मातृभाषा नेपाळी आहे.<br>आपली मातृभाषा कोणती ? |
| फ्रेंच [frenʧ] | माझी मातृभाषा फ्रेंच आहे.<br>आपली मातृभाषा कोणती ? |
| जर्मन [ʤərmən] | माझी मातृभाषा जर्मन आहे.<br>आपली मातृभाषा कोणती ? |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>तुमची मातृभाषा कोणती ? **मराठी** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>माझी मातृभाषा मराठी आहे.<br>तुमची मातृभाषा कोणती ? |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| स्पॅनिश | माझी मातृभाषा स्पॅनिश आहे.<br>तुमची मातृभाषा कोणती ? |
| इंग्लिश | माझी मातृभाषा इंग्लिश आहे.<br>तुमची मातृभाषा कोणती ? |
| जपानी | माझी मातृभाषा जपानी आहे.<br>तुमची मातृभाषा कोणती ? |
| नेपाळी | माझी मातृभाषा नेपाळी आहे.<br>तुमची मातृभाषा कोणती ? |
| फ्रेंच | माझी मातृभाषा फ्रेंच आहे.<br>तुमची मातृभाषा कोणती ? |
| जर्मन | माझी मातृभाषा जर्मन आहे.<br>तुमची मातृभाषा कोणती ? |
| ... | ... |

सराव

| उदा. **शिक्षक/शिक्षिका** | उदा. **शिक्षक/शिक्षिका** |
| --- | --- |
| तुझी मातृभाषा कोणती ? (मराठी)<br>tudʒʰi: matrbʰaʂa konti:? [maratʰi:] | माझी मातृभाषा मराठी आहे.<br>तुझी मातृभाषा कोणती ?<br>madʒʰi: matrbʰaʂa maratʰi: ahe.<br>tudʒʰi: matrbʰaʂa konti:? |

| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| --- | --- |
| स्पॅनिश [spæniʃ] | माझी मातृभाषा स्पॅनिश आहे.<br>तुझी मातृभाषा कोणती ? |
| इंग्लिश [iŋgliʃ] | माझी मातृभाषा इंग्लिश आहे.<br>तुझी मातृभाषा कोणती ? |
| जपानी [dʒapani:] | माझी मातृभाषा जपानी आहे.<br>तुझी मातृभाषा कोणती ? |
| नेपाळी [nepaɭi:] | माझी मातृभाषा नेपाळी आहे.<br>तुझी मातृभाषा कोणती ? |
| फ्रेंच [frentʃ] | माझी मातृभाषा फ्रेंच आहे.<br>तुझी मातृभाषा कोणती ? |
| जर्मन [dʒarman] | माझी मातृभाषा जर्मन आहे.<br>तुझी मातृभाषा कोणती ? |
| ... | ... |

उच्चार

## ९ ऐकू या आणि शब्दांतील रिकाम्या जागा भरू या.

| | | | | |
| --- | --- | --- | --- | --- |
| अननस | क---ळ | ---गर | छा--- | आर--- |
| ---णस | क---ट | ---टा | आ--- | ---न |
| शा--- | ---मणी | ---पयोग | इ---रत | ---र |
| द--- | ---री | ऊ--- | दि---स | बा---ली |
| कु---र | ऊ--- | लु---बुड | आं--- | ---रवा |
| ए---दम | ला--- | ---ळा | | |

## आपण कोण?


मी भारतीय आहे.
मी बांगलादेशी आहे.
मी पाकिस्तानी आहे.
मी नेपाळी आहे.
मी भूतानी आहे.
मी जपानी आहे.
मी म्यानमारी आहे.
मी रशियन आहे.
मी अमेरिकन/ अमेरिकी आहे.
मी ब्रिटिश/ इंग्रज आहे.
मी अफगाणिस्तानी/ अफगाणी आहे.
मी पोर्तुगीज आहे.
मी फ्रेंच आहे.
मी पोलिश आहे.
मी जर्मन आहे.

सराव

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>माझा देश जपान. मी कोण?<br>madʒʰa deʃ ʤəpan. mi: koɳ? | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>मी जपानी आहे.<br>mi: ʤəpani: ahe. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| माझा देश नेपाळ. मी कोण? | मी नेपाळी आहे. mi: nepaɭi: ahe. |
| माझा देश भूतान. मी कोण? | मी भूतानी आहे. mi: bʰu:t̪ani: ahe. |
| माझा देश पाकिस्तान. मी कोण? | मी पाकिस्तानी आहे. mi: pakist̪ani: ahe. |
| माझा देश बांगलादेश. मी कोण? | मी बांगलादेशी आहे. mi: baŋgəlad̪eʃi: ahe. |
| माझा देश म्यानमार. मी कोण? | मी म्यानमारी आहे. mi: mjanmari: ahe. |
| माझा देश रशिया. मी कोण? | मी रशियन आहे. mi: rəʃijən ahe. |
| माझा देश भारत. मी कोण? | मी भारतीय आहे. mi: bʰarət̪i:jə ahe. |
| माझा देश अफगाणिस्तान. मी कोण? | मी अफगाणी आहे. mi: əfgaɳi: ahe. |
| माझा देश अमेरिका. मी कोण? | मी अमेरिकी आहे. mi: əmeriki: ahe. |
| माझा देश ब्रिटन. मी कोण? | मी इंग्रज आहे. mi: iŋgrəd̪ʒ ahe. |
| माझा देश पोलंड. मी कोण? | मी पोलिश आहे. mi: poliʃ ahe. |
| माझा देश फ्रान्स. मी कोण? | मी फ्रेंच आहे. mi: frenʧ ahe. |
| माझा देश पोर्तुगाल. मी कोण? | मी पोर्तुगीज आहे. mi: port̪ugi:d̪ʒ ahe. |
| माझा देश जर्मनी. मी कोण? | मी जर्मन आहे. mi: ʤərmən ahe. |
| ... | ... |

उच्चार

## जोडाक्षरे शिकू या.



च् + च = कच्चा




ख् + ख = लख्ख



ट् + ट = अट्टल



क् + क = पक्का



ज् + ज = सज्ज

ग् + ग = रग्गड

ठ् + ठ = मठ्ठ

## २ याचप्रमाणे आता आपण लिहू या.

| |
|---|
| क् + क = अक्कल |
| -------- + -------- = अत्तर |
| -------- + --------- = चप्पल |
| -------- + -------- = अव्वल |
| -------- + -------- = अय्या |
| -------- + -------- = सल्ला |

| | |
|---|---|
| त् + य = त्य | सत्य |
| ड् + य = ड्य | घड्याळ |
| द् + य = द्य | विद्या |
| ळ् + य = ळ्य | पोळ्या |
| स् + ट = स्ट | पोस्ट |
| म् + ह = म्ह | म्हण |
| स् + त = स्त | रस्ता |






## ३ याचप्रमाणे आता आपण लिहू या.

| |
|---|
| क् + य = वाक्य |
| --- + --- = डॉक्टर |
| --- + --- = स्वर |
| --- + --- = पुस्तक |
| --- + --- = शब्द |



| | |
|---|---|
| क् + र = क्र | क्रम |
| म् + र = म्र | नम्र |
| ट् + र = ट्र | ट्रक |
| ड् + र = ड्र | ड्रम |
| त् + र = त्र | पत्र |
| र् + ष् = र्ष | वर्ष |
| र् + य = र्य | सूर्य |
| र् + य = ऱ्य | सुऱ्या |




## ४ याचप्रमाणे आता आपण लिहू या.

| |
|---|
| त् + र = मित्र |
| --- + --- = ग्रह |
| --- + --- = बर्फ |
| --- + --- = कैऱ्या |
| --- + --- = ट्रॅम |




## ५ अक्षरे जोडू या.

| |
|---|
| क् + क = क्क |
| ब् + ब = |
| ग् + ग = |
| द् + द = |
| ण् + ण = |
| य् + य = |
| त् + त = |
| ड् + ड = |
| प् + प = |

| |
|---|
| त् + य = त्य |
| ब् + र = |
| स् + ट = |
| द् + य = |
| म् + ह = |
| झ् + य = |
| त् + र = |
| ड् + य = |
| र् + य = 'ऱ्य'/'र्य' |

## ६ वाचनाचा सराव करू या.

क् - फक्त, फ् - कोफ्ता
ख् - ख्याती, ग् - मग्न, घ् - विघ्न, च् - कच्चा, छ् - छ्या, ज् - राज्य, झ् - माझ्या, ण् - राण्या, त् - सत्तर,
थ् - तथ्य, ध् - मध्य, न् - न्याय, प् - चप्पल, ब् - शब्द, भ् - अभ्यास, य् - अय्या, व् - सव्वा, श् - अवश्य,
ष् - आयुष्य, स् - मस्ती
ङ - वाङ्मय, ट् - कट्टा/कट्‌टा, कट्यार, ठ् - मठ्ठ/मठ्‌ठ, ड् - साड्या, अड्डा/अड्‌डा, ढ् - बलाढ्य,
द् - गद्य/गद्‌य, द्वार/द्‌वार, मुद्दाम/मुद्‌दाम, उद्गार/उद्‌गार, पद्म/पद्‌म, सद्भाव/सद्‌भाव, ल् - सल्ला, उल्हास,
ह् - असह्य, ळ् - कळ्या
ऱ् - सूर्य, सुऱ्या, ट्रक, क्रम, पत्र

उच्चार

## ७ ऐकू या आणि शब्दांतील रिकाम्या जागा भरू या.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| फळ | को----- | -----ती | म----- | वि----- | क----- |
| रा----- | मा----- | रा----- | स-----र | त----- | म----- |
| अव----- | च-----ल | क----- | क-----र | म----- | सा----- |
| बला----- | ग----- | उ-----स | सू----- | | |

संवाद

## चला एकमेकांची खुशाली विचारू या.

नमस्कार कदमकाका, कसे आहात तुम्ही?
मी मजेत आहे बेटा, तू कशी आहेस?
मी एकदम मस्त.



आपण / तुम्ही < कसे आहात? / कशा आहात?

मी बरा/बरी आहे.
मी मस्त आहे.
मी ठणठणीत आहे.
मी मजेत आहे.
मी ठीक आहे.
मी उत्तम आहे.

तू < कसा आहेस? / कशी आहेस?

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| आपण कसे आहात ? | मी बरा आहे. |
| आपण कशा आहात ? | मी बरी आहे. |
| apəɳ kəse ahat̪? | mi: bəra ahe. |
| apəɳ kəʃa ahat̪? | mi: bəri: ahe. |

| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
|---|---|
| आपण कसे / कशा आहात ? मस्त [məst̪ə] | मी मस्त आहे. |
| | आपण कसे / कशा आहात ? |
| मजेत [məʤet̪] | मी मजेत आहे. |
| | आपण कसे / कशा आहात ? |
| उत्तम [ut̪t̪əm] | मी उत्तम आहे. |
| | आपण कसे / कशा आहात ? |
| ठीक [tʰi:k] | मी ठीक आहे. |
| | आपण कसे / कशा आहात ? |
| ठणठणीत [tʰəɳtʰəɳi:t̪] | मी ठणठणीत आहे. |
| | आपण कसे / कशा आहात ? |
| बरा / बरी [bəra / bəri:] | मी बरा / बरी आहे. |
| | आपण कसे / कशा आहात ? |
| ... | ... |

सराव

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| तुम्ही कसे आहात ? | मी बरा आहे. |
| तुम्ही कशा आहात ? | मी बरी आहे. |
| t̪umhi: kəse ahat̪? | mi: bəra ahe. |
| t̪umhi: kəʃa ahat̪? | mi: bəri: ahe. |

| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
|---|---|
| तुम्ही कसे / कशा आहात ? मस्त [məst̪ə] | मी मस्त आहे. |
| | तुम्ही कसे / कशा आहात ? |
| मजेत [məʤet̪] | मी मजेत आहे. |
| | तुम्ही कसे / कशा आहात ? |
| उत्तम [ut̪t̪əm] | मी उत्तम आहे. |
| | तुम्ही कसे / कशा आहात ? |
| ठीक [tʰi:k] | मी ठीक आहे. |
| | तुम्ही कसे / कशा आहात ? |
| ठणठणीत [tʰəɳtʰəɳi:t̪] | मी ठणठणीत आहे. |
| | तुम्ही कसे / कशा आहात ? |
| बरा / बरी [bəra / bəri:] | मी बरा / बरी आहे. |
| | तुम्ही कसे / कशा आहात ? |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा. **शिक्षक/शिक्षिका** | उदा. **शिक्षक/शिक्षिका** |
| तू कसा आहेस ? | मी बरा आहे. |
| तू कशी आहेस ? | मी बरी आहे. |
| tu: kəsa ahes? | mi: bəra ahe. |
| tu: kəʃi: ahes? | mi: bəri: ahe. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| तू कसा / कशी आहेस ? मस्त [məst̪ə] | मी मस्त आहे. |
| | तू कसा / कशी आहेस ? |
| मजेत [mədʒet̪] | मी मजेत आहे. |
| | तू कसा / कशी आहेस ? |
| उत्तम [ut̪t̪əm] | मी उत्तम आहे. |
| | तू कसा / कशी आहेस ? |
| ठीक [ʈʰi:k] | मी ठीक आहे. |
| | तू कसा / कशी आहेस ? |
| ठणठणीत [ʈʰənʈʰəɳi:t̪] | मी ठणठणीत आहे. |
| | तू कसा / कशी आहेस ? |
| बरा / बरी [bəra / bəri:] | मी बरा / बरी आहे. |
| | तू कसा / कशी आहेस ? |
| ... | ... |

## तुम्ही काय करता ?

**तुम्ही दिवसभरात घरी काय काय करता ?**

मी घरी पेपर वाचतो.



मी घरी आराम करते.



मी घरी अभ्यास करते.



मी घरी साफसफाई करते.



मी घरी खेळ खेळतो.



मी घरी स्वयंपाक करतो.



मी पुस्तक वाचते.



मी बुद्धिबळ खेळतो.



मी घरी टी.व्ही. बघतो.



## मोठ्याने वाचू या. तुम्हाला उच्चारात फरक करता येतो का?

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जंगल | जहाज | जेवण | जोडा | चहा | नाच | चंदन | चमचा |
| जग | जड | जीव | जमीन | वाचन | चोर | विचार | चांगला |
| जत्रा | जाळ | राजा | आवाज | चित्र | चांदणे | वचन | चकली |
| जंमत | जाडा | मजा | जोर | चेंगट | काच | चिमणी | चकणा |

बाजारात जा. ताजी भाजी आणा.

जमीन जपा, जंगल जपा, जग जपा, जीवन जपा.

चिंचेवरती चंदू चढला चढता चढता खाली पडला

चटईला टाचणी टोचली

काकांच्या कामाचे कागद काकीने कात्रीने कराकरा कापून कोपऱ्यात कोंबले.



वाचा वाचा
चार चार
चमचा चमचा





| | | | |
|---|---|---|---|
| जरा जरा | फळ | फुटबॉल |
| जग जग | फूल | कॉफी |
| जप जप | फणस | फोटो |



## हा कोणता महिना आहे?

| |
|---|
| जानेवारी |
| फेब्रुवारी |
| मार्च |
| एप्रिल |
| मे |
| जून |
| जुलै |
| ऑगस्ट |
| सप्टेंबर |
| ऑक्टोबर |
| नोव्हेंबर |
| डिसेंबर |

हा महिना कोणता आहे ?

पुढचा महिना कोणता आहे ?



## पुढील वाक्ये वाचू या.

नमस्कार. माझं नाव नेहा जोशी.
आपलं नाव काय ?
मी शिक्षिका आहे.
आपण काय करता ?
... डॉक्टर, इंजिनियर, विद्यार्थी, शिक्षक ...
अच्छा / टाटा / बरं / उद्या भेटू.

तुमचं नाव काय ?
माझं नाव ... आहे. / मी ...
तुम्ही काय करता ?
मी शिक्षिका आहे.
... डॉक्टर, इंजिनियर, विद्यार्थी, शिक्षक ...
तुम्ही इथे काय करता ?
मी इथे मराठी शिकतेय / शिकतोय.

तुझं नाव काय ?
माझं नाव ... आहे. / मी ...
तू काय करतोस / करतेस ?
मी शिक्षिका आहे.
... डॉक्टर, इंजिनियर, विद्यार्थी,
शिक्षक ...
तू इथे काय करतोस / करतेस ?
मी इथे मराठी शिकतोय / शिकतेय.

आपला / तुमचा / तुझा देश कोणता ?
माझा देश भारत (आहे).
माझा देश चीन (आहे).
माझा देश पाकिस्तान (आहे).
माझा देश स्पेन (आहे).
माझा देश रशिया (आहे).
माझा देश भूतान (आहे). ...

आपल्याला / तुम्हाला / तुला कोणता
रंग आवडतो ?
मला काळा रंग आवडतो.
मला लाल रंग आवडतो.
मला पिवळा रंग आवडतो.
मला पांढरा रंग आवडतो.

आपण / तुम्ही कुठे राहता ?
मी मुंबईमध्ये / मुंबईत राहतो / राहते.
मी पुण्यामध्ये / पुण्यात राहतो / राहते.
तू कुठे राहतोस / राहतेस ?
मी अंधेरीमध्ये राहतो / राहते.

बोलताना :
राहायला कुठे असता आपण / तुम्ही ?
राहायला कुठे आहेस तू ?

आपली / तुमची / तुझी मातृभाषा कोणती ?
माझी मातृभाषा हिंदी.
माझी मातृभाषा इंग्रजी.
माझी मातृभाषा उर्दू.
माझी मातृभाषा जर्मन.
माझी मातृभाषा रशियन.
माझी मातृभाषा फ्रेंच.
माझी मातृभाषा नेपाळी.

आपण कोण ?/ आपण कोणत्या देशाचे नागरिक आहात ?

मी भारतीय आहे.
मी बांगलादेशी आहे.
मी पाकिस्तानी आहे.
मी नेपाळीआहे.
मी भूतानी आहे.
मी जपानी आहे.
मी म्यानमारी आहे.
मी रशियन आहे.
मी अमेरिकन / अमेरिकी आहे.
मी ब्रिटिश / इंग्रज आहे.
मी अफगाणिस्तानी / अफगाणी आहे.
मी पोलिश आहे.
मी पोर्तुगीज आहे.
मी फ्रेंच आहे.
मी जर्मन आहे.

तुम्ही कसे / कशा आहात ?
तू कसा आहेस ?
तू कशी आहेस ?

मी बरा / बरी आहे.
मी मस्त आहे.
मी ठणठणीत आहे.
मी मजेत आहे.
मी ठीक आहे.

तुम्ही घरी काय करता ?

मी घरी पेपर वाचतो / वाचते.
मी घरी जेवण बनवतो / बनवते.
मी घरी अभ्यास करतो / करते.
मी घरी झोपतो / झोपते.
मी घरी खेळ खेळतो / खेळते.'

## आता शिव्यासुद्धा...



## ८ जोड्या जुळवा.


| | |
|---|---|
| विद्यापीठ/युनिवर्सिटी | अ.  |
| बँक | ब.  |
| मार्केट | क.  |
| कॉलेज | ड.  |
| शाळा/स्कूल | इ.  |
| मॉल | ई.  |







## वाचू या ... चिंटू.



९ **ऐकू या आणि वाचू या.**

पंढरपूरच्या वेशीवरती
आहे एक छोटी शाळा,
सगळी मुलं लख्ख गोरी,
एक मुलगा कुट्ट काळा!
खूप करतो दंगामस्ती,
खोड्या करण्यात आहे अट्टल,

मास्तर म्हणतात,
''करणार काय?
न जाणो,
असेल विठ्ठल!''

■ विंदा करंदीकर.





## करा आणि शिका.

१. तुम्ही घरी काय काय करता? हावभाव करून तुमच्या सहकाऱ्यांना सांगा आणि त्यांना ओळखायला लावा. पण हे करताना तुम्ही बोलू नका.



## दृष्टिक्षेप.

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो पेपर (ते, -) (ते वृत्तपत्र) | ती मातृभाषा (त्या -) | ते घर (ती घरे) |
| तो स्वयंपाक | ती खुशाली | ते राष्ट्रीयत्व |
| तो अभ्यास | ती साफसफाई | ते उद्यान (ती उद्याने) |
| तो खेळ (ते -) | ती कॉफी (त्या -) | ते पार्क |
| तो महिना (ते महिने) | ती बँक (त्या बँका) | |
| तो टी.व्ही. (ते -) | | |
| तो उच्चार (ते -) | | |
| तो सहकारी (ते -) | | |

| सर्वनाम | क्रियापद | शिष्टाचार शब्द | प्रश्नशब्द |
|---|---|---|---|
| आपली | लिहिणे | बरा / बरी | कोणती |
| तुमची | जोडणे | मस्त | कोण |
| तुझी | झोपणे | ठणठणीत | कसा |
| माझी | खेळणे | मजेत | कशी |
| | | ठीक | कसे |
| | | उत्तम | |

## आता मला हे येतं.

**स्वतःची मातृभाषा सांगणे आणि इतरांची विचारणे.**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**स्वतःचे राष्ट्रीयत्व सांगणे आणि इतरांचे विचारणे.**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**स्वतःची खुशाली सांगणे आणि इतरांची विचारणे.**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी



**घरी काय काय करता, हे विचारणे आणि सांगणे.**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**महिने**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**मराठी वाक्ये वाचणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**प्रश्नशब्द : कोणती, कोण, कसा, कशी, कसे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# परिचय ३



## चला, शिकू या...

- संपर्क साधणे
- १-१२ अंक
- किती वाजले हे विचारणे आणि वेळ सांगणे
- 'नाही' म्हणणे
- प्रश्नशब्द : कुठले, कुठल्या, किती

# ३ परिचय

संवाद

## मराठी वर्गात.

नमस्कार. मी नयना कदम. तुमचं नाव काय ?

हॅलो, माझं नाव सारा मायर.

तुम्ही कुठल्या ?

मी जर्मनीची.

आणि तुमचं नाव काय ?

माझं नाव कबीर खान.

तुम्ही कुठले ?

मी पाकिस्तानचा.

आणि तुम्ही ?

मी रवी गांधी.

तुम्ही कुठले ?

मी भारतीय आहे, गुजरातचा. आणि मॅडम तुम्ही ?

मी पण भारतीय आहे, महाराष्ट्राची. आणि तुम्ही ?

मी कमला राजन.

तुम्ही कुठल्या ?

मी अमेरिकेची.





## आता वर्गात बोलू या.

नमस्ते, माझं नाव ॲना वेबर.

नमस्कार, माझं नाव लॉरेल आमिगोस. तुमचं नाव ?

हॅलो, मी वाय ली...



व्याकरण

## मी भारताचा / भारताची.

थोडक्यात

| तुम्ही कुठ + ले ? | तुम्ही कुठ + ल्या ? |
|---|---|
| मी ------------ चा. | मी ------------ ची. |

**टीप :**

माझं नाव ------------------.

मी -------------------------.

## १ पुढील चित्रांच्या जोड्या लावू या.


क


ख


ग


घ



च

1. काय जोशी, कसे आहात? ठीक आहे.
2. आई, टाटा!
3. सुप्रभात - आता वेळ आहे बातम्यांची.
4. माफ करा हं, चूक झाली.
5. नमस्कार.



| | |
|---|---|
| उदा. **शिक्षक/शिक्षिका**<br>मी इथे मराठी शिकतो / शिकते.<br>तुम्ही इथे काय करता? | उदा. **शिक्षक/शिक्षिका**<br>मी इथे मराठी शिकतो / शिकते. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| भाषा शिकणे | मी इथे भाषा शिकतो / शिकते. |
| गिटार शिकणे | मी इथे गिटार शिकतो / शिकते. |
| नृत्य शिकणे | मी इथे नृत्य शिकतो / शिकते. |
| पुस्तक वाचणे | मी इथे पुस्तक वाचतो / वाचते. |
| व्यापार करणे | मी इथे व्यापार करतो / करते. |
| काम करणे | मी इथे काम करतो / करते. |
| मराठी शिकवणे | मी इथे मराठी शिकवतो / शिकवते. |
| जर्मन शिकवणे | मी इथे जर्मन शिकवतो / शिकवते. |
| इंग्रजी/इंग्लिश शिकवणे | मी इथे इंग्रजी/इंग्लिश शिकवतो / शिकवते. |
| ... | ... |



## तुम्ही काय करता?

तुम्ही सध्या काय करता, लेलेकाका?
मी मराठी शिकवतो.

अजय आणि विजय, तुम्ही काय करता?
आम्ही अभ्यास करतो.

तावडेसाहेब, आपण काय करता?
मी व्यापार करतो.

आपण काय शिकता?
आम्ही गिटार शिकतो.

## सर्वनाम

| एकवचन | अनेकवचन | आदरार्थी |
|---|---|---|
| मी | आम्ही/आपण | आम्ही/आपण |
| तू | तुम्ही/आपण | तुम्ही/आपण |
| तो | ते | ते |
| ती | त्या | त्या |
| ते | ती | - |
| ती + ते<br>तो + ती<br>तो + ते<br>ती + ते | ते | - |



**मी**



**मी** मुंबईमध्ये राहते.

**आम्ही**



**आम्ही** मुंबईमध्ये राहतो.

**आपण**



**आपण** मुंबईत राहतो.

**तू**



**तू** कुठे राहतोस ?
मी मुंबईमध्ये राहतो.

**तुम्ही/आपण**



**तुम्ही/आपण** कुठे राहता ?
आम्ही मुंबईमध्ये राहतो.

**तुम्ही/आपण**



**तुम्ही/आपण** कुठे राहता ?
मी मुंबईमध्ये राहतो

**तो**



**तो** मुंबईमध्ये राहतो.

**ते**



**ते** मुंबईमध्ये राहतात.

**ती**



**ती** कुठे राहते?

**त्या**



**त्या** मुंबईमध्ये राहतात.

**ते**



**ते** आई-बाबांबरोबर राहतं.

**ती**



**ती** आई-बाबांबरोबर राहतात.

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| पीटर | तो |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| पीटर | तो |
| मारिया | ती |
| सारा | ती |
| नेहा आणि सारा | त्या |
| मि. सामंत | ते |
| पीटर आणि जॉन | ते |
| बाळ | ते |
| सौ. खानोलकर | त्या |
| मुले | ती |
| मी आणि मारिया | आम्ही |
| तू आणि पीटर | तुम्ही |

## २ मुंबईत कोण कोण राहतं? सर्वनामे लिहू या.
















| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
|---|---|---|---|---|
| तो | -------------- | -------------- | -------------- | -------------- |

## ३ खालील संवाद ऐकू या आणि वाचू या.

क)

★ नमस्कार मंडळी. कसे आहात आपण सगळे ? मजेत ना ? मी अजय जाधव. पुढचे १५ दिवस मी आपला टूर गाईड आहे. आपण सगळे एकमेकांना आपली ओळख करून देऊ या. किंवा आता आपण एक खेळ खेळू या. मी आता हा चेंडू टाकतो. तुम्ही तो झेला आणि स्वतःबद्दल सांगा. ओ काकू, पकडा चेंडू.

★ मी सुनीता परब. मी प्राध्यापिका आहे. मी मुंबईत राहते. आता मी चेंडू कुठे टाकू ? हं.


★ पकडला ! मी अमोल ओक. मी डॉक्टर आहे. मी पुण्यात राहतो. कॅच.

★ मी स्नेहल देसाई. मी गृहिणी आहे. मी नाशिकमध्ये राहते. मला दोन मुलं आहेत. हा घ्या बॉल.

★ माझं नाव सुनील परब. सुनीता माझी बायको मीपण प्राध्यापक आहे. पकडा.

★ नमस्कार. मी मधुरा साटम. मी नागपुरात राहते. मी बँकेत काम करते. टाकू ? कॅच.

★ मी सुचेता प्रधान. मी इंजिनियर आहे. मी कोल्हापूरला राहते.




ख)

**ट्रेनमधला संवाद**

★ काकी, तुम्ही कुठे उतरणार आहात ?

★ दादरला.

★ हो का ? आणि त्या आजी ? लाल साडी नेसलेल्या ?

★ अहो, मी कसं सांगू ते ? तुम्हीच विचारा.

★ आजी... अहो आजी ! तुम्ही कुठे उतरणार आहात ?

★ मी ? ठाण्याला उतरणार आहे. का ?

★ तुम्ही उतरल्यावर मी तुमच्या जागेवर बसेन.

★ बस ना ! कुठे उतरणार आहेस ?

★ कल्याणला... हसता का काकी ?

★ तू मुंबईची नाही आहेस, हो ना ?

★ तुम्हाला कसं माहीत ?

★ तुझ्या चेहऱ्यावर लिहिलं आहे ते. दादर आलंच. बस इथे.



ग)

**अमेय** : हाय ! मी अमेय. मी इथे नवीन आहे. सी-५२ मध्ये राहतो. मीपण खेळू का ?
**केदार** : हो, ये ना ! चल, तू तिथे फिल्डिंग कर.
**साहिल** : कॅच इट. सही !
**चौकीदार** : सही झेल घेतलास रे.
**चिन्मय** : मस्त कॅच होता. हाय ! मी चिन्मय.
**रोहन** : आणि मी रोहन. मीपण सी विंगमध्ये राहतो.
**अभय** : हाय अमेय ! मी अभय. सही कॅच घेतलास रे तू ! नाही तर हा केदार. नुसता कोंबडी पकडत असतो बघ हा !
**केदार** : ए, कोंबडी काय ! मोठा सचिन तेंडुलकरच समजतो स्वतःला. हाय ! मी केदार.
**चौकीदार** : अरे अरे, काय मस्ती करताय !
**अंकित** : मी अंकित.
**साहिल** : आणि मी साहिल. आणि हा आपल्या सोसायटीतला ख्रिस गेल...
**वैभव** : ए, गप ए ! हाय, अमेय, मी वैभव. आम्ही रोज संध्याकाळी खेळतो. तूपण येत जा.

संवाद

## ४ आता सर्वनामे आणि क्रियापदे ओळखता येतील का?

**काका :** तू कसा आहेस ?
**सुहास :** मी ठीक आहे.
**काका :** आणि प्रिया ? ती कशी आहे ?
**सुहास :** ती मजेत आहे. आम्ही मस्त आहोत.
**सुहास :** तुम्ही कसे आहात, काका ?
**काका :** अरे, मी ठणठणीत आहे.



व्याकरण

## सामान्य वर्तमानकाळ 'असणे'

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी आहे. | आम्ही/आपण आहोत. |
| तू आहेस. | तुम्ही/आपण आहात. |
| तुम्ही/आपण आहात. | तुम्ही/आपण आहात. |
| तो/ती/ते आहे. | ते/त्या/ती आहेत. |

सराव

| | |
|---|---|
| उदा. **शिक्षक/शिक्षिका**<br>मी | उदा. **शिक्षक/शिक्षिका**<br>मी मजेत आहे. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| मी | मी मजेत आहे. |
| आम्ही | आम्ही मजेत आहोत. |
| आपण | आपण मजेत आहोत. |
| तू | तू मजेत आहेस. |
| तुम्ही | तुम्ही मजेत आहात. |
| आपण | आपण मजेत आहात. |
| ... | ... |

## ५ पुढील वाक्ये पूर्ण करू या.

| एकवचन | अनेकवचन |
| --- | --- |
| / मी ठीक आहे. | आम्ही/आपण ठीक ------------ |
| / तू ठीक ------------ | तुम्ही/आपण ठीक ------------ |
| / तुम्ही/आपण ठीक ------------ | तुम्ही/आपण ठीक ------------ |
| / / <br> तो/ती/ते ठीक ------------ | / / <br> ते/त्या/ती ठीक ------------ <br> ते ठीक ------------ |

## ६ चला, सराव करू या.

**(मी, आम्ही, तू, तुम्ही, आपण, तो, ती, ते, त्या)**

१. रोहन विद्यार्थी आहे. तो स्पॅनिश शिकतो.

२. ॲना इंजिनियर आहे. ---------------- चिनी शिकते.

३. थॉमस आणि सँड्रा लंडनला राहतात. ---------------- भाषा शिकतात.

४. सलमा आणि सोनाली काय करतात? ---------------- गिटार शिकतात.

५. अनय आणि रोहन मुले आहेत. ---------------- मातृभाषा शिकतात.

६. ---------------- विद्यार्थिनी आहेस का? नाही, ---------------- शिक्षिका आहे.

७. ---------------- डॉक्टर आहात का? होय, ---------------- डॉक्टर आहे.

८. ---------------- काय शिकतोस? ---------------- फ्रेंच शिकतो.

९. ---------------- काय शिकतेस? ---------------- जर्मन शिकते.

१०. ---------------- काय शिकता? ---------------- इंग्रजी शिकतो.

११. ---------------- सगळे काय शिकतो? ---------------- सगळे मराठी शिकतो.

## आपण कसे/कशा आहात?

तुम्ही कसे आहात? - मी मजेत / बरा आहे.

तुम्ही कशा आहात? - मी मजेत / बरी आहे.




मी --------------- आहे.

उत्तम  मस्त

छान / मजेत  बरा / बरी / ठीक

आणि तुम्ही?

व्याकरण

तुम्ही कसे आहात? आम्ही उत्तम / मस्त / छान / ठीक / मजेत / बरे आहोत.

तुम्ही कसे आहात? आम्ही उत्तम / मस्त / छान / ठीक / मजेत / बरे आहोत.

तुम्ही कशा आहात? आम्ही उत्तम / मस्त / छान / ठीक / मजेत / बऱ्या आहोत.

तू कसा आहेस?

तू कशी आहेस?





| | | | |
|---|---|---|---|
| | **औपचारिक** | तुम्ही/आपण | तुम्ही कसे /कशा आहात? |
| | **अनौपचारिक** | तुम्ही/आपण<br>तू<br>तू<br>तू | काय म्हणताय?<br>तू कसा /कशी आहेस?<br>काय म्हणतोस/म्हणतेस?<br>कसं काय? |

सराव

उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**
मी कसा आहे?

**शिक्षक/शिक्षिका**
मी कसा आहे?
ती कशी आहे?
तू कसा आहेस?
तो कसा आहे?
मी कशी आहे?
ते कसे आहे?
तुम्ही/आपण कसे आहात?
तू कशी आहेस?
...

उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**
आम्ही कसे आहोत?

**विद्यार्थी/विद्यार्थिनी**
आम्ही कसे आहोत?
त्या कशा आहेत?
तुम्ही कसे आहात?
ते कसे आहेत?
आम्ही कशा आहोत?
ती कशी आहेत?
तुम्ही/आपण कसे आहात?
तुम्ही कशा आहात?
...

## ७ वाचू या.



तो टी.व्ही.



ती खुर्ची



ते सफरचंद



तो कॉम्प्युटर



ती बॅग



ते घड्याळ



तो चेंडू



ती गाडी



ते पुस्तक



### सामान्य वर्तमानकाळ 'नसणे'

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी नाही. | आम्ही/आपण नाही. |
| तू नाहीस. | तुम्ही/आपण नाही. |
| तुम्ही/आपण नाही. | तुम्ही/आपण नाही. |
| तो/ती/ते नाही. | ते/त्या/ती नाहीत. |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>मी | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>मी आजारी नाही. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| मी | मी आजारी नाही. |
| आम्ही | आम्ही आजारी नाही. |
| आपण | आपण आजारी नाही. |
| तू | तू आजारी नाहीस. |
| तुम्ही | तुम्ही आजारी नाही. |
| आपण | आपण आजारी नाही. |
| तो | तो आजारी नाही. |
| ते | ते आजारी नाहीत. |
| ती | ती आजारी नाही. |
| त्या | त्या आजारी नाहीत. |
| ते | ते आजारी नाही. |
| ती | ती आजारी नाहीत. |
| ... | ... |

## ८ पुढील वाक्ये पूर्ण करू या.

१. मी मूर्ख नाही.

२. तू मूर्ख ----------------.

३. तुम्ही/आपण मूर्ख ----------------.

४. तो/ती/ते मूर्ख --------------------.

५. आम्ही/आपण मूर्ख -----------------.


६. तुम्ही/आपण मूर्ख ------------------.

७. तुम्ही/आपण मूर्ख ------------------.

८. ते/त्या/ती मूर्ख --------------------.



**अंक.**






## ९ खालील शब्द अंकात लिहू या.

शून्य -------- एक - १ दोन -------- तीन -------- चार -------- पाच --------

सहा ------- सात ------- आठ ------- नऊ ------- दहा ------- अकरा ------- बारा - १२

## १० रिकाम्या जागी अंक भरू या.

क. १ २ ३ --- ५ --- ७ --- ९ --- ११ ---

ख. १२ ११ १० --- ८ --- ६ --- ४ --- २ ---

## ११ खालील अंक शब्दात लिहू या.

१. एक २. ------------- ३. ------------- ४. ------------- ५. -------------

६. ------------- ७. ------------- ८. ------------- ९. ------------- १०. -------------

## १२ बेरीज करू या. (+)

 अधिक +  = ८ आठ

 अधिक +  =

 अधिक +  =

 अधिक +  =

 अधिक +  =

## १३ वजा करू या. (-)

 वजा -  =

 वजा -  =

 वजा -  =

 वजा -  =

 वजा -  =

### खालील संवाद वाचू या.

रमेश : दादा, किती वाजले ?
मोहन : अं... सहा वाजलेयत.
रमेश : धन्यवाद.



### १४ किती वाजले?



क. नऊ    ख. ------------    ग. ------------    घ. ------------    च. ------------

### १५ खालील संवाद ऐकू या आणि वाचू या.





- ★ हॅलो, राणे ? मी तासकर.
- ★ मी पावगी. काय सर ?
- ★ अन्वर कुठे आहे ?
- ★ माहीत नाही, सर.
- ★ त्याच्याकडे मोबाईल आहे ?
- ★ हो, सर.
- ★ नंबर द्या.
- ★ एक मिनिट हं... नऊ-आठ-पाच-तीन-शून्य-चार-तीन-तीन.
- ★ आठच आकडे ?
- ★ आठ नाहीत, सर, दहा आहेत!
- ★ कुठं दहा, पावगी! नऊ-आठ-पाच-तीन-शून्य...
- ★ सर, तीन आणि शून्य नाही. तीन शून्य, म्हणजे तीन वेळा शून्य-चार-तीन तीन... म्हणजे तीन वेळा तीन. दहा आकडे आहेत, सर!
- ★ धन्य आहात तुम्ही, पावगी! एक नंबर सांगताना किती हो घोळ घालता!

## १६ वाचू या.

| नाव | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|
| राणे | २४ ३१ ८५ ६७ |
| मेहता | ३६ ७५ ४४ २१ |
| दास | ६७ ९१ ८५ ३२ |
| डिसूझा | ५६ ४५ ७८ १३ |

**दास यांचा दूरध्वनी क्रमांक वापरून वर्गात संवाद साधू या.**

हॅलो, राणे? ----------------------------------

------------------------------------------

------------------------------------------

------------------------------------------

## आता खालील संवाद वाचू या.



**क.**

**वाघाचा मुखवटा लावलेला लहान मुलगा आणि वाघ यांच्यातील संवादः**

वाघः कोण रे तू?
मुलगाः (डरकाळी फोडून) मी वाघ!
वाघः (आश्चर्याने) हो? मग मी कोण?



**ख.**

- ★ हॅलो! नमस्कार!
- ★ नमस्कार! ... बोला!
- ★ हॅलो!
- ★ हॅलो! अहो बोला, कोण पाहिजे?... काय त्रास आहे! हॅलो! अहो, बोला ना!
- ★ गांधी.
- ★ गांधी? कोण गांधी? इथे कुणी गांधी नाही.
- ★ अं हं! मी, मी गांधी बोलतोय.
- ★ अरे वा! तुम्ही गांधी बोलताय? मग मी आईनस्टाईन बोलतोय. राम राम!



## संवाद वाचू या आणि त्याखालील तक्ता भरू या.

**मानसी** : तुम्ही काय करता?
**योकोता** : मी मराठी शिकतेय.
**मानसी** : हो का? वा वा! तुमची मातृभाषा कोणती?
**योकोता** : जपानी.
**मानसी** : अरे वा... जपानी! मी सध्या जपानी शिकतेय. माझं नाव मानसी, तुमचं नाव काय?
**योकोता** : माझं नाव तानाका. आपलं आडनाव काय?
**मानसी** : माझं आडनाव साठे.
**योकोता** : तुम्ही मुंबईमध्ये राहता का?
**मानसी** : हो. अंधेरीला... तुम्ही मुंबईत कुठे राहता?
**योकोता** : मी सांताक्रूजला राहते.
**मानसी** : बरंय मग, भेटत राहू या. तुम्ही मला जपानी शिकवा.
**योकोता** : आणि तुम्ही मला मराठी! अच्छा, सायोनारा.



## १७ आता खालील तक्ता भरू या.

| आडनाव | नाव | ठिकाण | भाषा |
| --- | --- | --- | --- |
| --------------------- | मानसी | --------------------- | --------------------- |
| --------------------- | --------------------- | --------------------- | --------------------- |

## १८ आपल्या वर्गमित्रांची अशी यादी तयार करू या.

| आडनाव | नाव | ठिकाण | भाषा |
| --- | --- | --- | --- |
| --------------------- | --------------------- | --------------------- | --------------------- |
| --------------------- | --------------------- | --------------------- | --------------------- |
| --------------------- | --------------------- | --------------------- | --------------------- |
| --------------------- | --------------------- | --------------------- | --------------------- |

## १९ ऐकू या.

दुपारचा वाजला एक
आईने केला केक
केक खाण्यात एक तास गेला
आम्ही नाही अभ्यास केला

दुपारचे वाजले दोन
बाबांचा आला फोन
फोनवर बोलण्यात एक तास गेला
आम्ही नाही अभ्यास केला

दुपारचे वाजले तीन
ताईची हरवली पिन
पीन शोधण्यात एक तास गेला
आम्ही नाही अभ्यास केला

दुपारचे वाजले चार
आईने दिला मार
मार खाऊन रडण्यात एक तास गेला
आम्ही नाही अभ्यास केला

संध्याकाळचे वाजले पाच
ताईने केला नाच
नाच बघण्यात एक तास गेला
आम्ही नाही अभ्यास केला

संध्याकाळचे वाजले सहा
आईने केला चहा
चहा पिण्यात एक तास गेला
आम्ही नाही अभ्यास केला

संध्याकाळचे वाजले सात
आईने केला भात
भात खाण्यात एक तास गेला
आम्ही नाही अभ्यास केला

रात्रीचे वाजले आठ
ताईने फोडला माठ
तुकडे उचलण्यात एक तास गेला
आम्ही नाही अभ्यास केला


रात्रीचे वाजले नऊ
घरात शिरली माऊ
माऊ हाकलण्यात एक तास गेला
आम्ही नाही अभ्यास केला

रात्रीचे वाजले दहा
टीव्हीवरची गंमत पहा
टीव्ही बघण्यात एक तास गेला
आम्ही नाही अभ्यास केला

रात्रीचे वाजले अकरा
बिल्डिंगमध्ये शिरला बकरा
बकरा हाकलण्यात एक तास गेला
आम्ही नाही अभ्यास केला

रात्रीचे वाजले बारा
आईचा चढला पारा
तिला शांत करण्यात एक तास गेला
आम्ही नाही अभ्यास केला

## वाचू या ... चिंटू.



## म्हणी / वाक्प्रचार / विशेष प्रयोग



एका दगडात दोन पक्षी.



एका हाताने टाळी वाजत नाही.



एकापेक्षा एक.



एकापरीस दोन भले.



दोनाचे चार हात करणे.



नाकी नऊ येणे.

## २० ऐकू या आणि वाचू या.

मी एक मुंगी हा एक मुंगी,
ती एक मुंगी, तू एक मुंगी,
ही एक मुंगी, ती एक मुंगी,
पाच येथल्या पाच फिरंगी.

■ बा. सी. मर्ढेकर

एक, दोन, तीन, चार
गणपतीचा जयजयकार.
पाच, सहा, सात, आठ
गणपतीला सोन्याचा पाट.
नऊ, दहा, अकरा, बारा
गणपतीच्या मुकुटात मोत्यांचा तुरा...

दहा चिमण्या चिव चिव चिव,
एक गेली उडून, राहिल्या किती ?
नऊ.
नऊ चिमण्या चिव चिव चिव,
एक गेली उडून, राहिल्या किती ?
आठ चिमण्या...

करा आणि शिका

## करा आणि शिका.

१. आपल्या वर्गमित्रांची, शिक्षकांची, मराठी मित्र-मैत्रिणींची मुलाखत घ्या.

२. वर्गातील/घरातील व्यक्ती, खुर्च्या, टेबले, पंखे, दिवे इ. मोजा.

३. दोन गटांमधील खेळ - एका गटाने दुसऱ्या गटाला १ ते १२ मधल्या दोन अंकांची बेरीज किंवा वजाबाकी करायला सांगावी.

## अकारान्त नामे

### पुल्लिंगी सामान्य नामे

**अ - अ**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| तो वर्ग | ते वर्ग |
| तो देश | ते देश |
| तो शिक्षक | ते शिक्षक |
| तो डॉक्टर | ते डॉक्टर |
| तो इंजिनियर | ते इंजिनियर |
| तो प्रश्न | ते प्रश्न |

याचप्रमाणे :
पत्रकार, शिक्षक, गायक, नर्तक, पाय, रुमाल, वर्ग, हात, वाघ, बाजार, छंद, रंग, विचार, वार...
पण :
तो माणूस-ती माणसे

### नपुंसकलिंगी सामान्य नामे

**अ - ए**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| ते नाव | ती नावे |
| ते पुस्तक | ती पुस्तके |
| ते उत्तर | ती उत्तरे |
| ते काम | ती कामे |
| ते चित्र | ती चित्रे |

याचप्रमाणे :
राष्ट्र, वाक्य, घर, दार, मैदान, उद्यान, झाड, फळ, पान, पत्र...
बोलताना :
नावे ⟶ नावं,
पुस्तके ⟶ पुस्तकं,
उत्तरे ⟶ उत्तरं,
कामे ⟶ कामं...



### स्त्रीलिंगी सामान्य नामे

**अ - आ**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| ती गरज | त्या गरजा |
| ती नोट | त्या नोटा |
| ती वेळ | त्या वेळा |
| ती बाग | त्या बागा |
| ती रेघ | त्या रेघा |

याचप्रमाणे :
माळ, चिंच, तार, तारीख, खेप, जमीन, काच...
पण :
ती तारीख - त्या तारखा

### स्त्रीलिंगी सामान्य नामे

**अ - ई**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| ती ओळ | त्या ओळी |
| ती सायकल | त्या सायकली |
| ती इमारत | त्या इमारती |

याचप्रमाणे :
अंघोळ, जाहिरात, तक्रार, सतार...
पण :
ती जमीन - त्या जमिनी

## दृष्टिक्षेप.

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो बाबा (ते -) | ती चूक (त्या चुका) | ते आडनाव (ती आडनावे) |
| तो / ते साहेब (ते -) | ती आई (त्या आया) | ते मूल (ती मुले) |
| तो संवाद (ते -) | ती बातमी (त्या बातम्या) | |
| तो वाघ (ते -) | ती मुलगी (त्या मुली) | |
| तो दूरध्वनी | | |
| तो क्रमांक (ते -) | | |
| तो व्यापार (ते -) | | |
| तो मुलगा (ते मुलगे) | | |
| तो मुखवटा (ते मुखवटे) | | |

| सर्वनाम | क्रियापद | शिष्टाचार शब्द | प्रश्नशब्द | इतर शब्द |
|---|---|---|---|---|
| तो | शिकवणे | हॅलो | कुठले | आता |
| ती | | सुप्रभात | कुठल्या | मध्ये |
| ते | | माफ करा | किती | लहान |
| त्या | | चूक झाली | | |
| आम्ही | | धन्यवाद | | |
| | | ठीक आहे | | |

## आता मला हे येतं.

**संपर्क साधणे.**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**१-१२ अंक**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**किती वाजले हे विचारणे आणि वेळ सांगणे.**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**'नाही' म्हणणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**प्रश्नशब्द : कुठले, कुठल्या, किती**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी



# देश आणि छंद

## ४



## चला, शिकू या...


- भारताचा नकाशा पाहणे आणि महत्त्वाची ठिकाणे ओळखणे
- स्वत:बद्दल सांगणे आणि इतरांबद्दल विचारणे
- स्वत:चा छंद सांगणे आणि इतरांचा विचारणे
- प्रश्नशब्द : कोणता, कोणती, कोणते, कोणत्या, कुठला, कुठली, कुठले, कुठल्या

# ४ देश आणि छंद




मुलांचा चित्रमय महाराष्ट्र, विद्याधर अमृते आणि प्रसाद गोगटे

## १ प्रश्नांची उत्तरे लिहू या.




१. भारताची राजधानी कोणती ?

भारताची राजधानी दिल्ली.

२. महाराष्ट्राची राजधानी कोणती ?

-------------------------------------------

३. मध्यप्रदेशाची राजधानी कोणती ?

-------------------------------------------

४. जयपूर ही कोणत्या राज्याची राजधानी आहे ?

-------------------------------------------

५. महाराष्ट्राच्या शेजारील राज्ये कोणती ?

-------------------------------------------

## २ वाचू या आणि ऐकू या.

- नमस्ते.
★ नमस्ते.
- मी आरती... आरती बात्रा. मी कोथरूडला राहते, एका छोट्या खोलीत. मी विद्यापीठात पीएच.डी. करत आहे.
★ बरं, मग ?
- मी... मी पंजाबी आहे, पण सध्या मराठी शिकते आहे. मला थोडं थोडं समजतं. मला पुणं खूप आवडतं. छान शहर आहे.
★ आहेच ! मग ?
- माझे आईवडील लुधियानात राहतात. ते म्हातारे आहेत. आता ते पुण्यात माझ्याकडे राहणार आहेत. पण माझी खोली छोटी आहे.
★ मग ?
- मी त्यांच्यासाठी मोठं घर शोधते आहे. आज टाइम्समध्ये तुमच्या घराची जाहिरात आहे.
★ आहे ! मग ?
- मग ?... मग काही नाही. जाहिरात छान आहे. येते मी. नमस्कार.

संवाद

## ३ खालील उतारे ऐकू या आणि त्यापुढील तक्ता भरू या.

**माझ्याबद्दल थोडेसे...**

क

मी मुस्तफा खान.
मी मुंबईचा. माझी मातृभाषा मराठी आहे.
मी अभिनेता आहे, आणि मी क्रिकेटही खेळतो.
मी अविवाहित आहे.

ख

माझं नाव सागरिका दास आहे.
मी कोलकात्याची. माझी मातृभाषा बंगाली आहे.
सध्या मी दिल्लीत राहते.
मी विवाहित आहे, आणि मला एक मुलगी आहे.
मी इंजिनियर आहे, पण सध्या मी पूर्ण वेळ गृहिणी आहे.
माझी मुलगी अजून लहान आहे.
वाचन आणि कॉम्प्युटरवर काम करणं हे माझे छंद आहेत.

ग

माझं नाव नवीन पटेल.
मी गुजरातचा. माझी मातृभाषा गुजराती आहे.
अजून माझं लग्न झालेलं नाही.
मी व्यापारी आहे.
माझं अहमदाबादमध्ये तयार कपड्यांचं दुकान आहे.
माझा एक छंद आहे - खाणं, माझे मित्र तर मला खादाडच म्हणतात.
जिलबी, फाफडा आणि पिझ्झा मला खूप आवडतो.

घ

मी सुंदर नायर. ही माझी बायको लता.
आम्ही केरळचे आहोत. माझी मातृभाषा मल्याळम आहे.
आम्ही शेतकरी आहोत.
आम्हाला दोन मुलं आहेत, आमचा मोठा मुलगा शेतकरी आणि मुलगी शिक्षिका आहे.

## ४ आता खालील तक्ता भरू या.

| नाव | गाव/शहर | मातृभाषा | व्यवसाय | विवाहित / अविवाहित | छंद |
|---|---|---|---|---|---|
| मुस्तफा खान | --------------- | ---------- | ----------- | ----------- | ----------------------- |
| सागरिका दास | --------------- | ---------- | ----------- | ----------- | ----------------------- |
| नवीन पटेल | --------------- | ---------- | ----------- | ----------- | ----------------------- |
| सुंदर नायर आणि लता नायर | --------------- | ---------- | ----------- | ----------- | ----------------------- |

## ५ आता तुमची पाळी.

मी ------------------------------------

------------------------------------

------------------------------------

------------------------------------

------------------------------------

## ६ वरील चार उताऱ्यांतील इंग्लिश शब्द शोधू या.

१. क्रिकेट

२. ----------------------

३. ----------------------

४. ----------------------

## ७ तुम्ही तुमच्या मातृभाषेत बोलताना वापरता असे इंग्लिश शब्द लिहू शकाल का?

कॉम्प्युटर, टेबल, -----------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------


------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

## ८ जोड्या लावू या.

| | |
|---|---|
| क. तुम्ही मराठी बोलता का ? | १. हो, त्या इथेच राहतात. |
| ख. हे लेलेकाकूंचं घर आहे का ? | २. बराय. |
| ग. तू काय करतोयस ? | ३. नाही, मी तमिळ बोलते. |
| घ. तुम्ही कसे आहात ? | ४. नाही. थोडं थोडं. |
| च. तू फुटबॉल खेळतोस का ? | ५. अभ्यास. |
| छ. तुला सगळं समजतंय का ? | ६. मी फक्त टेनिस खेळतो. |

## ९ शोधू या.




लिहिणे ----------------------------------

वाचणे ----------------------------------

गाणे ----------------------------------



## कोणता, कुठला


| | | |
|---|---|---|
| कोणता, कुठला | कोणती, कुठली | कोणते, कुठले |
| कोणते, कुठले | कोणत्या, कुठल्या | कोणती, कुठली |
| कोणते, कुठले | | |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>तुमचा छंद कोणता ? गायन | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>गायन हा माझा छंद आहे. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| गायन | गायन हा माझा छंद आहे. |
| वाचन | वाचन हा माझा छंद आहे. |
| लेखन | लेखन हा माझा छंद आहे. |
| चित्र रंगवणे | चित्र रंगवणे हा माझा छंद आहे. |
| फोटो काढणे | फोटो काढणे हा माझा छंद आहे. |
| बागकाम करणे | बागकाम करणे हा माझा छंद आहे. |
| गाणी ऐकणे | गाणी ऐकणे हा माझा छंद आहे. |
| कविता करणे | कविता करणे हा माझा छंद आहे. |
| सिनेमा बघणे | सिनेमा बघणे हा माझा छंद आहे. |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>गायन | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>गायन हा माझा छंद आहे.<br>तुमचा छंद कोणता ? |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| गायन | गायन हा माझा छंद आहे.<br>तुमचा छंद कोणता ? |
| वाचन | वाचन हा माझा छंद आहे.<br>तुमचा छंद कोणता ? |
| लेखन | लेखन हा माझा छंद आहे.<br>तुमचा छंद कोणता ? |
| चित्र रंगवणे | चित्र रंगवणे हा माझा छंद आहे.<br>तुमचा छंद कोणता ? |
| फोटो काढणे | फोटो काढणे हा माझा छंद आहे.<br>तुमचा छंद कोणता ? |
| बागकाम करणे | बागकाम करणे हा माझा छंद आहे.<br>तुमचा छंद कोणता ? |
| गाणी ऐकणे | गाणी ऐकणे हा माझा छंद आहे.<br>तुमचा छंद कोणता ? |
| कविता करणे | कविता करणे हा माझा छंद आहे.<br>तुमचा छंद कोणता ? |
| सिनेमा बघणे | सिनेमा बघणे हा माझा छंद आहे.<br>तुमचा छंद कोणता ? |
| ... | ... |

सराव

## १० तुमचा छंद कोणता? ते फळ्यावर लिहू या.




## ११ स्वत:बद्दलची माहिती लिहू या.

क. तुमचं नाव काय ? माझं नाव ---------------- आहे.

ख. तुमचं गाव कोणतं ? माझं गाव ---------------- आहे.

ग. तुमची मातृभाषा कोणती ?
माझी मातृभाषा ------------ आहे.

घ. तुम्ही कोणता व्यवसाय करता ?
मी ---------------- आहे.

च. तुमचा छंद कोणता ? ------------ हा माझा छंद आहे.

## १२ योग्य प्रश्न निवडता येईल?

| अ | ब |
|---|---|
| १. ------------------------------ | मी फ्रान्सचा |
| २. ------------------------------ | स्पेनमध्ये |
| ३. ------------------------------ | आंद्रे बॅरे |
| ४. ------------------------------ | फ्रेंच |
| ५. ------------------------------ | फुटबॉल खेळणे |
| ६. ------------------------------ | नाही, माझं लग्न अजून व्हायचंय! |

तुमची मातृभाषा कोणती?
तुमचं नाव काय?
आपण कुठले?
तुम्ही कुठं राहता?
तुमचा छंद कोणता?
तुम्ही विवाहित आहात का?

## १३ नाव नोंदणी

**समर** : नमस्कार, मला जर्मन भाषा शिकायची आहे.
**कर्मचारी** : तुमचं नाव काय?
**समर** : मी समर.
**कर्मचारी** : तुमचं आडनाव काय?
**समर** : गोयल.
**कर्मचारी** : तुम्ही कुठे राहता?
**समर** : नाशिकमध्ये.
**कर्मचारी** : तुमचा दूरध्वनी-क्रमांक?
**समर** : ०९७६७५६४५९८



संवाद

## १४ खालील अर्ज भरू या.

पूर्ण नाव : कु./श्री./सौ. -------------- (स्वतःचे नाव) -------------- (वडिलांचे/नवऱ्याचे नाव)
-------------- (आडनाव) -------------- (आईचे नाव)

जन्मतारीख - ------------------------------------------------------------

वय (अंकात) - ------------------------------------------------------------

लिंग - ------------------------------------------------------------

पत्ता - ------------------------------------------------------------

शहर - ------------------------------------------------------------

देश - ------------------------------------------------------------

मातृभाषा - ------------------------------------------------------------

विवाहित / अविवाहित / घटस्फोटित - ----------------------------------------

दूरध्वनी क्रमांक - ------------------------------------------------------------

ई-पत्ता - ------------------------------------------------------------



शब्द संपदा

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| डॉक्टर | मी डॉक्टर आहे. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| इंजिनियर | मी इंजिनियर आहे. |
| खेळाडू | मी खेळाडू आहे. |
| शास्त्रज्ञ | मी शास्त्रज्ञ आहे. |
| पत्रकार | मी पत्रकार आहे. |
| फोटोग्राफर | मी फोटोग्राफर आहे. |
| अभिनेता | मी अभिनेता आहे. |
| अभिनेत्री | मी अभिनेत्री आहे. |
| लेखक | मी लेखक आहे. |
| लेखिका | मी लेखिका आहे. |
| शिक्षक | मी शिक्षक आहे. |
| शिक्षिका | मी शिक्षिका आहे. |
| प्राध्यापक | मी प्राध्यापक आहे. |
| प्राध्यापिका | मी प्राध्यापिका आहे. |
| नर्तक | मी नर्तक आहे. |
| नर्तिका / नृत्यांगना / नर्तकी | मी नर्तिका / नृत्यांगना / नर्तकी आहे. |
| गायक | मी गायक आहे. |
| गायिका | मी गायिका आहे. |
| ... | ... |

सराव

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| तू डॉक्टर आहेस का? | हो, मी डॉक्टर आहे. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| तू डॉक्टर आहेस का? | हो, मी डॉक्टर आहे. |
| तू इंजिनियर आहेस का? | हो, मी इंजिनियर आहे. |
| तू लेखिका आहेस का? | हो, मी लेखिका आहे. |
| तू गायक आहेस का? | हो, मी गायक आहे. |
| तू नर्तक आहेस का? | हो, मी नर्तक आहे. |
| तू फोटोग्राफर आहेस का? | हो, मी फोटोग्राफर आहे. |
| ... | ... |

| | | |
|---|---|---|
| ॲक्टर | → | अभिनेता/अभिनेत्री |
| इंजिनियर | → | अभियंता |
| फोटोग्राफर | → | छायाचित्रकार |
| टीचर | → | शिक्षक/शिक्षिका |
| प्रोफेसर | → | प्राध्यापक/प्राध्यापिका |

| | |
|---|---|
| उदा. **शिक्षक/शिक्षिका**<br>तू डॉक्टर आहेस का? (इंजिनियर) | उदा. **शिक्षक/शिक्षिका**<br>नाही, मी इंजिनियर आहे. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| तू डॉक्टर आहेस का? (इंजिनियर) | नाही, मी इंजिनियर आहे. |
| तू अभिनेता आहेस का? (गायक) | नाही, मी गायक आहे. |
| तू लेखक आहेस का? (फोटोग्राफर) | नाही, मी फोटोग्राफर आहे. |
| तू खेळाडू आहेस का? (पत्रकार) | नाही, मी पत्रकार आहे. |
| तू गायक आहेस का? (नर्तक) | नाही, मी नर्तक आहे. |
| तू इंजिनियर आहेस का? (शास्त्रज्ञ) | नाही, मी शास्त्रज्ञ आहे. |
| ... | ... |



## आपल्या सहकाऱ्याचा परिचय करून देऊ या.

**नताशा** : माझं नाव नताशा. तुझं नाव काय?
ओ! सॉरी. तुमचं नाव काय?
**काव्या** : 'तू' म्हटलंस तरी चालेल! मी काव्या आणि हा माझा भाऊ आर्यन. तू मुंबईत काय करतेस?
**नताशा** : मी सीमेन्समध्ये काम करते. तुम्ही दोघं काय करता?
**काव्या** : मी कंपनी सेक्रेटरी आहे, आणि आर्यन अजून शिकतोय.
**आर्यन** : मी जर्मन शिकतोय.
**नताशा** : मग आता तू जर्मन बोलतोस का?
**आर्यन** : हो. थोडं थोडं बोलतो.



## सामान्य वर्तमानकाळ 'करणे'

| | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| | मी काम करतो.<br>मी काम करते. | आम्ही/आपण काम करतो. |
| | तू काम करतोस.<br>तू काम करतेस. | तुम्ही/आपण काम करता. |
| | तुम्ही/आपण काम करता. | तुम्ही/आपण काम करता. |
| | तो काम करतो. | ते काम करतात. |
| | ती काम करते. | त्या काम करतात. |
| | ते काम करतं. | ती काम करतात. |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| काम | मी काम करतो. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| काम | मी काम करतो. |
| अभ्यास | मी अभ्यास करतो. |
| व्यायाम | मी व्यायाम करतो. |
| वाचन | मी वाचन करतो. |
| सराव | मी सराव करतो. |
| व्यापार | मी व्यापार करतो. |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| काम | मी काम करते. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| काम | मी काम करते. |
| अभ्यास | मी अभ्यास करते. |
| व्यायाम | मी व्यायाम करते. |
| वाचन | मी वाचन करते. |
| सराव | मी सराव करते. |
| व्यापार | मी व्यापार करते. |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| अभ्यास | आम्ही अभ्यास करतो.<br>तुम्ही काय करता ? |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| अभ्यास | आम्ही अभ्यास करतो.<br>तुम्ही काय करता ? |
| काम | आम्ही काम करतो.<br>तुम्ही काय करता ? |
| वाचन | आम्ही वाचन करतो.<br>तुम्ही काय करता ? |
| व्यायाम | आम्ही व्यायाम करतो.<br>तुम्ही काय करता ? |
| व्यापार | आम्ही व्यापार करतो.<br>तुम्ही काय करता ? |
| सराव | आम्ही सराव करतो.<br>तुम्ही काय करता ? |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| अभ्यास | मी अभ्यास करतो. |
| | तू काय करतोस ? |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| अभ्यास | मी अभ्यास करतो. |
| | तू काय करतोस ? |
| काम | मी काम करतो. |
| | तू काय करतोस ? |
| वाचन | मी वाचन करतो. |
| | तू काय करतोस ? |
| व्यायाम | मी व्यायाम करतो. |
| | तू काय करतोस ? |
| व्यापार | मी व्यापार करतो. |
| | तू काय करतोस ? |
| सराव | मी सराव करतो. |
| | तू काय करतोस ? |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| अभ्यास | मी अभ्यास करते. |
| | तू काय करतेस ? |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| अभ्यास | मी अभ्यास करते. |
| | तू काय करतेस ? |
| काम | मी काम करते. |
| | तू काय करतेस ? |
| वाचन | मी वाचन करते. |
| | तू काय करतेस ? |
| व्यायाम | मी व्यायाम करते. |
| | तू काय करतेस ? |
| व्यापार | मी व्यापार करते. |
| | तू काय करतेस ? |
| सराव | मी सराव करते. |
| | तू काय करतेस ? |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| अभ्यास | तो हल्ली अभ्यास करतो का ? |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| अभ्यास | तो हल्ली अभ्यास करतो का ? |
| काम | तो हल्ली काम करतो का ? |
| वाचन | तो हल्ली वाचन करतो का ? |
| व्यायाम | तो हल्ली व्यायाम करतो का ? |
| व्यापार | तो हल्ली व्यापार करतो का ? |
| सराव | तो हल्ली सराव करतो का ? |
| ... | ... |

| उदा. शिक्षक/शिक्षिका | उदा. शिक्षक/शिक्षिका |
|---|---|
| अभ्यास | ती सध्या अभ्यास करते का ? |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| अभ्यास | ती सध्या अभ्यास करते का ? |
| काम | ती सध्या काम करते का ? |
| वाचन | ती सध्या वाचन करते का ? |
| व्यायाम | ती सध्या व्यायाम करते का ? |
| व्यापार | ती सध्या व्यापार करते का ? |
| सराव | ती सध्या सराव करते का ? |
| ... | ... |

| उदा. शिक्षक/शिक्षिका | उदा. शिक्षक/शिक्षिका |
|---|---|
| श्री. देशमुख - अभ्यास | ते अभ्यास करतात. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| श्री. देशमुख - अभ्यास | ते अभ्यास करतात. |
| श्री. पटेल - काम | ते काम करतात. |
| श्री. शेट्टी - वाचन | ते वाचन करतात. |
| श्री. भल्ला - व्यायाम | ते व्यायाम करतात. |
| श्री. भोसले - व्यापार | ते व्यापार करतात. |
| श्री. मेहेरा - सराव | ते सराव करतात. |
| ... | ... |

| उदा. शिक्षक/शिक्षिका | उदा. शिक्षक/शिक्षिका |
|---|---|
| सौ. राणे - अभ्यास | त्या अभ्यास करतात. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| सौ. राणे - अभ्यास | त्या अभ्यास करतात. |
| सौ. मिश्रा - काम | त्या काम करतात. |
| सौ. कामत - वाचन | त्या वाचन करतात. |
| सौ. सिंग - व्यायाम | त्या व्यायाम करतात. |
| सौ. पाटील - व्यापार | त्या व्यापार करतात. |
| सौ. माधवन - सराव | त्या सराव करतात. |
| ... | ... |

| उदा. शिक्षक/शिक्षिका | उदा. शिक्षक/शिक्षिका |
|---|---|
| मी | मी अभ्यास करतो/करते. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| मी | मी अभ्यास करतो/करते. |
| आम्ही | आम्ही अभ्यास करतो. |
| आपण | आपण अभ्यास करतो. |
| तू | तू अभ्यास करतोस/करतेस. |
| तुम्ही | तुम्ही अभ्यास करता. |
| आपण | आपण अभ्यास करता. |
| तो | तो अभ्यास करतो. |
| ते | ते अभ्यास करतात. |
| ती | ती अभ्यास करते. |
| त्या | त्या अभ्यास करतात. |
| ते | ते अभ्यास करते. |
| ती | ती अभ्यास करतात. |
| ... | ... |

सराव

१७ खालील तक्ता भरू या.

| | राहणे - राह (णे) | वाचणे - वाच (णे) | शिकणे - शिक (णे) | ऐकणे - ऐक (णे) | बोलणे - बोल (णे) | खेळणे - खेळ (णे) |
|---|---|---|---|---|---|---|
| मी | राहतो / राहते | | शिकतो / शिकते | | | |
| आम्ही / आपण | राहतो | | | | | |
| तू | राहतोस / राहतेस | वाचतेस | | | | |
| तुम्ही / आपण | राहता | | | | | |
| तो | राहतो | | | | | |
| ती | राहते | वाचते | | | | |
| ते | राहते | | | | | |
| ते / त्या / ती | राहतात | | | | | |

## १६ मराठीचा वर्ग

क. नमस्कार, मी आमिर. मी मुंबईत ------------------. तू कुठे ------------------, ममता ?

ख. मी चेन्नईमध्ये ------------------. तू काय ------------------ ?

ग. मी खूप पुस्तकं ------------------. मी मराठी ------------------. तू काय ------------------ ?

घ. मी फ्रेंच ---------------- आणि ----------------. मी बॅडमिंटन ----------------. तुझं नाव काय ?

च. मी सारा. मी लंडनमध्ये ------------------. नोबू, तू कुठे ------------------ ?

छ. मी जपानमध्ये ------------------. तू कादंबरी ------------------ का ?

ज. नाही, मी गाणी ------------------. तुम्ही काय ------------------, कारखानीस मॅडम ?

झ. मी स्पॅनिश ------------------. आपण कोण ?

ट. आम्ही चिटणीस पतिपत्नी. आम्ही महाराष्ट्रात -------------. तुम्ही कुठे -----------, सौ.कारखानीस ?

ठ. मी गोव्याला ------------------.

ड. तुम्ही कुठली भाषा ------------------ ?

ढ. मी कोकणी ------------------. तो कोण आहे ?

त. तो पीटर. तो जर्मनीमध्ये ------------------.

## १७ परत एकदा...

१. तुमचं नाव काय ?

माझं नाव ---------------- आहे.

२. तुमचं गाव कोणतं ?

माझं गाव ---------------- आहे.

३. तुमची मातृभाषा कोणती ?

माझी मातृभाषा ---------------- आहे.

४. तुम्ही कोणता व्यवसाय करता ?

मी ---------------- आहे.

५. तुमचा छंद कोणता ?

---------------- हा माझा छंद आहे.



## १८ अंकिताची एक ई-मेल वाचू या.



प्रिय पीटर,

तुझ्या मेल्स मी रोज वाचते आणि तू मला रोज जी फुलं पाठवतोस, ती मला फार आवडतात. पण तू जवळ नसल्यामुळे मला फार वाईट वाटतं. मी तुझे फोटो बघते. मला स्वप्नंसुद्धा तुझीच पडतात. तू आणि मी, मी आणि तू. तुला मी आवडते, म्हणून मी खुष आहे. तूपण खुष आहेस ना?

लव्ह

तुझीच,

अंकिता.

## १९ आता अशीच ई-मेल पीटर अंकिताला लिहितो.

**प्रिय अंकिता,**

तुझ्या मेल्स मी रोज वाचतो आणि तू मला रोज... ------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------.

## २० खालील संवाद वाचू या आणि ऐकू या.

**हॅलो ! हॅलो !**

हॅलो

हॅलो, हॅलो,कोण बोलतंय?

आपण कोण बोलताय?

मी!

कोण 'मी'?

अहो मी! ओळखलं नाही?

नाही! कोण आपण?

गोखले.

कोण?

माझं आडनाव गोखले.

अच्छा! गोखले होय. बोला, काय काम आहे?

काय?

काम काय आहे?

आपण गोडबोले का?

नाही! गोखलेच.

काऽऽऽऽय?

माझंपण आडनाव गोखलेच. गोडबोले नाही.

अरे वा, गंमतच आहे! तुम्हीही गोखले, मीही गोखले.

तुमचा चुकीचा क्रमांक लागलेला दिसतोय, ठीक आहे! या निमित्ताने ओळख झाली.

तुम्ही नाशिकवाले का?

नाही, नाही. आम्ही पुण्यातले. मिठाईवाल्या गोखल्यांच्या नात्यातले.

बरंय मग. नमस्कार!

नमस्कार, गोखले!

संवाद

# ४ देश आणि छंद


## लहान मुलगा आणि त्याचे वडील (बाबा) यांच्यातील खेळ.



**मुलगा** : टक् टक् टक् !
**बाबा** : कोण आहे ?
**मुलगा** : मी !
**बाबा** : मी ? कोण मी ?
**मुलगा** : अहो, मी आहे !
**बाबा** : तुम्ही आहात ते कळलं हो ! पण तुमचं नाव काय ?
**मुलगा** : माझं नाव गणपतीबाप्पा !
**बाबा** : अरे वा ! नमस्कार, गणपतीबाप्पा ! कसं काय, बरंय ना ?
**मुलगा** : छान ! अगदी छान !
**बाबा** : काय हो, गणपतीबाप्पा, तुम्ही राहता कुठे ?
**मुलगा** : मी नं ! कुठं बरं ? मी देवळात राहतो !
**बाबा** : वा ! आणि देवळात तुम्ही काय करता ?
**मुलगा** : मी .... झोपतो ! ......नाच करतो ! .... पुस्तक वाचतो !.... पण, तुम्ही कोण ?
**बाबा** : मी उंदीर !
**मुलगा** : हो का ? उंदीरमामा, तुम्ही कुठं राहता ?
**बाबा** : मीपण देवळातच राहतो.
**मुलगा** : तुम्ही आत्ता काय करताय ?
**बाबा** : मी ना ? मी आत्ता मस्तपैकी मोदक खातोय. अम्, अम्, अम् !
**मुलगा** : आंऽऽ ! तो माझा मोदक आहे ! ए आईऽऽऽ !!

संवाद

## वाचू या ... चिंटू.



## म्हणी / वाक्प्रचार

मी म्हणणे.
मी मी म्हणणे / करणे.
मी तू करणे.
आपण होऊन.
आपल्या आपण.
आंधळा मागतो एक डोळा, देव देतो दोन.
घोडामैदान जवळ आहे.
ज्याचं करावं भलं, तो म्हणतो माझंच खरं.
दात आहेत तर चणे नाहीत, चणे आहेत तर दात नाहीत.
दैव देतं, कर्म नेतं.

## खेळा आणि शिका.

फासा टाका आणि बरोबर उत्तर द्या. लवकरात लवकर बेरीज १० करा आणि जिंका.

 मी

 तू

 तो / ती / ते

 आम्ही / आपण

 तुम्ही

 ते / त्या / ती




**या खेळासाठी खालील गोष्टींची गरज आहे :**

क. जेवढे गट तेवढे फासे. प्रत्येक गटात : २ ते ५ विद्यार्थी

ख. जेवढे गट तेवढे पुढील क्रियापदांच्या चिठ्ठ्यांचे संच
(करणे, राहणे, वाचणे, बोलणे, शिकणे, खेळणे, खाणे, गाणे, हसणे, बघणे, नाचणे, येणे, जाणे)

ग. फासे आणि सर्वनामांची वरील यादी

घ. प्रत्येक गटाला : १ फासा आणि क्रियापदांच्या चिठ्ठ्यांचा १ संच

**असे खेळावे : स्पर्धा प्रत्येक गटात आहे. गटागटामध्ये नाही.**

१. प्रत्येक गटात : १ विद्यार्थी फासा टाकतो, १ चिठ्ठी उचलतो.
२. फाशावरील चिन्ह पाहतो.
३. यादी पाहतो.
४. चिन्हासमोरील सर्वनाम पाहतो.
५. चिठ्ठीवर असलेले क्रियापद सर्वनामाप्रमाणे चालवतो.
६. उत्तर बरोबर आहे ? मग फाशावरील चिन्हांइतके गुण.
७. गटात सर्वात प्रथम १० गुण मिळविणारा विद्यार्थी विजयी.

## लक्षात ठेवू या.

| लिहिताना | बोलताना |
|---|---|
| मूल अभ्यास करते. | मूल अभ्यास करतं. |
| मूल अननस खाते. | मूल अननस खातं. |
| ते वाचते. | ते वाचतं. |



## आकारान्त नामे

### पुल्लिंगी सामान्य नामे

आ - ए

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| तो मुलगा | ते मुलगे |
| तो अभिनेता | ते अभिनेते |
| तो पत्ता | ते पत्ते |
| तो फळा | ते फळे |

याचप्रमाणे :
रस्ता, आंबा, राजा, कावळा, कुत्रा, घोडा, मुखवटा...
पण :
काका - काका
मामा - मामा
आजोबा - आजोबा

### स्त्रीलिंगी सामान्य नामे

आ - आ

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| ती भाषा | त्या भाषा |
| ती दिशा | त्या दिशा |
| ती शिक्षिका | त्या शिक्षिका |
| ती शाळा | त्या शाळा |

याचप्रमाणे :
वीणा, जागा...

## १६ वरील शब्दांची अनेकवचने शोधू या.

करकचतफळेपरकबशक्षकरकरदहगरस्तेहगकरबपत्तेकहगमुलगेकरगहवीणाकरकहकहमअभिनेते
करराजेतकरहसपहशाळाकरदहकरआंबेगहरतकदतदजमुखवटेकदगतमवजागातडदकतरशिक्षिका
गबपकावळेतककतदजकुत्रेचकगदजघोडेकहगहरकहगदिशासदरतचदतगकतरभाषाकजगततदरद

## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो नकाशा (ते नकाशे) | ती राजधानी (त्या राजधान्या) | ते राज्य (ती राज्ये) |
| तो प्रदेश (ते -) | ती बायको (त्या बायका) | ते गाव (ती गावे) |
| तो शेतकरी (ते -) | ती अभिनेत्री (त्या अभिनेत्री) | ते शहर (ती शहरे) |
| तो अभिनेता (ते अभिनेते) | ती पत्रकार (त्या -) | ते स्वप्न (ती स्वप्ने) |
| तो पत्रकार (ते -) | ती लेखिका (त्या -) | ते दुकान (ती दुकाने ) |
| तो लेखक (ते -) | ती भाषा (त्या -) | ते पत्र (ती पत्रे ) |
| तो खेळाडू (ते -) | ती दिशा (त्या -) | ते अक्षर (ती अक्षरे) |
| तो शास्त्रज्ञ (ते -) | ती शाळा (त्या -) | ते वाक्य (ती वाक्ये) |
| तो अर्ज ( ते -) | ती वीणा (त्या -) | ते पुस्तक (ती पुस्तके) |
| तो व्यवसाय (ते -) | ती जागा (त्या -) | |
| तो रस्ता (ते रस्ते) | ती कादंबरी (त्या कादंबऱ्या) | |
| तो फळा (ते फळे) | ती वस्तू (त्या -) | |
| तो आंबा (ते आंबे) | ती ओळ (त्या ओळी) | |
| तो कावळा (ते कावळे) | ती वही (त्या वह्या) | |
| तो कुत्रा (ते कुत्रे) | ती ई-मेल (त्या -) | |
| तो प्राणी (ते -) | ती पूर्व | |
| तो शब्द (ते -) | ती पश्चिम | |
| तो उतारा (ते उतारे) | ती दक्षिण | |
| तो धडा (ते धडे) | ती उत्तर | |
| तो पाठ (ते -) | | |
| तो ई-मेल (ते -) | | |

| क्रियापद | विशेषण | प्रश्नशब्द | इतर शब्द |
|---|---|---|---|
| भरणे | अविवाहित | कोणता | हल्ली |
| बोलणे | विवाहित | कोणती | सुद्धा |
| खाणे | घटस्फोटित | कोणते | सध्या |
| पाठवणे | खूप | कोणत्या | |
| काम करणे | मोठा | कुठला | |
| | | कुठली | |
| | | कुठले | |
| | | कुठल्या | |

## आता मला हे येतं.

**भारताचा नकाशा आणि महत्त्वाची ठिकाणे ओळखणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**स्वतःबद्दल सांगणे आणि इतरांबद्दल विचारणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**स्वतःचा छंद सांगणे आणि इतरांचा विचारणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**प्रश्नशब्द : कोणता, कोणती, कोणते, कोणत्या, कुठला, कुठली, कुठले, कुठल्या**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी



# दैनंदिन व्यवहार

## ५



## चला, शिकू या...

- स्वतःचा आणि इतरांचा दिनक्रम सांगणे
- मराठी वार
- १३ ते ५० अंक
- दैनंदिन व्यवहारातील गोष्टींविषयी बोलणे
- दिवसाच्या वेळा
- प्रश्नशब्द : केव्हा / कधी

# ५ दैनंदिन व्यवहार

**१ ऐकू या व चित्रांना क्रमांक देऊ या.**

१



मी रोज सकाळी लवकर उठते.



मी चहा घेते.



मी घरीच व्यायाम करते.



मी दात घासते.



मी दुपारी कॅन्टीनमध्ये जेवते.



मी रोज सकाळी नाश्ता करते आणि एक फळही खाते.



मी ऑफिसला जाते.



मी रोज पोहायला जाते.



संध्याकाळी मी घरी येते.



मी रोज रात्री टी.व्ही. बघते.



मी रात्री वाचन करते.



मी रात्री लवकर झोपते.

## २ आता वरील वाक्ये क्रमाने लावू या.

**हा आहे प्रियाचा दिनक्रम.**

१. ती रोज सकाळी लवकर उठते...

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>नाश्ता | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>मी नाश्ता करतो/करते. |
|---|---|
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| अभ्यास | मी अभ्यास करतो / करते. |
| काम | मी काम करतो / करते. |
| व्यायाम | मी व्यायाम करतो / करते. |
| जेवण | मी जेवण करतो / करते. |
| प्रार्थना | मी प्रार्थना करतो / करते. |
| आंघोळ | मी आंघोळ करतो / करते. |
| नाश्ता | मी नाश्ता करतो / करते. |
| ... | ... |



## ३ जोड्या लावू या.






| सकाळी | दुपारी | संध्याकाळी | रात्री |
|---|---|---|---|



तुम्ही केव्हा / कधी उठता ? ----------------------

**४ आता असाच रोहनचा दिनक्रम लिहू या...**

**५ आता तुमचा दिनक्रम सांगू या.**

**६ चित्रे पाहून रिकाम्या जागा भरू या.**



रोहन दात घासतो.



रोहन आता दात घासत आहे.



श्रद्धा --------------------



श्रद्धा आता फळ खात आहे.



क्षितिज रोज -------------



क्षितिज आता पोहत आहे.

आनंद --------------------
-------------------------



आनंद आता
पुस्तक वाचत आहे.

## आता ही वाक्ये पाहू या.



रोहन रोज दात घासतो.



रोहन आता दात घासत आहे.



श्रद्धा रोज फळ खाते.



श्रद्धा आता फळ खात आहे.

## अपूर्ण (चालू) वर्तमानकाळ 'खाणे'

| वर्तमानकाळ | अपूर्ण (चालू) वर्तमानकाळ |
|---|---|
| मी अननस खातो.<br>मी अननस खाते. | मी अननस खात आहे. |
| आम्ही / आपण अननस खातो. | आम्ही/आपण अननस खात / खातो आहोत. |
| तू अननस खातोस.<br>तू अननस खातेस. | तू अननस खात / खातो आहेस.<br>तू अननस खात / खाते आहेस. |
| तुम्ही / आपण अननस खाता. | तुम्ही / आपण अननस खात आहात. |
| तो अननस खातो.<br>ती अननस खाते.<br>ते अननस खातं. | तो / ती / ते अननस खात आहे. |
| ते / त्या / ती अननस खातात. | ते / त्या / ती अननस खात आहेत. |

चालू (अपूर्ण) वर्तमानकाळ
धातू + त + (असणे)
उदा. खाणे - खा + त = खात आहे / आहोत, आहेस / आहात, आहे / आहेत
वाचणे - वाच + त = वाचत आहे / आहोत, आहेस / आहात, आहे / आहेत

थोडक्यात

## अकारान्त अकर्मक धातूंबाबत

| | | |
|---|---|---|
| राहत आहे. | बसत आहे. | उठत आहे. |

(राहणे, बसणे, उठणे...)

## अकारान्त सकर्मक धातूंबाबत

| | | |
|---|---|---|
| करत/करीत आहे. | मारत/मारीत आहे. | शोधत/शोधीत आहे. |

(करणे, मारणे, शोधणे...)

| उदा. **शिक्षक/शिक्षिका** मी खातो/ खाते. | उदा. **शिक्षक/शिक्षिका** मी खात आहे. |
|---|---|
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| मी खातो. | मी खात आहे. |
| मी खाते. | मी खात आहे. |
| आम्ही खातो. | आम्ही खात आहोत. |
| आपण खातो. | आपण खात आहोत. |
| तू खातोस. | तू खात आहेस. |
| तू खातेस. | तू खात आहेस. |
| तुम्ही खाता. | तुम्ही खात आहात. |
| आपण खातो. | आपण खात आहात. |
| तो खातो. | तो खात आहे. |
| ते खातात. | ते खात आहेत. |
| ती खाते. | ती खात आहे. |
| त्या खातात. | त्या खात आहेत. |
| ते खाते/खातं. | ते खात आहे. |
| ती खातात. | ती खात आहेत. |
| ... | ... |

| उदा. **शिक्षक/शिक्षिका** मी गातो/गाते. | उदा. **शिक्षक/शिक्षिका** मी गात आहे. |
|---|---|
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| मी विचारतो / विचारते. | मी विचारत आहे. |
| मी शिकतो / शिकते. | मी शिकत आहे. |
| मी देतो / देते. | मी देत आहे. |
| मी बघतो / बघते. | मी बघत आहे. |
| मी खेळतो / खेळते. | मी खेळत आहे. |
| मी खातो / खाते. | मी खात आहे. |
| मी धावतो / धावते. | मी धावत आहे. |
| ... | ... |

## ७ खालील तक्ता भरू या.

| क्रियापद | धातू | अपूर्ण वर्तमानकाळ |
|---|---|---|
| तू (करणे) | कर | करत + असणे |
| मी (उठणे) | उठ | उठत आहे |
| तू (खाणे) | खा | ----------- ----------- |
| तुम्ही / आपण (जाणे) | जा | ----------- ----------- |
| तो (गाणे) | गा | ----------- ----------- |
| ती (येणे) | ये | ----------- ----------- |
| ते (होणे) | हो | ----------- ----------- |
| तू (खेळणे) | खेळ | खेळत आहेस |
| तुम्ही (विकणे) | विक | ----------- ----------- |
| आम्ही / आपण दात (घासणे) | घास | ----------- ----------- |
| मी (जेवणे) | जेव | ----------- ----------- |
| तू (बघणे) | बघ | ----------- ----------- |
| ते (बोलणे) | बोल | ----------- ----------- |
| त्या (भरवणे) | भरव | ----------- ----------- |
| ती (वाचणे) | वाच | ----------- ----------- |



### ही माणसं काय करत आहेत?



अ) सलील पाणी पीत आहे.



आ) देवकी कविता लिहीत आहे.



हे लक्षात ठेवा!
अपूर्ण (चालू) वर्तमानकाळात काही धातूंच्या क्रियापदांचे रूप पुढीलप्रमाणे होते :
पिणे - पीत / पिते आहे..., लिहिणे - लिहीत / लिहिते आहे...

## ८ काय घडत आहे ते सांगता येईल?



तो दूध पीत आहे. ----------------------- -----------------------

----------------------- -----------------------

## ९ खालील संवाद ऐकू आणि वाचू या.

संवाद

- अगं केतकी, किती मोठ्यानं **वाचतेयस**! जरा हळू वाच की!
- हळूच **वाचतेय** रे! अजून किती हळू वाचू? एवढा त्रास होत असेल, तर तुझ्या खोलीत जा.
- तिथे आई वीणा **वाजवतेय.**
- अरे, मग आई-बाबांच्या खोलीत जा.
- अगं, बाबा **बोलतायत** फोनवर. कॉन्फरन्स कॉल चालू आहे.
- मग, तो तुझा जानी दोस्त,केदार, त्याच्याकडे जा ना! एकत्र अभ्यास करा.
- तो परीक्षा **देत नाहीये.**
- अरे बाप रे! का?
- ते नाही माहीत. तो परीक्षा **देत नाहीये,** पण मी **देतोय,** मला अभ्यास **करायचाय,** पण शांतताच **नाहीये** घरात. तुम्ही सगळे आपापली कामं **करताय.** माझा कोणीच विचार करत **नाहीये.**

| लिहिताना | बोलताना |
|---|---|
| वाचत / वाचते आहे | वाचतेय |
| वाचत / वाचते आहेस | वाचतेयस |
| वाजवत / वाजवते आहे | वाजवतेय |
| बोलत आहेत | बोलतायत / बोलताहेत |
| करत आहात | करताय / करताहात |
| देत नाही आहे | देत नाहीये |

## १० चित्र पाहून वाक्यं बनवू या.

१) वाट बघणे २) ट्रेन येणे ३) पळणे ४) चालू ट्रेनमध्ये चढणे ५) गर्दी करणे, धक्काबुक्की करणे ६) जिने चढणे ७) तिकीट काढणे ८) बूट पॉलिश करणे

उदा० प्रवासी वाट बघत आहेत...











१) ----------------------------------------

२) ----------------------------------------

३) ----------------------------------------

४) ----------------------------------------

५) ----------------------------------------

६) ----------------------------------------

७) ----------------------------------------

८) ----------------------------------------

| वर्तमान | अपूर्ण (चालू) वर्तमान | अपूर्ण (चालू) वर्तमान |
| --- | --- | --- |
| क्रियापद (वाचणे) | लिहिताना (औपचारिक) | बोलताना (संभाषणात्मक) |
| मी वाचतो. | मी वाचत / वाचतो आहे. | वाचतो + य = मी वाचतोय |
| मी वाचते. | मी वाचत / वाचते आहे. | वाचते + य = मी वाचतेय |
| आम्ही / आपण वाचतो. | आम्ही / आपण वाचत / वाचतो आहोत. | वाचतो + य = आम्ही / आपण वाचतोय<br>वाचतो + होत = आम्ही / आपण वाचताहोत |
| तू वाचतोस. | तू वाचत / वाचतो आहेस. | वाचतो + यस = तू वाचतोयस |
| तू वाचतेस. | तू वाचत / वाचते आहेस. | वाचते + यस = तू वाचतेयस |
| तुम्ही / आपण वाचता. | तुम्ही / आपण वाचत / वाचता आहात. | वाचता + य = तुम्ही / आपण वाचताय |
| | | वाचता + हात = तुम्ही / आपण वाचताहात |
| तो वाचतो. | तो वाचत / वाचतो आहे. | वाचतो + य = तो वाचतोय |
| ते वाचतात. | ते वाचत आहेत. | वाचता + यत = ते वाचतायत |
| | | वाचता + हेत = ते वाचताहेत |
| ती वाचते. | ती वाचत / वाचते आहे. | वाचते + य = ती वाचतेय |
| त्या वाचतात. | त्या वाचत आहेत. | वाचता + यत = त्या वाचतायत |
| | | वाचता + हेत = त्या वाचताहेत |
| ते वाचतं. | ते वाचत / वाचते आहे. | वाचतं + य = ते वाचतंय |
| ती वाचतात. | ती वाचत आहेत. | वाचता + यत = ती वाचतायत |
| | | वाचता + हेत = ती वाचताहेत |

व्याकरण

| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>मी खात आहे. | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>मी खातेय. |
| --- | --- |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| मी खात आहे. | मी खातोय. |
| मी खात आहे. | मी खातेय. |
| आम्ही खात आहोत. | आम्ही खातोय. |
| आपण खात आहोत. | आपण खातोय. |
| तू खात आहेस. | तू खातोयस. |
| तू खात आहेस. | तू खातेयस. |
| तुम्ही खात आहात. | तुम्ही खाताय. |
| आपण खात आहात. | आपण खाताय. |
| तो खात आहे. | तो खातोय. |
| ते खात आहेत. | ते खातायत. |
| ती खात आहे. | ती खातेय. |
| त्या खात आहेत. | त्या खातायत. |
| ते खात आहे. | ते खातंय. |
| ती खात आहेत. | ती खातायत. |
| ... | ... |

सराव

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>मी आम्ही खात आहोत. | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>आम्ही खातोय. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| आम्ही विचारत आहोत. | आम्ही विचारतोय. |
| आम्ही शिकत आहोत. | आम्ही शिकतोय. |
| आम्ही बघत आहोत. | आम्ही बघतोय. |
| आम्ही पोहत आहोत. | आम्ही पोहतोय |
| आम्ही गात आहोत. | आम्ही गातोय. |
| आम्ही धावत आहोत. | आम्ही धावतोय. |
| आम्ही विकत आहोत. | आम्ही विकतोय. |
| ... | ... |

सराव

## ११ आता पुढील संवाद वाचून प्रश्नांची उत्तरे लिहू या.



**फोनवर :**

**सोनल :** हॅलो, प्रभा आहे का? मी तिची मैत्रीण सोनल बोलतेय.

**आई :** कोण, सोनल का? कशी आहेस बेटा तू? प्रभा अभ्यास करतेय. परीक्षा चालू आहे ना! तुझा झाला का अभ्यास?

**सोनल :** नाही काकू, मीही गणिताचाच अभ्यास करतेय...

**प्रभा काय करत आहे? -** प्रभा अभ्यास करत आहे.

**गणिताचा अभ्यास कोण करीत आहे?** ----------------------------

**तुम्ही काय करत आहात?** ----------------------------------------

संवाद

## १२ संवाद वाचू या आणि क्रियापद ओळखू या.



**हॉटेलमध्ये :**

**मुग्धा :** माझ्या आईचा एसएमएस आलाय. ती मला घरी बोलावतेय.

**सुधा :** अगं, सांग ना आईला, आपण अजून खातोय.

**मुग्धा :** बघ! आता तर तिचा फोन येतोय.

## १३ पुढील संभाषणे वाचून रिकाम्या जागी योग्य क्रियापदे भरू या.

**क. घरात :**

**(करतेय, बघतेय, वाचतेय, करतेयस)**

**बाबा :** नीता, आई काय -------------------- ?

**नीता :** आई पुस्तक ---------------------- .

**बाबा :** अगं, मग तू काय -------------------- ?

**नीता :** मी ना? मी तर टी. व्ही. -------------- .

**ख. शाळेत :**

**(करतायत / म्हणतायत / वाटतंय)**

**जुलिया :** ती मुलं कोणतं गाणं गातायत?

**अवंती :** ती भारताचं राष्ट्रगीत ---------------- . उद्या १५ ऑगस्ट आहे ना, म्हणून मुलं सराव ---------------------- .

**जुलिया :** किती छान ---------------------- ना, ऐकताना!

**ग. मैदानावर :**

**(पडतोय, मारतोय, सांगतोय, विचारतोयस, पकडतोय)**



**थॉमस :** ही मुलं कुठला खेळ खेळतायत?

**अभय :** याला ''बैठा खो-खो'' म्हणतात. ''खो-खो''चे दोन प्रकार आहेत. ''उभा खो-खो'' आणि ''बैठा खो-खो''

**थॉमस :** अरे, तो बघ, तो मुलगा --------------------!

**अभय :** अरे, नाही, तो पडत नाहीये. तो दुसऱ्या मुलाला ------------------.

**थॉमस :** पण तो त्याला का --------------------?

**अभय :** अरे, तेच ----------- मी तुला, तो त्याला मारत नाहीये. तो त्याला पकडतोय.

**थॉमस :** तो त्याला का पकडतोय?

**अभय :** किती प्रश्न --------------------! चल, खेळू या.

## १४ बाजारात



**अमोघ :** अगं, ते बघ तिकडे. फळवाल्याकडे. हत्ती केळी खातोय.

**साधना :** हो रे!

**अमोघ :** तो बघ, तो लहान मुलगा किती मस्ती करतोय.

**साधना :** त्याची आई त्याला ओरडतेय...

**बाजारात काय काय घडत आहे? आता लिहू या.**

हत्ती केळी खात आहे. ------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

**थोडक्यात**

----------- + वाला
सायकल + वाला = सायकलवाला
केळीवाला, फळवाला, दूधवाला

----------- + वाली
भाजी + वाली = भाजीवाली
केळीवाली, फळवाली, दूधवाली

## १५ पुढील रचना वाक्यात वापरून पाहू या.

**(ढग गडगडणे, विजा चमकणे, सोसाट्याचा वारा वाहणे, झाडे डोलणे ...)**

**पावसात**

जुईली, तन्वी, निकिता, नेहा सगळ्या जणी लवकर लवकर बाहेर या! मस्त पाऊस पडतोय आणि आकाशात सप्तरंगी इंद्रधनुष्य दिसतंय. चला, रिमझिम पावसात भिजू या. ते बघा, आपल्यासारखे पक्षीही झाडावर भिजतायत आणि ते थंडीने कुडकुडतायत. पानांतून पाण्याचे थेंब टपटपतायत. अरे बाप रे! पाऊस वाढत चाललाय.

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

## १६ टी.व्ही.वरील बातम्या ऐकू या.

आता वळू या पुढील बातम्यांकडे. आज मुंबईत सर्व ठिकाणी पाऊस पडत आहे. आपण काही ठिकाणांची दृश्ये पाहू या.

आपण बघत आहात वरळी सी-फेसचे दृश्य. आपण पाहत आहात, माणसं पावसाचा आनंद कशी लुटत आहेत. ती पावसात मनसोक्त भिजत आहेत. मुलं पाण्यात होड्या सोडत आहेत. काही जण भजी व कणसं खाऊन मजा लुटत आहेत. अतिशय छान दृश्य आपल्याला पाहायला मिळत आहे.

आता पाहू या मीलन सबवेचे दृश्य. इथे खूप पाणी साचत आहे. वाहतुकीची कोंडी होत आहे. रस्त्यांवर खड्डे आहेत. बस, गाड्या हळूहळू बंद पडत आहेत. पावसाचा जोर वाढतच आहे.

हे बघा, हिंदमाता येथे काय घडत आहे. लोकांना घरी जायला त्रास होत आहे. काही घरांमध्ये पाणी शिरत आहे. डासही त्रास देत आहेत. लोकांचे हाल होत आहेत. तरीही काही जणं पावसाची मजा घेत आहेत. तरूण मुलं-मुली छान भिजत आहेत.

## १७ या बातम्या चुकून औपचारिक भाषेत आहे. त्या बोली भाषेत लिहू या.

आज मुंबईत सर्व ठिकाणी पाऊस पडतोय...

## वाचू या.



हा आपला रोहित. रोहित आंबा खात आहे. तो पाहा रोहितचा लाडका मित्र, विशाल. तो आंबा खात नाही आहे. तो टी.व्ही. पाहत आहे. ती विशालची मैत्रीण नेहा. ती टी.व्ही. पाहत नाही आहे. ती अभ्यास करत आहे. आणि हा मी. हा माझा मित्र साहिल. आम्हीही टी.व्ही. पाहत नाही आहोत.

आम्ही बुद्धिबळ खेळत आहोत. स्वयंपाकघरामध्ये रोहितची आई आहे. ती टी.व्ही. ही पाहत नाही आहे, किंवा बुद्धिबळही खेळत नाही आहे. ती स्वयंपाक करत आहे आणि रेडिओ ऐकत आहे. हॉलमध्ये रोहितचे बाबा आणि रोकडेकाका आहेत. रोकडेकाका बाहेर जात आहेत. रोहितचे बाबा मात्र बाहेर जात नाही आहेत. ते कॅलेंडरकडे पाहत आहेत. ते नेहाच्या लग्नाची तारीख ठरवत आहेत.

आजी वर्तमानपत्र वाचत आहेत. ''आजी, तुम्ही नेहमी जाहिराती का बघता?'' ''कुठल्या जाहिराती? मी तर बातम्या वाचतेय.''

| | | |
|---|---|---|
| रोहित आंबा खात आहे | ⟷ | विशाल आंबा खात नाही आहे |
| आम्ही टी.व्ही. पाहत नाही आहोत | ⟷ | आम्ही बुद्धिबळ खेळत आहोत |
| नेहा अभ्यास करत आहे | ⟷ | नेहा टी.व्ही. पाहत नाही आहे |
| रोहितची आई बुद्धिबळ खेळत नाही आहे | ⟷ | रोहितची आई रेडिओ ऐकत आहे |
| रोकडेकाका बाहेर जात आहेत | ⟷ | बाबा बाहेर जात नाही आहेत |
| आजी रेडिओ ऐकत नाही आहे | ⟷ | आजी बातम्या वाचत आहे |

थोडक्यात

**नकारार्थी चालू / अपूर्ण वर्तमानकाळ**
खाणे = खात + नाही + आहे / आहोत, आहेस / आहात, आहे / आहेत...

| होकारार्थी | नकारार्थी / लिहिताना | नकारार्थी / बोलताना |
|---|---|---|
| मी आंबा खात आहे. | मी आंबा खात नाही आहे. | मी आंबा खात नाहीये. |
| आम्ही / आपण आंबा खात आहोत. | आम्ही / आपण आंबा खात नाही आहोत. | आम्ही / आपण आंबा खात नाहीयोत. |
| तू टी.व्ही. पाहत आहेस. | तू टी.व्ही. पाहत नाही आहेस. | तू टी.व्ही. पाहत नाहीयेस. |
| तुम्ही / आपण टी.व्ही. पाहत आहात. | तुम्ही / आपण टी.व्ही. पाहत नाही आहात. | तुम्ही / आपण टी.व्ही. पाहत नाहीआत. |
| तो बुद्धिबळ खेळत आहे. | तो बुद्धिबळ खेळत नाही आहे. | तो बुद्धिबळ खेळत नाहीये. |
| ते बातम्या वाचत आहेत. | ते बातम्या वाचत नाही आहेत. | ते बातम्या वाचत नाहीयेत. |
| ती बुद्धिबळ खेळत आहे. | ती बुद्धिबळ खेळत नाही आहे. | ती बुद्धिबळ खेळत नाहीये. |
| त्या आरडाओरडा करत आहेत. | त्या आरडाओरडा करत नाही आहेत. | त्या आरडाओरडा करत नाहीयेत. |
| ते जेवण शिजवत आहे. | ते जेवण शिजवत नाही आहे. | ते जेवण शिजवत नाहीये. |
| ती गोंगाट करत आहेत. | ती गोंगाट करत नाही आहेत. | ती गोंगाट करत नाहीयेत. |

| उदा॰ शिक्षक/शिक्षिका | उदा॰ शिक्षक/शिक्षिका |
|---|---|
| मी जेवतो. | मी जेवत नाही आहे. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| मी जेवतो. | मी जेवत नाही आहे. |
| मी जेवते. | मी जेवत नाही आहे. |
| आम्ही जेवतो. | आम्ही जेवत नाही आहोत. |
| आपण जेवतो. | आपण जेवत नाही आहोत. |
| तू जेवतोस. | तू जेवत नाही आहेस. |
| तू जेवतेस. | तू जेवत नाही आहेस. |
| तुम्ही जेवता. | तुम्ही जेवत नाही आहात. |
| आपण जेवता. | आपण जेवत नाही आहात. |
| तो जेवतो. | तो जेवत नाही आहे. |
| ते जेवतात. | ते जेवत नाही आहेत. |
| ती जेवतो. | ती जेवत नाही आहे. |
| त्या जेवतात. | त्या जेवत नाही आहेत. |
| ते जेवते / जेवतं. | ते जेवत नाही आहे. |
| ती जेवतात. | ती जेवत नाही आहेत. |
| ... | ... |

सराव

| उदा॰ शिक्षक/शिक्षिका | उदा॰ शिक्षक/शिक्षिका |
|---|---|
| मी खेळतोय. | मी खेळत नाहीये. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| मी खेळतोय. | मी खेळत नाहीये. |
| मी खेळतेय. | मी खेळत नाहीये. |
| ती खेळतेय. | ती खेळत नाहीये. |
| ते खेळतेय. | ते खेळत नाहीये. |
| तो खेळतोय. | तो खेळत नाहीये. |
| त्या खेळताहेत. | त्या खेळत नाहीयेत. |
| ती खेळताहेत. | ती खेळत नाहीयेत. |
| आम्ही/आपण खेळताहोत. | आपण खेळत नाहीयोत. |
| आपण खेळताहात. | आपण खेळत नाहीआत. |
| तू खेळतोयस. | तू खेळत नाहीयेस. |
| तुम्ही खेळताहात. | तुम्ही खेळत नाहीआत. |
| तू खेळतेयस. | तू खेळत नाहीयस. |
| ... | ... |

## १८ आता खालील चित्रे पाहून पुढील वाक्ये चूक की बरोबर, ते लिहू या. चुकीची वाक्ये सुधारता येतील का?

**ऑफिसमध्ये :**




१. सुनीता कॉम्प्युटरवर काम करत आहे. -------------------------------------------

२. मनीषा लिहीत आहे. -------------------------------------------

३. प्रतीक चालत नाही आहे. -------------------------------------------

४. साहेब शिपायाला बोलावत आहेत. -------------------------------------------

५. शिपाई चहा नेत आहे. -------------------------------------------

६. अभिषेक चहा पीत नाही आहे. -------------------------------------------

७. भास्कर बसत आहे. -------------------------------------------

८. एक बाई अर्ज भरत आहे. -------------------------------------------

९. शंभू पैसे घेत आहे. -------------------------------------------

## १९ ऐकू या आणि वाचू या.



**लेडिज स्पेशल**
अरे बापरे! किती गर्दी!
मी काही ही ट्रेन पकडत नाहीये,
आणि दरवाजातल्या मुली ढिम्म हलत नाहीयेत.
चढायचं कसं?
काय करायचं? उशीर होतोय.
जाऊ दे, मी ही ट्रेन पकडतेच,
काय होईल ते होईल.
हुश्श! चढले बाई एकदाची!
अरे, मागून कोण ढकलतंय मला?
कुणी आत का जात नाहीये?
दारात गर्दी वाढतेय.
आणि त्यात हे फेरीवाले.
अहो, हा बायकांचा डबा आहे!
स्पेशल! लेडिज स्पेशल!
पण हे मी कोणाला सांगतेय?
कोण ऐकतंय माझं?



## २० ऐकू या आणि वाचू या.

**मयेकर :** वा म्हात्रेसाहेब, उद्या नाशिकला जाताहात ना?
**म्हात्रे :** चुकत आहात बरं! या खेपेला मात्र साफ चुकताहात.
**मयेकर :** ते कसं काय!
**म्हात्रे :** कारण मी नाशिकला नाही, पुण्याला जातोय.
**मयेकर :** अच्छा! पुण्याला काय दगडूशेठ गणपतीच्या दर्शनाला जाताय की काय? पेढे आणा मग येताना प्रसादाचे!
**म्हात्रे :** छे हो! माझा मुलगा राहतोय ना तिथे, आदित्य, त्याच्याकडे जातोय.
**मयेकर :** का हो, सहजच ना, की काही विशेष?
**म्हात्रे :** विशेषच. अहो, लेक लग्न करतोय!
**मयेकर :** वा वा! मुलगी कुठली?
**म्हात्रे :** पुण्याचीच, दाबक्यांची मुलगी आहे. सध्या एम्.बी.ए. चा अभ्यास करतेय.
**मयेकर :** वा वा, छान! सून येतेय म्हणजे तुम्ही आता सासरेबुवा होताहात. आता पेढे नकोत, लाडूच पाहिजेत. दर्शनाला न जाताच दगडूशेठ पावला म्हणायचा!



## २१ वरील संवाद वाचून चूक की बरोबर ते सांगाल?

१. श्री. म्हात्रे नाशिकला जात आहेत. ☐
२. आदित्य आता लग्न करत आहे. ☐
३. आदित्य पुण्यात राहत आहे. ☐
४. श्री. म्हात्रे एम.बी.ए.चा अभ्यास करत आहेत. ☐
५. मयेकरांचा मुलगा येत आहे. ☐

**इंग्रजीप्रमाणेच मराठीतही भविष्यकाळासाठी चालू वर्तमानकाळ वापरला जातो**
**उदा.** उद्या मी तुला भेटायला येत आहे / येतोय / येते आहे / येतेय.
पुढील महिन्यात मी लंडनला जात आहे / जातो आहे / जातोय.
लवकरच आम्ही लग्न करत आहोत / करतो आहोत / करतोय.

## १ ते ५० अंक - वाचन आणि सराव.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एक | ११ | अकरा | २१ | एकवीस | ३१ | एकतीस | ४१ | एकेचाळीस |
| २ | दोन | १२ | बारा | २२ | बावीस | ३२ | बत्तीस | ४२ | बेचाळीस |
| ३ | तीन | १३ | तेरा | २३ | तेवीस | ३३ | तेहतीस | ४३ | त्रेचाळीस |
| ४ | चार | १४ | चौदा | २४ | चोवीस | ३४ | चौतीस | ४४ | चव्वेचाळीस |
| ५ | पाच | १५ | पंधरा | २५ | पंचवीस | ३५ | पस्तीस | ४५ | पंचेचाळीस |
| ६ | सहा | १६ | सोळा | २६ | सव्वीस | ३६ | छत्तीस | ४६ | शेहेचाळीस |
| ७ | सात | १७ | सतरा | २७ | सत्तावीस | ३७ | सदतीस | ४७ | सत्तेचाळीस |
| ८ | आठ | १८ | अठरा | २८ | अठ्ठावीस | ३८ | अडतीस | ४८ | अठ्ठेचाळीस |
| ९ | नऊ | १९ | एकोणीस | २९ | एकोणतीस | ३९ | एकोणचाळीस | ४९ | एकोणपन्नास |
| १० | दहा | २० | वीस | ३० | तीस | ४० | चाळीस | ५० | पन्नास |

### २२ चला, हे कोडे सोडवू या.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ३१ | | | | स |
| | | | | | | |
| २९ | | को | | | | |
| | | ३५ | | स्ती | | |
| | ५० | प | | | | |
| | ३० | ती | | | | |

### २३ मुंबई मराठी साहित्य संघ

नमस्कार, मुंबई मराठी साहित्य संघ. हवा असलेला विस्तारित क्रमांक डायल करा. २१ आणि २२ - प्रमुख कार्यालय., २४ - साहित्य शाखा., २७ - नाट्यकार्यालय, ३५ - अखिल भारतीय साहित्य महामंडळ. धन्यवाद!

### २४ खालील तक्ता भरू या.

| कोणता क्रमांक ? | कुठले कार्यालय ? |
|---|---|
| २१ | ---------------------- |
| २२ | ---------------------- |
| --------- | साहित्य शाखा |
| २७ | ---------------------- |
| --------- | ---------------------- |

### २५ दिनदर्शिका पाहून वार लिहिता येतील?





| | |
|---|---|
| ३० बुधवार | १५ -------------- |
| ४ -------------- | १८ -------------- |
| १२ शनिवार | २७ -------------- |
| १४ -------------- | ९ -------------- |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>आज रविवार आहे का ? | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>नाही, उद्या रविवार आहे./<br>नाही, आज शनिवार आहे. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| आज सोमवार आहे का ? | नाही, उद्या सोमवार आहे./<br>नाही, आज रविवार आहे. |
| आज मंगळवार आहे का ? | नाही, उद्या मंगळवार आहे./<br>नाही, आज सोमवार आहे. |
| आज बुधवार आहे का ? | नाही, उद्या बुधवार आहे./<br>नाही, आज मंगळवार आहे. |
| आज गुरुवार आहे का ? | नाही, उद्या गुरुवार आहे./<br>नाही, आज बुधवार आहे. |
| आज शुक्रवार आहे का ? | नाही, उद्या शुक्रवार आहे./<br>नाही, आज गुरुवार आहे. |
| आज शनिवार आहे का ? | नाही, उद्या शनिवार आहे./<br>नाही, आज शुक्रवार आहे. |



| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>तुम्ही पोहता का ? | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>मी पोहत नाही. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| तुम्ही खेळता का ? | मी खेळत नाही. |
| तुम्ही झोपता का ? | मी झोपत नाही. |
| तुम्ही गाता का ? | मी गात नाही. |
| तुम्ही बोलावता का ? | मी बोलावत नाही. |
| तुम्ही येता का ? | मी येत नाही. |
| तुम्ही जाता का ? | मी जात नाही. |

## २६ खालील तिकिटांचे निरीक्षण करून त्यावरील किंमत शब्दांत लिहू या.




------------------------ ------------------------ ------------------------

## २२ जोड्या जुळवू या.

| तिकिटावरील माहिती | माहितीचा अर्थ |
|---|---|
| १) ₹ १०.०० | क) तारीख |
| २) ०८ / ०८ / २०१३ | ख) तिकिटाचा प्रकार |
| ३) साधारण | ग) बसमार्ग |
| ४) वाकोला पोलीस ठाणे ते कुर्ला आगार | घ) किंमत  रुपये |
| ५) फुल | च) प्रौढांसाठी तिकिटाचा प्रकार |
| ६) बेस्ट | छ) बससेवेचे नाव |

## वाचू या ... चिंटू.




## म्हणी / वाक्प्रचार

तीन-तेरा वाजणे
सोळावं वरीस धोक्याचं
सतरा ठिकाणी फिरणे
छत्तीसचा आकडा
बत्तीशी दाखवणे
अठरा विश्वे दारिद्र्य






## खेळा आणि शिका

१. खालील क्रियापदांसाठी तक्ते बनवून खेळ खेळू या. प्रत्येक गटाने क्रियापदांची वाक्ये बनवायची. जो गट जास्तीत जास्त अचूक वाक्ये बनवील, तो गट जिंकेल.
बोलणे, करणे, खाणे, हसणे, गाणे, ऐकणे, चालणे, रडणे, ओरडणे, सांगणे, विचारणे...

## ईकारान्त सामान्य नामे

### पुल्लिंगी सामान्य नामे

ई - ई

| एकवचन | अनेकवचन |
| --- | --- |
| तो व्यापारी | ते व्यापारी |
| तो विद्यार्थी | ते विद्यार्थी |
| तो हत्ती | ते हत्ती |
| तो दूरध्वनी | ते दूरध्वनी |

याचप्रमाणे :
पती, पक्षी, कर्मचारी, शिपाई, शेतकरी...

**नपुंसकलिंगी सामान्य नामांची एकवचनी रूपेच वापरली जातात :** दही, लोणी, पाणी...

### स्त्रीलिंगी सामान्य नामे

ई - ई

| एकवचन | अनेकवचन |
| --- | --- |
| ती पत्नी | त्या पत्नी |
| ती गृहिणी | त्या गृहिणी |
| ती विद्यार्थिनी | त्या विद्यार्थिनी |
| ती अभिनेत्री | त्या अभिनेत्री |

### स्त्रीलिंगी सामान्य नामे

ई - या

| एकवचन | अनेकवचन |
| --- | --- |
| ती आई | त्या आया |
| ती बाई | त्या बाया/बायका |
| ती बातमी | त्या बातम्या |
| ती भाजी | त्या भाज्या |
| ती मिठाई | त्या मिठाया |
| ती मिशी | त्या मिश्या |
| ती वही | त्या वह्या/वह्‌या |

याचप्रमाणे :
नदी, गाडी, साडी, शिटी, कडी, किल्ली, चटई, कढई...

### स्त्रीलिंगी सामान्य नामे

ई - इया

| एकवचन | अनेकवचन |
| --- | --- |
| ती स्त्री | त्या स्त्रिया |
| ती बी | त्या बिया |
| ती फी | त्या फिया |

२३ **खालील शब्द योग्य चौकोनात लिहू या.**

(मिश्या, विद्यार्थिनी, ~~अभिनेत्री~~, पाणी, नदी, कडी, साड्या, हत्ती, ~~मिठाया~~, ~~विद्यार्थी~~, किल्ली, गृहिणी, कड्या, ~~मिशी~~)

| एकवचन | एकवचन/अनेकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| मिशी | अभिनेत्री | मिठाया |
| विद्यार्थी | ---------------- | ---------------- |
| ---------------- | ---------------- | ---------------- |



## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो व्यायाम (ते -) | ती प्रार्थना (त्या -) | ते गणित (ती गणिते) |
| तो नाश्ता (ते नाश्ते) | ती अंघोळ (त्या अंघोळी) | ते इंद्रधनुष्य (ती इंद्रधनुष्ये) |
| तो दिनक्रम (ते -) | ती परीक्षा (त्या -) | ते स्वयंपाकघर (ती स्वयंपाकघरे) |
| तो हत्ती (ते -) | ती थंडी | ते लग्न (ती लग्ने) |
| तो फळवाला (ते फळवाले) | ती वीज (त्या विजा) | ते बुद्धीबळ (ती बुद्धीबळे) |
| तो पाऊस | ती कसोटी (त्या कसोट्या) | |
| तो थेंब (ते -) | ती होडी (त्या होड्या) | |
| तो ढग (ते -) | ती बातमी (त्या बातम्या) | |
| तो वारा (ते वारे) | ती भाजी (त्या भाज्या) | |
| तो सामना ( ते सामने) | ती मिठाई (त्या मिठाया) | |
| तो अंदाज (ते -) | ती मिशी (त्या मिश्या) | |
| | ती नदी (त्या नद्या) | |
| | ती गाडी (त्या गाड्या) | |
| | ती साडी (त्या साड्या) | |
| | ती शिटी (त्या शिट्या) | |
| | ती कडी (त्या कड्या) | |
| | ती किल्ली (त्या किल्ल्या) | |

| क्रियापद | विशेषण | शिष्टाचार शब्द | प्रश्नशब्द | इतर शब्द |
|---|---|---|---|---|
| उठणे | लाडका | अरे बाप रे! | केव्हा | सकाळी |
| घेणे | सोसाट्याचा | जरा ... | कधी | दुपारी |
| जाणे | | बघ! | | संध्याकाळी |
| फिरणे | | किती छान! | | रात्री |
| जेवणे | | | | लवकर |
| पोहणे | | | | मोठ्याने |
| मारणे | | | | |
| धावणे | | | | |
| भिजणे | | | | |
| पडणे | | | | |
| कुडकुडणे | | | | |
| गडगडणे | | | | |
| चमकणे | | | | |
| वाहणे | | | | |
| डोलणे | | | | |
| वर्तवणे | | | | |

## आता मला हे येतं.

**स्वतःचा आणि इतरांचा दिनक्रम सांगणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**मराठी वार**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**१३ ते ५० अंक**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**दैनंदिन व्यवहारातील गोष्टींविषयी बोलणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**दिवसाच्या वेळा**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**प्रश्नशब्द : केव्हा / कधी**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी



# ६ आहार



## चला, शिकू या...

- हॉटेलमध्ये ऑर्डर देणे, बिल मागणे
- विविध खाद्यपदार्थांविषयी बोलणे
- आपल्या इच्छा व्यक्त करणे
- इतरांचे वर्णन करणे
- एखाद्या प्रसंगाचे वर्णन करणे

## खाऊगल्लीचा फेरफटका अर्थात चमचमीत, मसालेदार खाणे

संवाद

**मित्र १ :** चल, खाऊगल्लीत जाऊ या आणि बटाटावडा खाऊ या.
**मित्र २ :** शी :! 'बटाटावडा' काय ? 'बटाटेवडे' म्हण.
**मित्र १ :** अरे, बटाटावडा काय, नि बटाटेवडा काय ?
आपल्याला खाण्याशी मतलब !

| लिहिताना | बोलताना |
|---|---|
| आणि | आणि |
| अन् | अन् |
| नि | न् |
| व | |

शब्द संपदा



वडा पाव



सामोसा



इडली



पाव भाजी



पाणी पुरी



कटलेट



मिसळ पाव



थालीपीठ



कांदा भजी

# ‘खमंग’ उपाहारगृह

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **उपवासाचे पदार्थ** | | **पेय** | |
| बटाटावडा | २५ | साबुदाणा-वडा | २६ | चहा | ८ |
| बटाटाभजी | ३५ | साबुदाणा-खिचडी | २० | कॉफी | १० |
| भाजणीचे थालीपीठ | २७ | साबुदाणा -पुरी | २२ | मसाला दूध | १२ |
| मिसळ | २२ | | | पीयूष | १० |
| कटलेट | २५ | **गोड पदार्थ** | | मिनरल वॉटर | २० |
| सामोसा | २५ | पुरणपोळी (एक नग) | १८ | | |
| पोहे | २२ | दुधी हलवा | २० | | |
| उपमा | २० | श्रीखंड | २८ | | |

शब्द संपदा

## आपण आता ‘खमंग’ उपाहारगृहात आलोत. चला, काही तरी मागवू या.

संवाद

‘‘मला पोहे आणि चहा. तुम्हाला काय हवंय ?’’
‘‘आम्हाला दोन प्लेट बटाटावडा आणि दोन कॉफी. तू काय घेणार ?’’
‘‘मला फक्त चहा.’’
‘‘भाऊ / दादा, मिनरल वॉटरपण हवंय आम्हाला.’’



सराव

| | |
|---|---|
| उदा. **शिक्षक/शिक्षिका** | उदा. **शिक्षक/शिक्षिका** |
| तुम्हाला काय हवंय ? चहा | मला चहा हवाय. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| तुम्हाला काय हवंय ? कॉफी | मला कॉफी हवीय. |
| तुम्हाला काय हवंय ? वडा | मला वडा हवाय. |
| तुम्हाला काय हवंय ? मिसळ | मला मिसळ हवीय. |
| तुम्हाला काय हवंय ? पोहे | मला पोहे हवेत. |
| तुम्हाला काय हवंय ? उपमा | मला उपमा हवाय. |
| तुम्हाला काय हवंय ? सरबत | मला सरबत हवंय. |
| तुम्हाला काय हवंय ? अंडी | मला अंडी हवीयेत. |
| तुम्हाला काय हवंय ? सामोसा | मला सामोसा हवाय. |
| ... | ... |

## १ योग्य वाक्ये तयार करू या.

| खाणे | | |
|---|---|---|
| | (ते) पोहे | हवंय |
| | (तो) उपमा | हवेत |
| मला | (तो) बटाटावडा | हवाय |
| | (तो) सामोसा | हवीय |
| | (ती) पुरणपोळी | |

| पिणे | | |
|---|---|---|
| | (तो) चहा | हवंय |
| मला | (ती) कॉफी | हवाय |
| | (ते) लिंबू-सरबत | हवीय |
| | (ते) पीयूष | |

ते पोहे (अनेकवचन), तो उपमा, तो बटाटावडा, तो सामोसा, ती पुरणपोळी (एकवचन), तो चहा, ती कॉफी (एकवचन), ते लिंबू-सरबत (एकवचन), ते पीयूष (एकवचन).

उदा॰ मला पोहे हवेत. मला उपमा हवाय...

**टीप:**

| तो | ती | ते | ते | त्या | ती |
|---|---|---|---|---|---|
| हवाय | हवीय | हवंय | हवेत | हव्यात | हवीयत |

## २ ऐकू या आणि वाचू या.

**संध्याकाळी सई आणि नयना लतिकाला दादरला भेटतात. त्या तिघी उपाहारगृहात जातात.**

**सई** : श्या! किती उकडतंय बाई! आधी थंड पाणी सांग.

**नयना** : सई, तू मुंबईत नाही, काश्मीरलाच राहायला हवंस. तुला सारखंच कसं गरम होतं? मला तर गरमागरम चहा हवाय. जरा तरतरी येईल. लतिका, तू काय घेणारंयस?

**लतिका** : मला लिंबू-सरबत चालेल.

**सई** : अगं, आपण नुसतं चहा, पाणी, सरबत याच विषयी बोलतोय केव्हापासून. खायचं काय, ते ठरवलंच नाही अजून. (वेटर येतो)

**वेटर** : काय आणू आपल्याला?

**सई** : आत्ता गरमागरम काय मिळेल तुमच्याकडे?

**वेटर** : बटाटावडा, सामोसा, मिसळ, कटलेट...

**लतिका** : मला एक प्लेट सामोसा आणि लिंबू-सरबत आणा. सरबतात बर्फ नको. तुझं काय, नयना?

**नयना** : मला मिसळ आणि चहा हवाय. चहा थोड्या वेळानं आणा.

**सई** : मला एक प्लेट गोड शिरा. आणि हो, थंड पाणीही द्या.

**वेटर** : साधं की बिस्लेरीचं?

**सई** : बिस्लेरीचं.

(काही वेळाने...)




**सई** : कसं आहे गं लिंबू सरबत?

**लतिका** : जरा जास्तच आंबट आहे गं! ती साखरेची वाटी सरकव इकडे.

**नयना** : ही मिसळसुद्धा खूपच जास्त तिखट आहे गं! आणि चहा खूपच गोड आहे!

**सई** : बरंय ना! गरमागरम झणझणीत मिसळीवर गोड चहाचा उतारा नको? शिरा मात्र मस्त चविष्ट आहे.

**लतिका** : सामोसापण छान आहे गं! चव घ्या ना दोघींनी.

**नयना** : (चव घेऊन) हं, खरंच छान आहे गं सामोसा. चला, निघू या आता? मला क्लासला जायला उशीर होईल नाही तर.

**सई** : चल, चल, मलापण घरी जरा लवकर पोहोचायचंय. आम्हाला बिल मिळेल का हो?

| उदा. शिक्षक/शिक्षिका | उदा. शिक्षक/शिक्षिका |
|---|---|
| तू काय घेणारंयस ? चहा | मी चहा घेणारंय. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| तू काय घेणारंयस ? सामोसा | मी सामोसा घेणारंय. |
| तू काय घेणारंयस ? चहा | मी चहा घेणारंय. |
| तू काय घेणारंयस ? कटलेट | मी कटलेट घेणारंय. |
| तू काय घेणारंयस ? पोहे | मी पोहे घेणारंय. |
| तू काय घेणारंयस ? कॉफी | मी कॉफी घेणारंय. |
| तू काय घेणारंयस ? सरबत | मी सरबत घेणारंय. |
| तू काय घेणारंयस ? मिसळ | मी मिसळ घेणारंय. |
| ... | ... |

| उदा. शिक्षक/शिक्षिका | उदा. शिक्षक/शिक्षिका |
|---|---|
| तुला काय हवंय ? चहा | मला चहा हवाय. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| तुला काय हवंय ? सामोसा | मला सामोसा हवाय. |
| तुला काय हवंय ? चहा | मला चहा हवाय |
| तुला काय हवंय ? कटलेट | मला कटलेट हवंय. |
| तुला काय हवंय ? पोहे | मला पोहे हवेयत. |
| तुला काय हवंय ? कॉफी | मला कॉफी हवीय. |
| तुला काय हवंय ? सरबत | मला सरबत हवंय. |
| तुला काय हवंय ? मिसळ | मला मिसळ हवीय |
| ... | ... |

सराव

### ३ छोटे छोटे गट करून अशा काही संभाषणांचा सराव करू या.

तू काय घेणारंयस ?
तुला काय हवंय ?
तुझं काय... ?

सामोसा
मिसळ
चहा
कटलेट
सरबत
...

मी ... घेणारंय.
मला ... हवंय.
मला ... चालेल.

कसा आहे ... ?
कशी आहे ... ?
कसं आहे ... ?

छान आहे.
तिखट आहे.
गोड आहे.
...

उदा. तू काय घेणारंयस ? मी सामोसा घेणारंय.
कसा आहे सामोसा ? छान आहे.

संवाद

| | |
|---|---|
| उदा. **शिक्षक/शिक्षिका**<br>चहा कसा आहे ? गोड | उदा. **शिक्षक/शिक्षिका**<br>चहा गोड आहे. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| चहा कसा आहे ? गोड | चहा गोड आहे. |
| कॉफी कशी आहे ? दुधाळ | कॉफी दुधाळ आहे. |
| मिसळ कशी आहे ? तेलकट | मिसळ तेलकट आहे. |
| पाव कसा आहे ? कडक | पाव कडक आहे. |
| कॉफी कशी आहे ? कडू | कॉफी कडू आहे. |
| सरबत कसे / कसं आहे ? आंबट | सरबत आंबट आहे. |
| ... | ... |

सराव

## पत्र वाचू या.

प्रिय आई,

तू कशी आहेस ? **मला** अमेरिकेत येऊन आता बरेच दिवस झालेत. **मला** अमेरिका हळूहळू आवडतेय. पण **मला** तुझी फार आठवण येते. स्वयंपाक करताना तर तू खूपच आठवतेस. अमेरिकेत चटपटीत खाणं मिळत नाही. पण **राहुलला** चटपटीत पदार्थ फार आवडतात. आणि **मला** काही सगळेच पदार्थ करता येत नाहीत. **तुला** तर वेगवेगळे चटपटीत पदार्थ करता येतात. तू **मला** त्यांच्या रेसिपीज् पाठवतेस का ? **तुला** त्या ई-मेल करता येतील ना ? **मला** तर वाटतं की **तुला** इकडेच बोलवावं. तू येशील ना ? **मला** खूप मदत होईल.

सध्या **मला** रेसिपीज् मात्र नक्की पाठव.

तुझी,

केतकी

व्याकरण

## ४ खालील वाक्ये वाचू या आणि त्यांतील सर्वनामे अधोरेखित करू या.

**उदा.** आई मला बोलावते.

मी कष्टाळू आहे, मला काम करायला आवडते.

तुझा मित्र मला ओळखत नाही.

प्रिया त्याला नेहमीच रडवते.

दामले आपल्याला दरवर्षी पूजेला बोलावतात.

ती सायली आहे. ओळखतोस का तू तिला ?

मी तुला पाहते.

ते पुस्तक आहे. त्याला पाय लावू नकोस.

| | |
|---|---|
| मी | मला |
| आम्ही | आम्हाला |
| तू | तुला |
| तुम्ही | तुम्हाला |
| आपण | आपल्याला |
| तो | त्याला |
| ती | तिला |
| ते | त्याला |
| ते, त्या, ती | त्यांना |

## ५ रिकाम्या जागी योग्य ते सर्वनाम भरू या.

क) ती रेवती आहे. आम्ही ------------------- रेवा म्हणतो.
ख) हा सचिन आहे. सगळे जण ------------------- ओळखतात.
ग) तुम्ही खूप छान काम करता. आम्ही ------------------- टी.व्ही.वरच्या मालिकेत रोज पाहतो.
घ) इथे आहेस का तू? तुझी आई ------------------- बोलावते आहे.

## वाचू या.

संवाद

**मिहीर व त्याचे मित्र लपाछपी खेळताहेत. तो त्यांना शोधतोय. त्यांच्यातील हा संवाद.**

**मिहीर** : ए, अनुज, तनय, खाली या नं सगळे! खेळू या काही तरी.
**तनय** : चल, खेळू या आपण. काय खेळायचं पण?
**मिहीर** : अं?... हं! लपाछपी खेळू या.
**तनय** : चालेल. राज्य कुणावर पण? (अनुजवर राज्य येते.)
**अनुज** : छ्या! माझ्यावर राज्य.
**तनय** : दरवेळी आम्हाला चिडवतोस नं! आता बस शोधत.
**अनुज** : ए चल ए, लप जा नीट. मी आकडे मोजतो.
मग एका मिनिटात शोधतो की नाही बघ मी तुम्हाला.
दहा, वीस, तीस, चाळीस, पन्नास, साठ, सत्तर, ऐंशी, नव्वद,
शंभर... हे! सापडले चोर. मी तुम्हाला पाहिलं. मिहिर, तनय, थप्पा!



## ६ रिकाम्या जागी योग्य ते सर्वनाम भरू या.

व्याकरण

अ) तू आम्हाला बोलावलंस का?
आ) मिहीर मित्रांना बोलावतो. मिहीर ----------------- बोलावतो.
इ) तुम्ही लपा. मी ----------------- शोधतो.
ई) बाबा, आई ----------------- बोलावतेय.

## एका कार्यालयामधील 'टोलवाटोलवी'.

संवाद

**सौ. साठे** : माफ करा, सावंतमॅडम कुठे बसतात?
**कर्मचारी १** : त्या आज सुट्टीवर आहेत.
**सौ. साठे** : माझी जरा एक तक्रार आहे.
**कर्मचारी १** : तक्रार? हं, मग काऊंटर २ वर त्या मॅडम आहेत ना, त्यांना सांगा.
**सौ. साठे** : ठीक आहे. (काऊंटर २ वर जाऊन) मॅडम, माझी एक तक्रार आहे.
**कर्मचारी २** : काय हवंय तुम्हाला? मला खूप काम आहे. काऊंटर ३ वर ते सर बसले आहेत ना, त्यांना सांगा काय ते.
**सौ. साठे** : त्यांच्याकडे तक्रार नोंदवता येते का?
**कर्मचारी २** : हो.
**सौ. साठे** : (काऊंटर ३ वर जाऊन) सर, माझी एक तक्रार आहे.

**कर्मचारी ३ :** ओ बाई, आम्हाला लोकांच्या तक्रारी ऐकण्याशिवाय दुसरं काही काम नाही का?
**सौ. साठे :** पण लोकांच्या कामांकरिताच नेमलंय ना तुम्हाला इथे? मला एक तक्रार नोंदवायचीय.
**कर्मचारी ३ :** काऊंटर ५ वर जा मग, त्या मॅडमकडे...
**सौ. साठे :** नक्की काऊंटर ५? तिथे तरी नोंदवून घेतील का माझी तक्रार?
**कर्मचारी ३ :** ...
(सौ. साठे जातात)
**सौ. साठे :** मॅडम, माझी एक तक्रार आहे. ती जरा नोंदवून घ्याल का?
**कर्मचारी १ :** हो, अवश्य. पण आज नाही... उद्या. आता ५ वाजले, कार्यालयाची वेळ संपली. उद्या या.
**सौ. साठे :** हो, अवश्य येईन. आता तर मला एक नाही, चांगल्या दोन तक्रारी नोंदवायच्यायत!

## ७ खालील वाक्यांत सर्वनामांची योग्य रूपे वापरू या.

**सौ. साठे <u>कोणाला</u> शोधतायत?**

सौ. साठे ------------------- शोधतायत. (सावंतमॅडम)

------------------- काम आहे. (मी)

------------------- काम नाही का? (आम्ही)

------------------- काय हवंय? (तुम्ही)

------------------- सौ. साठे भेटत नाहीत (त्या)

## ८ पुढे दिलेली चित्रे आणि संवाद यांच्या जोड्या लावू या.

**संवाद १** ☐

**आनंदी :** आज ट्रेनला किती गर्दी आहे ना!
**बीना :** हल्ली तर ट्रेनला नेहमीच गर्दी असते.
**आनंदी :** हो, पण आज जरा जास्तच गर्दी आहे.
**बीना :** सकाळची वेळ आहे ना! या वेळेला मरणाची गर्दी असते. दुपारी तरी ट्रेन रिकामी असते.
**आनंदी :** पण रविवारी एवढी गर्दी नसते ना गाडीत?
**बीना :** पूर्वी नसायची. आजकाल मेगाब्लॉकमुळे काही सांगता येत नाही. तुम्ही नवीन आला आहात का मुंबईत?

क



**संवाद २** ☐

**अक्षय :** येऽऽऽ, सुट्टी!
**अभय :** त्यात काय वेगळंय? आपल्याला तर दर उन्हाळ्यात सुट्टी असते.
**अक्षय :** म्हणूनच मला उन्हाळा खूप खूप आवडतो.
**अभय :** अरे पण गरम किती होतंय! उन्हाळा आवडतो म्हणे!
**अक्षय :** गरम होतंय, तर पंखा सुरू कर ना! उन्हाळ्यात तर गरम होणारच. उन्हाळ्यात हवा गरम असते ना.

ख



संवाद

## ९ पुढीलपैकी कोणत्या क्रिया आता घडत आहेत नि कोणत्या नेहमी घडत असतात ते ओळखू या.

| | | आता | नेहमी |
|---|---|---|---|
| १. | आज सुट्टी आहे. आज आम्ही चित्रपटाला जातोय. | ☐ | ☐ |
| २. | मी रात्री उशिरापर्यंत जागी असते. | ☐ | ☐ |
| ३. | आज गरम होतंय. | ☐ | ☐ |
| ४. | सिमल्यात नेहमीच थंडी असते. | ☐ | ☐ |
| ५. | हा फोन (दूरध्वनी) बंद असतो. | ☐ | ☐ |
| ६. | प्रांजली आणि मधुर दररोज भांडत असतात. | ☐ | ☐ |
| ७. | संकेत पत्र लिहितोय. | ☐ | ☐ |
| ८. | दर रविवारी बाजारात गोंगाट असतो. | ☐ | ☐ |
| ९. | तो सतत काहीतरी वाचत असतो. | ☐ | ☐ |
| १०. | दर वर्षी आम्हाला मेमध्ये सुट्टी असते. | ☐ | ☐ |

### ‘असणे’ आणि ‘नसणे’ यांची रूपे पाहू या.

| | असणे | नसणे |
|---|---|---|
| मी | असतो | नसतो |
| | असते | नसते |
| आम्ही / आपण | असतो | नसतो |
| तू | असतोस | नसतोस |
| | असतेस | नसतेस |
| तुम्ही / आपण | असता | नसता |
| तो | असतो | नसतो |
| ती | असते | नसते |
| ते | असतं | नसतं |
| ते | असतात | नसतात |
| त्या | | |
| ते | | |

व्याकरण

## १० योग्य वाक्ये तयार करू या.



आइस्क्रीम थंड असतं.
आइस्क्रीम गरम नसतं.



साखर गोड असते.
---------------------------



दही आंबट असतं.
---------------------------



कच्चा बटाटा कडक असतो.
---------------------------

## ११ एक पारशीबावा, रुस्तम, त्यांच्या मराठी मित्राबरोबर मराठी पद्धतीचे खाणे खायला एका उपाहारगृहात जातात. त्यांच्यातील संवाद वाचू या.



**महेश** : रुस्तम, इथे मस्त मराठमोळं जेवण मिळतं. तू काय खाणारंयस? मेन्यूकार्ड बघायचंय?

**रुस्तम** : नको, मला सांग, तू काय घेतोयस? मीपण तेच घेईन.

**महेश** : अं... मी तर थाळी घेणारंय मस्तपैकी.

**रुस्तम** : काय काय असतं रे थाळीत?

**महेश** : थाळीत बरंच काही असतं. दोन भाज्या असतात, एक सुकी आणि एक रस-भाजी असते. भात असतो. आमटी आणि ताक असतं. चपाती, आणि हो, पापडपण असतो तळलेला.

**रुस्तम** : आणि आंबट काय असतं का रे? मला आंबट चीज लय आवडते.

**महेश** : जास्त आंबट बरं नाही, रुस्तमबावा. (दोघे हसतात.) आंबट ना? हं, लोणचं असतं, ताक आणि एक लिंबाची फोडपण असते. तुला ताक आवडतं का?

**रुस्तम** : मला ताक च्यालते नाय, पण लिंबू च्यालते.

**महेश** : अरे पारशीबावा, 'च्यालते' नाही, 'चालतं' म्हणायचं. लिंबू चालतं.

**रुस्तम** : अरे हो, ते लिंबू... हा हा हा. आणि गोडपण भेटेल ना काय थाळीत?

**महेश** : गोड 'भेटेल' नाही, 'मिळेल' म्हणायचं. थाळीत श्रीखंड आणि बासुंदी, दोन्ही असतात. पण मला बासुंदीच जास्त आवडते. मी ती पितो.

**रुस्तम** : मला श्रीखंड लय आवडते. मी श्रीखंड पितो. अरे, माफ कर.. खातो.

**महेश** : हं बरोबर. तुला श्रीखंड खूप आवडतं, तू श्रीखंड खातोस. मला बासुंदी खूप आवडते, मी बासुंदी पितो. राहील ना आता लक्षात?

**रुस्तम** : पोटामध्ये काय जाईल, तर नक्की लक्षात राहील. दोन थाळ्या मागव बरं!

**आज**
बटाटा-भाजी
मटकीची उसळ
रस्सा भाजी
वरण-भात
सोलकढी
श्रीखंड
चपाती/भाकरी

## १२ खालील उतारा ऐकू या आणि वाचू या.

**पासपोर्ट ऑफिस**

भार्गवची कंपनी त्याला लंडनला पाठवतेय. **पण** त्याच्याकडे पासपोर्टच नाहीये. तो इंटरनेटवरून पासपोर्टसाठी अर्ज डाउनलोड करतो. अर्ज **आणि** फोटो घेऊन तो पासपोर्ट-कार्यालयात जातो. तिथे तो रांगेत उभा राहतो **आणि** आपला क्रमांक यायची वाट पाहतो. एक कर्मचारी भार्गवला बोलावतो **आणि** त्याचा अर्ज मागतो. भार्गव त्याला अर्ज **आणि** फोटो देतो. कर्मचारी ते तपासतो, **पण** काही आवश्यक कागदपत्रे नसतात.

कर्मचारी भार्गवला विचारतो, ''अहो, तुमची सगळी कागदपत्रं कुठे आहेत?'' भार्गव आपला अर्ज पुन्हा पुन्हा पाहतो, **पण** कोणती कागदपत्रं नाहीत, हे त्याला कळत नाही. तो कर्मचाऱ्याला विचारतो, ''माफ करा, कोणकोणती कागदपत्रं लागतील अजून?'' कर्मचारी म्हणतो, ''तुमचं मतदार-ओळखपत्र कुठेय? **आणि** रेशनकार्डही नाहीये.'' भार्गव त्याला म्हणतो, ''**पण** हे काय, टेलिफोनचं बिल आहे ना!'' ''अहो, टेलिफोनचं बिल नाही चालत. **पण** आधारकार्ड चालतं, ते आहे का? **आणि** विजेचंच बिल द्या पत्त्याचा पुरावा म्हणून. **आणि** तुमचं अजून एक ओळखपत्रही लागेल. हे सगळं घेऊन या, मगच काम होईल तुमचं.'' **पण** भार्गवला खूप तातडीने पासपोर्ट हवा असतो. तो कर्मचाऱ्याला खूप विनंती करतो. **पण** तो कर्मचारी त्याचे काहीही ऐकत नाही, **आणि** भार्गवला ''कागदपत्रं घेऊन उद्या या'' असे सांगतो.




## १३ वरील उताऱ्याच्या आधारे खालील वाक्यांतील गाळलेल्या जागा भरू या.

१. पासपोर्टसाठी अर्ज, फोटो ------------- काही कागदपत्रे लागतात.

२. भार्गवकडे अर्ज ------------- फोटो आहेत, ------------- कोणतेही ओळखपत्र नाही.

३. भार्गव आपला अर्ज पुन्हा पाहतो, ------------- कोणती कागदपत्रे नाहीत, हे त्याला कळत नाही.

## १४ पासपोर्ट मिळवण्यासाठी काय काय गोष्टी लागतात ते नोंदवू या.

| | |
|---|---|
| १. ------------------------------------- | ४. ------------------------------------- |
| २. ------------------------------------- | ५. ------------------------------------- |
| ३. ------------------------------------- | ६. ------------------------------------- |

## खालील उतारा वाचू या.

**आणि जोशीपण...**

श्री. जोशीपण लंडनला जात आहेत. त्यांच्याकडेपण पासपोर्ट नाहीये. तेपण पासपोर्ट-कार्यालयात अर्ज भरतात. ते रांगेत उभे राहतात आणि आपला क्रमांक यायची वाट पाहतात. एक कर्मचारी त्यांना बोलावतो आणि कागदपत्रे मागतो. जोशी त्याला आपले मतदान-ओळखपत्र देतात. रेशनकार्डपण देतात. कर्मचारी त्यांच्याकडे विजेचे बिल मागतो. जोशी तेपण देतात. काही वेळाने तो कर्मचारी अर्ज आणि फोटो मागतो. पण जोशींनी फोटोच आणलेला नसतो. कर्मचारी जोशी यांनापण 'उद्या या' असे सांगतो.

## १५ खालील वाक्यांत योग्य ठिकाणी 'पण' वापरू या.

१. भार्गव लंडनला जात आहे. जोशी लंडनला जात आहेत.

-------------------------------------------------------------------------------.

२. भार्गवकडे पासपोर्ट नाहीये. जोशी यांच्याकडे पासपोर्ट नाहीये.

-------------------------------------------------------------------------------.

३. भार्गव पासपोर्ट-कार्यालयात अर्ज भरतो. जोशी पासपोर्ट-कार्यालयात अर्ज भरतात.

-------------------------------------------------------------------------------.

४. भार्गव पासपोर्ट काढायला रांगेत उभा राहतो. जोशी पासपोर्ट काढायला रांगेत उभे राहतात.

-------------------------------------------------------------------------------.

५. कर्मचारी भार्गवला 'उद्या या' असे सांगतो. कर्मचारी जोशी यांना 'उद्या या' असे सांगतो.

-------------------------------------------------------------------------------.

## १६ आता 'पण' ऐवजी कंसातील एकेक शब्द वापरून खालील वाक्ये पुन्हा लिहू या.

**(सुद्धा, देखील, ही)**

पण = सुद्धा = ही = देखील

उदा. जोशीपण लंडनला जात आहेत.
जोशीही लंडनला जात आहेत.
जोशीसुद्धा लंडनला जात आहेत.
जोशीदेखील लंडनला जात आहेत.

१. त्यांच्याकडेपण पासपोर्ट नाहीये.

-------------------------------------------------------------------------------.

-------------------------------------------------------------------------------.

-------------------------------------------------------------------------------.

व्याकरण

२. जोशी रेशनकार्डपण देतात.

------------------------------------------------------------------------------------.

------------------------------------------------------------------------------------.

------------------------------------------------------------------------------------.

३. ए, मला उद्या सुट्टी आहे. तुलापण आहे का?

------------------------------------------------------------------------------------.

------------------------------------------------------------------------------------.

------------------------------------------------------------------------------------.

४. पप्पा, जुईलीलापण आइस्क्रीम हवंय.

------------------------------------------------------------------------------------.

------------------------------------------------------------------------------------.

------------------------------------------------------------------------------------.

५. ऋषभपण या रविवारी जर्मनीला जातोय.

------------------------------------------------------------------------------------.

------------------------------------------------------------------------------------.

------------------------------------------------------------------------------------.

**सुनीता आणि रोहिणी या दोघी मैत्रिणी आहेत. त्यांची खाली दिलेली ओळख वाचू या.**

सुनीता लठ्ठ आहे.
सुनीता ठेंगणी आहे. (सुनील ठेंगणा आहे)
सुनीता गरीब आहे.
सुनीता हुशार आहे, पण आळशी आहे.
सुनीता सुरेल आहे.
सुनीता धीट आहे की प्रेमळ आहे?

रोहिणी बारीक आहे.
रोहिणी उंच आहे.
रोहिणी श्रीमंत आहे.
रोहिणी 'हुशार' नाही आहे, पण कष्टाळू आहे.
रोहिणी बेसूर आहे.
रोहिणी घाबरट आहे की रागीट आहे?



काही विशेषणांचे लिंग बदलते.

ती ठेंगणी आहे.
तो ठेंगणा आहे.



व्याकरण

## १७ सुनीता व रोहिणी यांच्या विषयीची विशेषणे शोधून लिहू या.

| सुनीता कशी आहे ? | रोहिणी कशी आहे ? |
|---|---|
| लठ्ठ | बारीक |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

## वाचू या ... चिंटू.




## म्हणी / वाक्प्रचार



खाई त्याला खवखवे
कानामागून आली आणि तिखट झाली
शितावरून भाताची परीक्षा
घरोघरी मातीच्या चुली
खाईन तर तुपाशी, नाही तर उपाशी
कडू कारले, तुपात तळले नि साखरेत घोळले तरी कडू ते कडूच

## करा आणि शिका.

१. तुमच्या मित्राचे आणि आवडत्या शिक्षकाचे वर्णन करा.
२. तुम्ही तुमच्या मित्राबरोबर/मैत्रिणीबरोबर एका उपाहारगृहात जाता, तेथे तुम्ही पदार्थ मागवता. संवाद लिहा.
३. तुम्हाला काय खायला व प्यायला आवडते ते पाच ओळीत लिहा.
४. एका मराठी घरामधील नाश्ता, दुपारचे जेवण व रात्रीचे जेवण यातील पदार्थांची यादी बनवा.

| नाश्ता | दुपारचे जेवण | रात्रीचे जेवण |
|---|---|---|
| ------------------------ | ------------------------ | ------------------------ |
| ------------------------ | ------------------------ | ------------------------ |
| ------------------------ | ------------------------ | ------------------------ |
| ------------------------ | ------------------------ | ------------------------ |
| ------------------------ | ------------------------ | ------------------------ |
| ------------------------ | ------------------------ | ------------------------ |



## ऊकारान्त

### पुल्लिंगी सामान्य नामे

ऊ - ऊ

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| तो चेंडू | ते चेंडू |
| तो खेळाडू | ते खेळाडू |
| तो पेरू | ते पेरू |
| तो लाडू | ते लाडू |
| तो साधू | ते साधू |
| तो खडू | ते खडू |

याचप्रमाणे :
गहू, शत्रू
पण :
तो आसू - ती आसवे

### नपुंसकलिंगी सामान्य नामे

ऊ - ए

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| ते लिंबू | ती लिंबे |
| ते पाखरू | ती पाखरे |
| ते वासरू | ती वासरे |
| ते शिंगरू | ती शिंगरे |
| ते करडू | ती करडे |
| ते पिल्लू | ती पिल्ले |

पण :
ते गळू - ती गळवे,
ते हसू,
ते रडू

**स्त्रीलिंगी सामान्य नामे**

ऊ - वा

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| ती सासू | त्या सासवा |
| ती जाऊ | त्या जावा |
| ती जळू | त्या जळवा |
| ती पिसू | त्या पिसवा |

पण :
वस्तू, बाजू
अनेकवचनात रूप बदलत नाही.



## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो खाद्यपदार्थ (ते -) | ती खाऊगल्ली (त्या खाऊगल्ल्या) | ते कटलेट (ती कटलेट्स) |
| तो डोसा (ते डोसे) | ती पावभाजी | ते पीयूष |
| तो पाव (ते -) | ती पाणीपुरी | ते लिंबू-सरबत |
| तो सामोसा (ते सामोसे) | ती प्लेट (त्या -) | ते सरबत (ती सरबते) |
| तो सराव (ते -) | ती ट्रेन (त्या -) | ते श्रीखंड |
| तो मित्र (ते -) | ती पुरी (त्या पुऱ्या) | ते खाणे (ती खाणी) |
| तो बटाटावडा (ते बटाटेवडे) | ती खिचडी | ते पेय (ती पेये) |
| तो बर्फ | ती पुरणपोळी (त्या पोळ्या) | ते अंडे (ती अंडी) |
| तो प्रकार (ते -) | ती कॉफी | ते बिल (ती बिले) |
| तो पोहा (ते पोहे) | ती उसळ (त्या उसळी) | ते कार्ड (ती कार्डे) |
| तो चहा | ती सोलकढी | ते लोणचे (ती लोणची) |
| तो वार (ते -) | ती चपाती (त्या चपात्या) | ते ताक |
| तो रविवार (ते -) | ती भाकरी (त्या भाकऱ्या) | ते कागदपत्र (ती कागदपत्रे) |
| तो सोमवार (ते -) | ती थाळी (त्या थाळ्या) | ते ओळखपत्र (ती ओळखपत्रे) |
| तो मंगळवार (ते -) | ती वाटी (त्या वाट्या) | |
| तो बुधवार (ते -) | ती सुट्टी (त्या सुट्ट्या) | |
| तो गुरुवार (ते -) | ती लपाछपी | |
| तो शुक्रवार (ते -) | ती तक्रार (त्या तक्रारी) | |
| तो शनिवार (ते -) | ती फोडं (त्या फोडी) | |
| तो भात (ते -) | ती बासुंदी | |
| तो हलवा (ते हलवे) | ती टोलवाटोलवी | |
| तो उन्हाळा (ते उन्हाळे) | | |
| तो शिरा | | |
| तो उशीर | | |
| तो पासपोर्ट (ते -) | | |
| तो कर्मचारी (ते -) | | |
| तो वडा (ते वडे) | | |
| तो पाव (ते -) | | |
| तो उपमा | | |
| तो काउंटर (ते -) | | |

| क्रियापद | विशेषण | | शिष्टाचार शब्द | इतर शब्द |
|---|---|---|---|---|
| बोलावणे | शुद्ध | आळशी | हो, बरोबर | रोज |
| गाणे | लट्ठ | सुरेल | हं | सतत |
| मिळणे | कमी | छान | बरं | उशीर |
| म्हणणे | काही | अजागळ | अरे | उद्या |
| ओळखणे | बरेच | टापटीप | | जोरजोरात |
| निघणे | सडपातळ | अस्वच्छ | | आता |
| | ठेंगू | स्वच्छ | | लवकर |
| | गरम | आंबट | | |
| | थंड | तिखट | | |
| | गरीब | चविष्ट | | |
| | श्रीमंत | खारट | | |
| | हुशार | निरागस | | |

## आता मला हे येतं.

**हॉटेलमध्ये ऑर्डर देणे, बिल मागणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**विविध खाद्यपदार्थांविषयी बोलणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**इतरांचे वर्णन करणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**एखाद्या प्रसंगाचे वर्णन करणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी



# खरेदी ७










## चला, शिकू या...

- गरज व्यक्त करणे
- बाजारात / दुकानात खरेदी करणे
- वस्तूंच्या किंमती सांगणे आणि विचारणे
- वजने आणि मापे
- अंक ५० ते १००




| | |
|---|---|
| हा विद्यार्थी नवीन आहे. | हे विद्यार्थी नवीन आहेत. |
| हा वर्ग लहान आहे. | हे वर्ग लहान आहेत. |
| ही मुलगी छान आहे. | ह्या / या मुली छान आहेत. |
| ही खुर्ची मजबूत आहे. | ह्या / या खुर्च्या मजबूत आहेत. |
| हे मूल शांत आहे. | ही मुले शांत आहेत. |
| हे टेबल लहान आहे. | ही टेबलं लहान आहेत. |

## वाचू या.



**सॅम** : हाय, मीनल ! तुला थोडा वेळ आहे का ?
**मीनल** : हो, आहे की ! काय काम आहे ?
**सॅम** : मला थोडी मदत हवी आहे.
**मीनल** : हो, सांग ना !
**सॅम** : मला थोडी खरेदी करायची आहे.
**मीनल** : तुला काय काय घ्यायचं आहे ?
**सॅम** : कपडे, साबण, टूथपेस्ट आणि रोज लागणारं बरंच काही.
**मीनल** : ठीक आहे. इकडे जवळच एक मॉल आहे. आपण तिकडेच जाऊ म्हणजे... म्हणजे एकाच ठिकाणी सर्व काही मिळून जाईल.
**सॅम** : खूप खूप धन्यवाद !
**मीनल** : धन्यवाद कसले त्यात ? चल, जाऊ या !





हा टी.व्ही. आहे.



ही खुर्ची आहे.



हे सफरचंद आहे.



हा कॉम्प्युटर आहे.



ही बॅग आहे.



हे घड्याळ आहे.



हा चेंडू आहे.



ही गाडी आहे.



हे पुस्तक आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **तो** - त्याला | **हा** - ह्याला / याला | ते | | हे | |
| **ती** - तिला | **ही** - हिला | त्या | त्यांना | ह्या / या | ह्यांना / यांना |
| **ते** - त्याला | **हे** - ह्याला / याला | ती | | ही | |

### आता खालील संवाद वाचू या.

**मीनल** : हा बघ, मॉल आला. तुला जे जे हवंय, ते सारं इथे नक्कीच मिळेल. तुला जे काही घ्यायचंय ते घे.
**सॅम** : अगं, मी सांगायला विसरलो, पण मला आत्ता आज संध्याकाळसाठी भाजी आणि फळंपण घ्यायचीयेत. ती इथे मिळतील का?
**मीनल** : अरे, भाज्या आणि फळं तर इथे मिळत नाहीत.
**सॅम** : मग आता काय करायचं?
**मीनल** : भाजी आणि फळांसाठी समोरच्या गल्लीत भाजीवाले बसतात, तिथे जाऊ या आपण.
**सॅम** : ठीक आहे. चल, जाऊ या.



### 9 हे काय आहे? - ते काय आहे?









| | | |
|---|---|---|
| तो बटाटा - ते बटाटे<br>तो कांदा - ते कांदे<br>तो टोमॅटो - ते टोमॅटो<br>तो फ्लॉवर - ते फ्लॉवर<br>तो पालक - ते पालक<br>तो मटार - ते मटार | ती मिरची - त्या मिरच्या<br>ती काकडी - त्या काकड्या | ते गाजर - ती गाजरे<br>ते वांगे - ती वांगी |

## २ चित्र पाहून वाक्य पूर्ण करू या.

१. पाव-भाजीसाठी फ्लॉवर लागतो.

२. -------------- चिरताना डोळ्यांत पाणी येते.

३. ऐक, जास्त -------------- घालू नकोस.

४. -------------- व्यवस्थित धू.

५. तो -------------- बारीक चीर.

६. ते -------------- उभे चिर. आपण त्याच्या काचऱ्या करू.

७. हे -------------- खा. ते खूप पौष्टिक आहे.



## ३ चला, भाजीवालीकडे जाऊ या.

**अनिता** : अहो मावशी, कसा दिला हा फ्लॉवर?

**भागूबाई** : ७० रुपये किलो.

**अनिता** : अरे बाप रे! जरा भाव कमी करा की मावशी!

**भागूबाई** : महागाई वाढली नं ताई! तुमच्याकडून जास्त नाही घेत.

**अनिता** : फ्लॉवर पाव किलो द्या. कोबी द्या अर्धा किलो आणि थोड्या मिरच्याही द्या.

**कावेरी** : अगं, हा मटार कसा दिला?

**भागूबाई** : मटार २० रुपये पाव हाये (आहे), ताई!

**कावेरी** : ठीक आहे, दे पाव किलो, आणि ही गाजरंपण दे.

**टीना** : बाई, मला कांदे आणि बटाटे द्या - अर्धा अर्धा किलो.

**भागूबाई** : हे घ्या, ताई. अजून काय देऊ तुम्हाला?

**टीना** : काही नको.

**भागूबाई** : ओ ताई, हा पालक बघा किती ताजा हाये, हिरवा हिरवा! मस्तपैकी पालक-पनीर करून द्या राजूला. पालक आज खूपच स्वस्त हाये! फक्त १० रुपये एक जुडी. २५ ला तीन जुड्या देते, घ्या.



संवाद

# ७ खरेदी

शब्द संपदा

## चला, फळं विकत घेऊ या.









| | | |
|---|---|---|
| तो पेरू - ते पेरू | तो अननस - ते अननस | ती पपई - त्या पपई |
| तो चिक्कू - ते चिक्कू | ते संत्रे - ती संत्री | |
| तो आंबा - ते आंबे | ते केळे - ती केळी | |
| | ते सफरचंद - ती सफरचंदे | |
| | ते द्राक्ष - ती द्राक्षे | |
| | ते डाळिंब - ती डाळिंबे | |
| | ते कलिंगड - ती कलिंगडे | |

## ४ चला, संवाद साधू या.

**उदा.** मला मोसंबं आवडतं.

मला मोसंबं आवडतं, पण सफरचंद आवडत नाही. तुला काय आवडतं?

तुला / तुम्हाला काय आवडतं?
तुला / तुम्हाला काय आवडत नाही?
तुला / तुम्हाला काय चालतं / चालत नाही?

आंबा संत्री
पपई पेरू चिक्कू
कलिंगडं मोसंबी
सफरचंद
...

मला ... आवडतं / आवडतात
मला ... आवडत नाही
मला ... चालतं / चालतात
मला ... चालत नाही

| उदा. **शिक्षक/शिक्षिका** | उदा. **शिक्षक/शिक्षिका** |
|---|---|
| भात | मला भात आवडतो, पण चालत नाही. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| भात | मला भात आवडतो, पण चालत नाही. |
| आंबा | मला आंबा आवडतो, पण चालत नाही. |
| चहा | मला चहा आवडतो, पण चालत नाही. |
| पाव | मला पाव आवडतो, पण चालत नाही. |
| डोसा | मला डोसा आवडतो, पण चालत नाही. |
| सामोसा | मला सामोसा आवडतो, पण चालत नाही. |
| फ्लॉवर | मला फ्लॉवर आवडतो, पण चालत नाही. |
| कांदा | मला कांदा आवडतो, पण चालत नाही. |
| चिक्कू | मला चिक्कू आवडतो, पण चालत नाही. |
| बटाटा | मला बटाटा आवडतो, पण चालत नाही. |
| ... | ... |

| उदा. **शिक्षक/शिक्षिका** | उदा. **शिक्षक/शिक्षिका** |
|---|---|
| साखर | मला साखर आवडते, पण चालत नाही. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| साखर | मला साखर आवडते, पण चालत नाही. |
| पपई | मला पपई आवडते, पण चालत नाही. |
| काकडी | मला काकडी आवडते, पण चालत नाही. |
| मिरची | मला मिर्ची आवडते, पण चालत नाही. |
| खिचडी | मला खिचडी आवडते, पण चालत नाही. |
| भाकरी | मला भाकरी आवडते, पण चालत नाही. |
| बासुंदी | मला बासुंदी आवडते, पण चालत नाही. |
| ... | ... |

| उदा. **शिक्षक/शिक्षिका** | उदा. **शिक्षक/शिक्षिका** |
|---|---|
| अंडे | मला अंडे चालते, पण आवडत नाही. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| अंडे | मला अंडे चालते, पण आवडत नाही. |
| लोणचे | मला लोणचे चालते, पण आवडत नाही. |
| कलिंगड | मला कलिंगड चालते, पण आवडत नाही. |
| संत्रे | मला संत्रे चालते, पण आवडत नाही. |
| अननस | मला अननस चालतो, पण आवडत नाही. |
| ... | ... |

सराव

| उदा॰ शिक्षक/शिक्षिका | उदा॰ शिक्षक/शिक्षिका |
|---|---|
| भाज्या | मला भाज्या चालतात, पण आवडत नाहीत. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| भाज्या | मला भाज्या चालतात, पण आवडत नाहीत. |
| काकड्या | मला काकड्या चालतात, पण आवडत नाहीत. |
| मासे | मला मासे चालतात, पण आवडत नाहीत. |
| भाकऱ्या | मला भाकऱ्या चालतात, पण आवडत नाहीत. |
| लोणची | मला लोणची चालतात, पण आवडत नाहीत. |
| संत्री | मला संत्री चालतात, पण आवडत नाहीत. |
| ... | ... |

## ५ खालील परिच्छेद वाचून त्यातले कोणते शब्द तुमच्या परिचयाचे आहेत, सांगू शकाल?

**फॅशन यंगिस्तानची!!**

आजची पिढी आपल्या फॅशनबद्दल खूप जागरूक आहे. कॉलेजमध्ये आपलं स्टाईल स्टेटमेंट काय असेल याची तयारी ही पिढी खूप आधीपासून करते. चला तर मग, बघू या, आपल्या मित्रमैत्रिणी काय तयारी करत आहेत.



**कबीर**

हा आहे माझा नवीन टी-शर्ट आणि या नवीन जीन्स!
हे तपकिरी जॅकेट त्यावर खूप उठून दिसतंय, बॉस!

---------------------

ती जीन्स



तो कुर्ता

**मुक्ता**

हे लेगिंग्ज जुने आहेत, पण त्यावर हा नवीन कुर्ता, हे कानातले आणि ही माळ आणखीनच छान दिसतेय ना!

---------------------



**अनघा आणि शमिका**

आम्हाला स्कर्टस् व शॉर्ट टॉप्स आवडतात. हे डेनिम स्कर्ट्स आणि त्यावर हे रंगीबेरंगी टॉप्स - एकदम झकास कॉम्बीनेशन.

------------------

------------------



**अभय**

झब्बा

हा झब्बा, ही पँट आणि बरोबर ही झोळी!
झब्बा ही आपली स्टाईल आहे.
आणि ही झोळी तर अख्ख्या कॉलेजमध्ये चांगलीच प्रसिद्ध आहे.

-------------------------

संवाद

## ६ वरील कपड्यांची नावे योग्य त्या गटात लिहू या.

| हा | हे | ही | ह्या | हे | ही |
|---|---|---|---|---|---|
| टी-शर्ट | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| | | |
|---|---|---|
| हा / तो कुर्ता - हे / ते कुर्ते | ही / ती ओढणी - ह्या / त्या ओढण्या | हे / ते कानातले - ही / ती कानातली |
| हा / तो मोजा - हे / ते मोजे | ही / ती साडी ह्या / त्या साड्या | हे / ते जॅकेट - ही / ती जॅकेटे |
| हा / तो झब्बा - हे / ते झब्बे | ही / ती सलवार - ह्या / त्या सलवारी | हे / ते लेगिंग्ज - ही / ती लेगिंग्ज |
| हा / तो चुडीदार - हे / ते चुडीदार | ही / ती माळ - ह्या / त्या माळा | |
| हा / तो बूट - हे / ते बूट | ही / ती चप्पल - ह्या / त्या चपला | |
| हा / तो कोट - हे / ते कोट | ही / ती सँडल - ह्या / त्या सँडल | |
| हा / तो शर्ट - हे / ते शर्ट | ही / ती पँट - ह्या / त्या पँट्स | |
| हा / तो टी-शर्ट हे / ते टी-शर्ट | ही / ती जीन्स - ह्या / त्या जीन्स | |
| हा / तो स्कर्ट - हे / ते स्कर्ट | | |
| हा / तो टॉप - हे / ते टॉप | | |

| | | |
|---|---|---|
| (हा) कसा | (ही) कशी | (हे) कसे / कसं |
| (हे) कसे | (या) कशा | (ही) कशी |

शब्द संपदा

## ७ ऐकू या.

**रुही** : अगं आश्लेषा, हा कुर्ता कसा वाटतोय तुला?
**आश्लेषा** : कुठला, तो?
**रुही** : नाही. हा? छान आहे ना?
**आश्लेषा** : हो. छान आहे. पण महाग वाटतोय.
**रुही** : मग तो टॉप बघ. तो कसा वाटतोय?
**आश्लेषा** : मस्तंय गं. एकदम झकास! आणि स्वस्तही आहे.
**रुही** : हो.
**आश्लेषा** : चल, मी हाच टॉप ट्राय करते.
...

संवाद

## ८ खालील कोष्टकांवरून वरीलप्रमाणे संवाद साधू या.

| | | | |
|---|---|---|---|
| तुला | हा / तो | कुर्ता | कसा वाटतोय ? |
| | ही / ती | साडी | कशी वाटतेय ? |
| | हे / ते | जॅकेट | कसं वाटतंय ? |
| | हे / ते | मोजे | कसे वाटतायत ? |
| | या / त्या | सँडल | कशा वाटतायत ? |
| | ही / ती | लेगिंग्ज | कशी वाटतायत ? |
| | | ... | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कुठला, हा / तो ?<br>कुठली, ही / ती ?<br>कुठले, हे / ते ?<br>कुठल्या, या / त्या ? | नाही | हा / तो<br>ही / ती<br>हे / ते<br>या / त्या | हो<br>चालेल<br>पण<br>आणि<br>नको | तो<br>ती<br>ते<br>ते<br>त्या<br>ती | ढगळ<br>लहान<br>महाग<br>स्वस्त<br>सैल<br>घट्ट | लांब<br>छान<br>मस्त<br>सुंदर<br>अप्रतिम<br>झकास | आहे<br>आहेत |



| उदा. **शिक्षक/शिक्षिका** | उदा. **शिक्षक/शिक्षिका** |
|---|---|
| वही, कोरी | ही वही कोरी आहे. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| पुस्तक, जड | हे पुस्तक जड आहे. |
| पेन, छान | हे पेन छान आहे. |
| बॅग, सुंदर | ही बॅग सुंदर आहे. |
| टेबल, लहान | हे टेबल लहान आहे. |
| उशी, मऊ | ही उशी मऊ आहे. |
| टी.व्ही., बंद | हा टी.व्ही. बंद आहे. |
| द्राक्ष, गोड | ही द्राक्षं गोड आहेत. |
| जीवन, सुंदर | हे जीवन सुंदर आहे. |
| ... | ... |

| उदा. **शिक्षक/शिक्षिका** | उदा. **शिक्षक/शिक्षिका** |
|---|---|
| मुलं (खेळणे) | मुलं खेळत आहेत. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| सँडल्स छान (असणे) | ह्या सँडल्स छान आहेत. |
| पत्रकार (लिहिणे) | हा पत्रकार लिहीत आहे. |
| शिक्षिका (शिकवणे) | ही शिक्षिका शिकवत आहे. |
| कॉम्प्युटर व्यवस्थित काम (करणे) | हा कॉम्प्युटर व्यवस्थित काम करत आहे. |
| गाड्या वेगाने (धावणे) | ह्या गाड्या वेगाने धावत आहेत. |
| ओढणी रंगीबेरंगी (असणे) | ही ओढणी रंगीबेरंगी आहे. |
| ... | ... |

## ९ आता ५१ ते १०० अंकांचा सराव करू या.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५१ | एकावन्न | ६१ | एकसष्ट | ७१ | एकाहत्तर | ८१ | एक्याऐंशी | ९१ | एक्याण्णव |
| ५२ | बावन्न | ६२ | बासष्ट | ७२ | बाहत्तर | ८२ | ब्याऐंशी | ९२ | ब्याण्णव |
| ५३ | त्रेपन्न | ६३ | त्रेसष्ट | ७३ | त्र्याहत्तर | ८३ | त्र्याऐंशी | ९३ | त्र्याण्णव |
| ५४ | चौपन्न | ६४ | चौसष्ट | ७४ | चौऱ्याहत्तर | ८४ | चौऱ्याऐंशी | ९४ | चौऱ्याण्णव |
| ५५ | पंचावन्न | ६५ | पासष्ट | ७५ | पंच्याहत्तर | ८५ | पंच्याऐंशी | ९५ | पंचाण्णव |
| ५६ | छप्पन्न | ६६ | सहासष्ट | ७६ | शाहत्तर | ८६ | शाऐंशी | ९६ | शहाण्णव |
| ५७ | सत्तावन्न | ६७ | सदुसष्ट | ७७ | सत्त्याहत्तर | ८७ | सत्त्याऐंशी | ९७ | सत्त्याण्णव |
| ५८ | अठ्ठावन्न | ६८ | अडुसष्ट | ७८ | अठ्ठ्याहत्तर | ८८ | अठ्ठ्याऐंशी | ९८ | अठ्ठ्याण्णव |
| ५९ | एकोणसाठ | ६९ | एकोणसत्तर | ७९ | एकोणऐंशी | ८९ | एकोणनव्वद | ९९ | नव्याण्णव |
| ६० | साठ | ७० | सत्तर | ८० | ऐंशी | ९० | नव्वद | १०० | शंभर |



## १० चित्रांतील वस्तूंच्या किंमती वाचू या.



स्टीलची वाटी



कानातले



दूध



सफरचंदे



टोमॅटो



दही



गॉगल्स



फ्लॉवर



पाव



रुमाल

## ११ वरील चित्रे पाहून जोड्या लावू या.

| | वस्तू | | किंमती (रु.) |
|---|---|---|---|
| १ | दोन पाव | क | तीस |
| २ | १ किलो टोमॅटो | ख | सदुसष्ठ |
| ३ | अर्धा किलो दही | ग | सत्तर |
| ४ | स्टीलची वाटी | घ | साठ |
| ५ | २ लिटर दूध | च | पंच्याऐंशी |
| ६ | १ किलो फ्लॉवर | छ | शंभर |
| ७ | अर्धा डझन रुमाल | ज | चौसष्ठ |
| ८ | गॉगल्स | झ | अठ्ठावन्न |
| ९ | १ किलो सफरचंदे | ट | नव्याण्णव |
| १० | कानातले | ठ | ऐंशी |

## १२ चला, खेळू अंकांशी.

| | | |
|---|---|---|
| बेरीज | ३ + (अधिक) ४ = (बरोबर) ७ | ही आहे बेरीज |
| वजाबाकी | १९ - (वजा) १० = (बरोबर) ९ | ही आहे वजाबाकी |

## वाचू या.

संवाद

**प्रभव** - अगं सानिका, आज वर्गात काय केलंत ?

**सानिका** - अरे, काही खास नाही रे. मीही आज तशी उशिराच आले.

**प्रभव** - तू किती वाजता पोहोचलीस ? आणि आजचा तास कितीचा होता ?

**सानिका** - मी तर **दहा वाजता** पोहोचले, पण आज तास **नऊचा** होता.
माझी नेहमीची गाडी चुकली रे !

**प्रभव** - तू नेहमी कितीची गाडी पकडतेस ?

**सानिका** - अं... साधारण **सात बत्तीसची.**

**प्रभव** - बाप रे ! एवढ्या लवकर निघतेस तू रोज ? तुला कॉलेजला पोहोचायला किती वेळ लागतो ?

**सानिका** - हो रे ! मला **एक तास पंचेचाळीस मिनिटं** लागतात. **सात पंचावन्नचीपण** चालते मला,
पण त्या गाडीला खूप गर्दी असते.

**प्रभव** - बरं. आणि उद्याचं काय ?
उद्या नक्की **आठचा** तास आहे ना ?

**सानिका** - हो. उद्या भेटू.

**प्रभव** - ओ.के. उद्या भेटू.


**सानिका** - नक्की.


> १ दिवस म्हणजे २४ तास
> १ तास म्हणजे ६० मिनिटे/मिनिटं/मिनिट
> १ मिनिट म्हणजे ६० सेकंदे/सेकंदं/सेकंद

## १३ जोड्या लावू या.

| | |
|---|---|
| ९ : १५ : ५९ | १. अकरा वाजून पंचेचाळीस मिनिटे आणि पन्नास सेकंद. |
| ११ : ४५ : ५० | २. पाच वाजून चाळीस मिनिटे आणि वीस सेकंद. |
| ५ : ४० : २० | ३. सात वाजून तीन मिनिटे आणि चौतीस सेकंद. |
| ७ : ०३ : ३४ | ४. सहा वाजून छप्पन्न मिनिटे आणि बत्तीस सेकंद. |
| ६ : ५६ : ३२ | ५. नऊ वाजून पंधरा मिनिटे आणि एकोणसाठ सेकंद. |

## वाचू या ... चिंटू.





### म्हणी / वाक्प्रचार

डोक्यात कांदे - बटाटे भरलेले असणे
कोल्ह्याला द्राक्षं आंबट
छप्पन्न .... असणे
नाकाला मिरच्या झोंबणे
ढब्बू बटाटा
साठी बुद्धी नाठी

### उपमा

सफरचंदासारखे गाल
टोमॅटोसारखे लालबुंद गाल
डाळिंबासारखे ओठ



## करा आणि शिका

१. तुमच्या आवडीच्या पाच भाज्यांची व फळांची नावे आणि भाव मराठीत लिहा.

२. वर्गात काही फळे व भाज्या आणा आणि त्यांची नावे पुढीलप्रमाणे सांगा.

तो बटाटा, ते बटाटे...

३. खरेदी करताना मराठीत बोला.



## एकारान्त नामे

**नपुंसकलिंगी सामान्य नामे**

ए - ई

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| ते रताळे | ती रताळी |
| ते कारले | ती कारली |
| ते वांगे | ती वांगी |
| ते डोके | ती डोकी |
| ते केळे | ती केळी |
| ते बोचके | ती बोचकी |

## ओकारान्त नामे

**पुल्लिंगी सामान्य नामे**

तो धनको - ते धनको, तो ऋणको - ते ऋणको

**स्त्रीलिंगी सामान्य नामे**

ती बायको - त्या बायका

ही तीनच ओकारान्त नामे मराठीत वापरात आहेत.

## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो कपडा (ते कपडे) | ती मदत | ते ठिकाण (ती ठिकाणे) |
| तो साबण (ते -) | ती खरेदी | ते फळ (ती फळे) |
| तो मॉल (ते -) | ती गाडी (त्या गाड्या) | ते मिनिट (ती मिनिटे) |
| तो रुपया (ते रुपये) | ती गल्ली (त्या गल्ल्या) | ते गाजर (ती गाजरे) |
| तो चेंडू (ते -) | ती भाजीवाली (त्या भाजीवाल्या) | ते केळे (ती केळी) |
| तो भाजीवाला (ते भाजीवाले) | ती काकडी (त्या काकड्या) | ते मोसंबे (ती मोसंबी) |
| तो टोमॅटो (ते -) | ती मिरची (त्या मिरच्या) | ते डाळिंब (ती डाळिंबे) |
| तो बटाटा (ते बटाटे) | ती पपई (त्या पपया) | ते कलिंगड (ती कलिंगडे) |
| तो फ्लॉवर (ते -) | ती पिढी (त्या पिढ्या) | ते संत्रे (ती संत्री) |
| तो मटार (ते -) | ती फॅशन | ते द्राक्ष (ती द्राक्षे) |
| तो वाटाणा (ते वाटाणे) | ती माळ (त्या माळा) | ते कानातले (ती कानातली) |
| तो कांदा (ते कांदे) | ती पँट (त्या -) | ते टेबल (ती टेबले) |
| तो पालक (ते -) | ती झोळी (त्या झोळ्या) | ते दही |
| तो कोबी (ते -) | ती साडी (त्या साड्या) | ते दूध |
| तो चिक्कू (ते -) | ती चप्पल (त्या चपला) | ते सेकंद (ती सेकंदे/सेकंद) |
| तो पेरू (ते -) | ती सलवार (त्या सलवारी) | |
| तो आंबा (ते आंबे) | ती ओढणी (त्या ओढण्या) | |
| तो झब्बा (ते झब्बे) | ती जीन्स (त्या -) | |
| तो बूट (ते -) | ती सँडल (त्या -) | |
| तो कुर्ता (ते कुर्ते) | ती मोटरसायकल (त्या मोटारसायकली) | |
| तो टॉप (ते टॉप्स) | ती स्कूटर (त्या -) | |
| तो रुमाल (ते -) | ती सी.डी. (त्या -) | |
| तो पैसा (ते पैसे) | ती खुर्ची (त्या खुर्च्या) | |
| तो मोजा (ते मोजे) | ती बॅग (त्या बॅगा) | |
| तो शर्ट (ते -) | | |
| तो टी-शर्ट (ते -) | | |
| तो स्कर्ट (ते -) | | |
| तो कोट (ते -) | | |
| तो चुडीदार (ते -) | | |
| तो उतारा (ते उतारे) | | |
| तो तास (ते -) | | |
| तो दिवस (ते -) | | |

| क्रियापद | विशेषण | | इतर शब्द |
|---|---|---|---|
| हवे असणे | नवीन | सुंदर | किलो |
| लागणे | मजबूत | स्वस्त | लिटर |
| विसरणे | शांत | सैल | डझन |
| | राखाडी | अप्रतिम | अधिक |
| | जुने | घट्ट | वजा |
| | ढगळ | लांब | |
| | महाग | झकास | |
| | | मऊ | |

## आता मला हे येतं.

**गरज व्यक्त करणे.**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**बाजारात, दुकानात खरेदी करणे.**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**वस्तूंच्या किंमती सांगणे आणि विचारणे.**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**वजने आणि मापे.**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**अंक ५१ ते १००**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी



# लक्षात ठेवा ८



## चला, शिकू या...


- आज्ञा देणे
- विनंती करणे
- सावध करणे
- परवानगी देणे / नाकारणे
- आभार मानणे
- सूचना देणे
- सल्ला मागणे / देणे
- मूल्ये

# ८ लक्षात ठेवा

ते ने...
ते घे...
ते ठेव...
लक्ष दे...
शांत बस...
गप्प रहा...
हात काढ...
लक्षात ठेव...
भरभर चाल...
लगेच इथे ये...
ओरडू नकोस...
पटपट आवर...
असं करू नकोस...
तसं करू नकोस...
ते लगेच तिथे ठेव...
ते लगेच इथे आण...
कपडे मळवू नकोस...
ते लगेच परत आण...
तुला कळत नाही का...
बरबटवून घेऊ नकोस...
ते तोंडात घालू नकोस...
तुला ऐकू येत नाही का...
त्याला हात लावू नकोस...
... गप्प बस...

(जर्मन कवी उवं टीम यांच्या 'संगोपन' या कवितेवर आधारित)

## १ खालील संवाद ऐकू या व वाचू या.



**बाबा** : अरे क्षितिज, जरा बाहेर ये.

**क्षितिज** : काय बाबा ?

**बाबा** : आधी तो अस्ताव्यस्त पडलेला पेपर* (वृत्तपत्र) उचल बरं ! ती खिडकी उघड, पंखाही लाव आणि एक काम कर. जरा शीलाला पाठव.

**क्षितिज** : हो बाबा.

(शीला येते.)

**बाबा** : शीला, अगं, तू माझं ते पुस्तक घेतलं होतंस, ते दे बरं लगेच. आणि ऐक, आईला सांग, चहा कर.

(आई येते.)

**आई** : अहो, हा चहा घ्या. आणि एक काम करा.

**बाबा** : हं, बोल. काय काम आहे ?

**आई** : ५ लिटर दूध आणा.

**बाबा** : ५ लिटर ?

**आई** : आणि हो, दूध मसाला आणि सुका मेवाही आणा.

**बाबा** : अरे व्वा ! बासुंदी करणारेस वाटतं ! आणतो.



*औपचारिक मराठीत 'पेपर'ला वृत्तपत्र असे म्हणतात.

| | तू | तुम्ही |
|---|---|---|
| करणे | कर | करा |
| बोलणे | बोल | बोला |
| सांगणे | सांग | सांगा |

संवाद

## २ खालील तक्ता भरू या.

| | | तू | तुम्ही |
|---|---|---|---|
| करणे | करणे | कर | करा |
| उघडणे | उघडणे | उघड | उघडा |
| सांगणे | सांगणे | सांग | -------------- |
| लावणे | लावणे | ------------- | लावा |
| काढणे | काढणे | -------------- | -------------- |
| ठेवणे | ठेवणे | ------------ | -------------- |
| उचलणे | उचलणे | -------------- | -------------- |
| येणे | येणे | ये | या |

## ३ जोड्या जुळवून वाक्ये बनवू या.

| | |
|---|---|
| तू | ये / या<br>उघड / उघडा<br>सांग / सांगा<br>लाव / लावा |
| तुम्ही | कर/ करा<br>काढ/ काढा<br>ठेव/ ठेवा<br>उचल/ उचला |

------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------



| उदा. **शिक्षक/शिक्षिका** (नीट) बोलणे | उदा. **शिक्षक/शिक्षिका** नीट बोल. |
|---|---|
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| बोलणे | नीट बोल. |
| आणणे | नीट आण. |
| उठणे | नीट ऊठ. |
| खेळणे | नीट खेळ. |
| नाचणे | नीट नाच. |
| शिकवणे | नीट शिकव. |
| बघणे | नीट बघ. |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| (पटकन) बसणे | पटकन बसा. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| बोलणे | पटकन बोला. |
| आणणे | पटकन आणा. |
| उठणे | पटकन उठा. |
| झोपणे | पटकन झोपा. |
| वाचणे | पटकन वाचा. |
| सांगणे | पटकन सांगा. |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| बसणे (तुम्ही) | तुम्ही बसा. |
| बसणे (तू) | तू बस. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| बोलणे (तू) | तू बोल. |
| आणणे (तू) | तू आण. |
| उठणे (तुम्ही) | तुम्ही उठा. |
| खेळणे (तू) | तू खेळ. |
| नाचणे (तुम्ही) | तुम्ही नाचा. |
| शिकवणे (तुम्ही) | तुम्ही शिकवा. |
| बघणे (तू) | तू बघ. |
| ... | ... |



## ४ चला, शेफ राजाध्यक्षांकडून बटाटावड्याची पाककृती शिकू या.

**बटाटावडा साहित्य :-**

अर्धा किलो बटाटे
अर्धा इंच आले,
७-८ पाकळ्या लसूण
४ हिरव्या मिरच्या
कोथिंबीर
बेसन,
लाल तिखट,
हळद,
मीठ,
तळण्यासाठी तेल.





**कृती :-**

बटाटे उकडा. मग सालं काढून ते कुस्करा. आलं, लसूण आणि मिरची यांचं एकत्र वाटण तयार करा. कोथिंबीर बारीक चिरा.आता ते वाटण, बटाटे, कोथिंबीर, हळद आणि मीठ एकत्र मळा. ह्या मिश्रणाचे चपटे गोळे करा. बेसनात लाल तिखट, हळद आणि मीठ घाला. थोड्याशा पाण्यात बेसनाचं दाट मिश्रण करा.
कढईत तेल तापवा. बटाट्याचे गोळे बेसनाच्या मिश्रणात घोळवा आणि मग गरम तेलात लालसर होईपर्यंत तळा.

## ५ खालील प्रश्नांची उत्तरे लिहू या.

१. शेफ राजाध्यक्ष कोणता पदार्थ बनवत आहेत?

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------.

२. ते कोणकोणते पदार्थ वापरत आहेत?

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------.

३. ते बटाट्याच्या गोळ्यांचे काय करत आहेत?

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------.

## ६ बटाटावडा कसा बनवतात ते मित्राला / मैत्रिणीला सांगू या.

बटाटे उकड. मग सालं काढून ते कुस्कर...

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

शब्द संपदा

## ७ भारतीची गडबड पाहू या आणि खालील संवादातील आज्ञार्थी क्रियापदे ओळखून अधोरेखित करू या.

**आई** - अगं भारती, किती हा उशीर! जेव पटापट.
**भारती** - मला जरा भाजी वाढ ना!
**आई** - ही घे. आणि आता जरा भरभर खातेस का? उशीर होतोय कॉलेजला.
**भारती** - आई, उद्या आम्ही मैत्रिणी खरेदीला जातोय. पाचशे रुपये दे ना!
**आई** - भारती, पैसे वगैरे बाबांकडे माग.
**भारती** - असं काय आई! तूच घे ना बाबांकडून, आणि मला दे.
**आई** - बरं बरं. ऊठ आता आणि हात धू.
(आई बाबांकडे जाते.)
**आई** - अहो, भारतीला थोडे पैसे हवेयत. देता का? (बाबा देतात)
**आई** - (भारतीला) हे घे पैसे.
**भारती** - थँक यू आई! आता जरा माझी बॅग देतेस का आई?
**आई** - अगं, कधीतरी स्वत:ची कामं स्वत: कर!
**भारती** - आई, दे ना, प्लीज. उशीर होतोय मला.
**आई** - बाई गं, ही घे, आणि नीघ आता. आणि संध्याकाळी पालेभाजी आण. नीट जा गं! पळू नकोस. आणि कॉलेजला पोचलीस की फोन कर.



व्याकरण

| क्रियापद | तुम्ही | तू | |
|---|---|---|---|
| | | पु. | स्त्री. |
| करणे | करता का ? | करतोस का ? | करतेस का ? |
| देणे | देता का ? | देतोस का ? | देतेस का ? |

## ८ वरील संवादातील क्रियापदे शोधू या आणि त्याचे विनंतीरूप लिहू या.

| क्रियापद | विनंतीरूप | | |
|---|---|---|---|
| | तुम्ही | तू | |
| | | पु. | स्त्री. |
| करणे | ---------------- | करतोस का ? | ---------------- |
| ---------------- | ---------------- | ---------------- | ---------------- |
| आणणे | ---------------- | ---------------- | ---------------- |
| ---------------- | ---------------- | ---------------- | ---------------- |
| ---------------- | ---------------- | ---------------- | ---------------- |

| | |
|---|---|
| उदा. **शिक्षक/शिक्षिका**<br>बाबा, मला मदत करा. | उदा. **शिक्षक/शिक्षिका**<br>बाबा, मला मदत करता का ? |
| **शिक्षक/शिक्षिका**<br>मुलांनो, शांत बसा.<br>तुम्ही कागदपत्रे ठेवा.<br>आपण हळू बोला.<br>तुम्ही ते चित्र बघा.<br>तुम्ही दार लावा.<br>आपण गोष्ट सांगा.<br>... | **विद्यार्थी/विद्यार्थिनी**<br>मुलांनो, शांत बसता का ?<br>तुम्ही कागदपत्रे ठेवता का ?<br>आपण हळू बोलता का ?<br>तुम्ही ते चित्र बघता का ?<br>तुम्ही दार लावता का ?<br>आपण गोष्ट सांगता का ?<br>... |

| | |
|---|---|
| उदा. **शिक्षक/शिक्षिका**<br>मीता, मला पुस्तक दे. | उदा. **शिक्षक/शिक्षिका**<br>मीता, मला पुस्तक देतेस का ? |
| **शिक्षक/शिक्षिका**<br>मीता, माझं काम कर.<br>मीता, आईला बोलाव.<br>मीता, गोष्ट सांग.<br>मीता, तिला पकड.<br>मीता, दार लाव.<br>मीता, चित्र काढ.<br>... | **विद्यार्थी/विद्यार्थिनी**<br>मीता, माझं काम करतेस का ?<br>मीता, आईला बोलावतेस का ?<br>मीता, गोष्ट सांगतेस का ?<br>मीता, तिला पकडतेस का ?<br>मीता, दार लावतेस का ?<br>मीता, चित्र काढतेस का ?<br>... |

| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| --- | --- |
| मीत, मला पुस्तक दे. | मीत, मला पुस्तक देतोस का? |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| मीत, माझं काम कर. | मीत, माझं काम करतोस का? |
| मीत, आईला बोलाव. | मीत, आईला बोलावतोस का? |
| मीत, गोष्ट सांग. | मीत, गोष्ट सांगतोस का? |
| मीत, तिला पकड. | मीत, तिला पकडतोस का? |
| मीत, दार लाव. | मीत, दार लावतोस का? |
| मीत, चित्र काढ. | मीत, चित्र काढतोस का? |
| ... | ... |

| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| --- | --- |
| क्षितिज, मला मदत कर. | क्षितिज, मला मदत करतोस का? |
| श्रेया, मला मदत कर. | श्रेया, मला मदत करतेस का? |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| आई, मला पैसे दे. | आई, मला पैसे देतेस का? |
| महेश, ते पुस्तक आण. | महेश, ते पुस्तक आणतोस का? |
| श्रुती, लवकर पळ. | श्रुती, लवकर पळतेस का? |
| मदन, चष्मा धर. | मदन, चष्मा धरतोस का? |
| जुईली, नेहाला बोलाव. | जुईली, नेहाला बोलावतेस का? |
| अद्वैत, आईस्क्रीम काढ. | अद्वैत, आईस्क्रीम काढतोस का? |
| ... | ... |

सराव

## ९ योग्य ठिकाणी 'बरं' किंवा 'ना' वापरता येईल?

उदा॰ (सूचना)




उदा॰ (विनंती)




१. मुलांनो, फार रात्र झालीये. आता झोपा -------------
२. मला अंधाराची भीती वाटते. तूपण माझ्यासोबत ये -------------
३. मला हे गणित समजत नाहीये. तू मला समजावून दे -------------
४. खूप उशीर होतोय मला. आज तुम्ही सोडा -------------
५. किती पसारा आहे हा! सगळा आवर -------------

विनंती - 'ना'
सूचना - 'बरं'
पण कधी कधी आवाजातील चढ-उताराप्रमाणे अर्थ बदलतो.

## १० चला, समस्यांसाठी सल्ले देऊ.

| समस्या | सल्ला |
|---|---|
| १. मला बद्धकोष्ठ आहे. | अ. प्रेमाने समजाव. |
| २. मी बचत करू शकत नाही. | ब. लक्ष देऊ नकोस. |
| ३. मला जुलाब होतायत. | क. भाज्या खा. |
| ४. माझी मुले माझे ऐकत नाहीत. | ड. इतका खर्च करू नकोस. |
| ५. माझा साहेब खडूस आहे. | इ. खूप पाणी पी. |

## सौ. टिळक आपल्या मुलीबरोबर खरेदीला जातात. त्यांचा खालील संवाद वाचू या.

**विक्रेता** : या! ताई, या! काय दाखवू?
**सौ. टिळक** : आम्हाला चांगल्या चपला दाखवा. ही माझी मुलगी. हिचं पुढच्या महिन्यात लग्न आहे.
**विक्रेता** : असं करा,आत जा. अरे नरेंद्र, जरा ताईंना चांगल्या चपला दाखव. (आत जातात.)
**नरेंद्र** : या ताई!
**सौ. टिळक** : नरेंद्र, बाबा रे, चांगल्या चपला दाखव, लग्नासाठी हव्यात.
**नरेंद्र** : ह्या बघा बरं कशा वाटतात?
**सौ. टिळक** : जरा ती उंच टाचांची, नक्षीदार, सोनेरी सँडल काढ बरं!
**नरेंद्र** : कोणती? ती दुसऱ्या रांगेतली ना! काढतो! तोवर तुम्ही सरबत घ्या! पण ही सँडल आहे. चालेल ना! ही घ्या!
**सौ. टिळक** : अरे वा! छान आहे की! ही बाजूला ठेव आणि आता मखमली चप्पल दाखव.
**नरेंद्र** : ही पाहा.
**सौ. टिळक** : जरा घालून पाहा गं सुमन! सरबत पिऊन झालं नं!
**सुमन** : आई, या चंदेरी चपलेवरचं जरीकाम किती छान आहे ना! हीच घे. मला या दोन्ही चपला हव्यात. काका, मला हे दोन्ही जोड बांधून द्या. किती झाले?
**नरेंद्र** : १,८०० रुपये झाले.
**सौ. टिळक** : हे घ्या. अच्छा. धन्यवाद
**नरेंद्र** : बरं. पुन्हा या हं.



**थोडक्यात**

| | तू | तुम्ही |
|---|---|---|
| येणे | ये | या |
| घेणे | घे | घ्या |
| देणे | दे | द्या |
| नेणे | ने | न्या |
| पिणे | पी | प्या |

संभाषण

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>तू-घरी-येतोस का ? | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>तू घरी ये. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| तू शाळेत येतोस का ? | तू शाळेत ये. |
| तू पैसे नेतेस का ? | तू पैसे ने. |
| तू पुस्तक नेतोस का ? | तू पुस्तक ने. |
| तू सरबत घेतोस का ? | तू सरबत घे. |
| तू जेवण घेतेस का ? | तू जेवण घे. |
| तू पाणी पितोस का ? | तू पाणी पी. |
| तू चहा पितेस का ? | तू चहा पी. |
| तू पैसे देतोस का ? | तू पैसे दे. |
| तू कागद देतेस का ? | तू कागद दे. |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>तुम्ही घरी येता का ? | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>तुम्ही घरी या. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| तुम्ही ऑफिसला जाता का ? | तुम्ही ऑफिसला जा. |
| तुम्ही पैसे नेता का ? | तुम्ही पैसे न्या. |
| तुम्ही पुस्तक नेता का ? | तुम्ही पुस्तक न्या. |
| तुम्ही सरबत घेता का ? | तुम्ही सरबत घ्या. |
| तुम्ही जेवण घेता का ? | तुम्ही जेवण घ्या. |
| तुम्ही पाणी पिता का ? | तुम्ही पाणी प्या. |
| तुम्ही चहा पिता का ? | तुम्ही चहा प्या. |
| तुम्ही पैसे देता का ? | तुम्ही पैसे द्या. |
| तुम्ही कागद देता का ? | तुम्ही कागद द्या. |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>तुम्ही घरी येता का ? | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>तुम्ही घरी या. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| तुम्ही ऑफिसला जाता का ? | तुम्ही ऑफिसला जा. |
| तुम्ही पैसे नेता का ? | तुम्ही पैसे न्या. |
| तू पुस्तक वाचतोस का ? | तू पुस्तक वाच. |
| तुम्ही सरबत घेता का ? | तुम्ही सरबत घ्या. |
| तू जेवण घेतेस का ? | तू जेवण घे. |
| तुम्ही पाणी पिता का ? | तुम्ही पाणी प्या. |
| तू चहा पितोस का ? | तू चहा पी. |
| तुम्ही पैसे देता का ? | तुम्ही पैसे द्या. |
| तू कागद देतेस का ? | तू कागद दे. |
| ... | ... |

## वाचू या.

**सुबोध सिंगापूरला प्रथमच जात आहे. त्यासाठी त्याला आपल्या मित्राचा सल्ला हवा आहे. म्हणून प्रतीक सुबोधला सिंगापूरमध्ये काय काय करायचंय याचा सल्ला देत आहे.**

**सुबोध :** यार प्रतीक, मी सिंगापूरला चाललोय. फिरायला. पण मला तिथली (त्या देशाची) काहीच माहिती नाही. तुला तर बरीच माहिती आहे ना? मला जरा सांग ना, कुठेकुठे जाऊ ते.

**प्रतीक :** सिंगापूर एकदम झकास देश आहे. तिथे खरेदीपण खूप करता येते.

**सुबोध :** हो का? अरे वा!

**प्रतीक :** तू उतरणार आहेस कुठे? यूथ होस्टेल एकदम छान आहे. स्वस्त आणि मस्त. विमानतळापासून फक्त एका तासाच्या अंतरावर आहे. बिनधास्त टॅक्सीने जा. तिथेच राहा. सिंगापूर दर्शनची पुस्तिका तिथे असतेच. ती माग. ती सतत सोबत ठेव. त्यात सर्व माहिती असते. टॅक्सी, बस, रेल्वे, दवाखाने, हॉटेलं या सगळ्यांच्या वेळा, फोन क्रमांक, अंतरं वगैरे... तुला त्याचा खूप उपयोग होईल.

**सुबोध :** हो नक्कीच. आताही मी नेटवरून माहिती गोळा करतोच आहे.

**प्रतीक :** छान! तू तिथे काटकसरीने राहा. रोज सकाळीच घरातून नीघ. रोज वेगवेगळ्या ठिकाणी नाश्ता कर. त्यानंतर रोज सकाळी किमान २ ठिकाणे पाहा. मगच जेवण कर. संध्याकाळी समुद्रावर सूर्यास्त बघ. पावसात मनसोक्त भीज. पण नंतर नीट डोकं पूस, तुला सवय नाहीये पावसात भिजायची.



**सुबोध :** (हसत) अरे बाबा, बस कर! तू तर माझ्या आईपेक्षा जास्त सूचना देतोयस! अजून काही बाकी आहे?

**प्रतीक :** हो, आहे तर! कुठे फिरायचं ते कुठे सांगितलंय अजून? सिंगापूरला बरीच ठिकाणं आहेत फिरण्यासारखी. तू खूप **फीर**. सेंटोसा आयलंड, ज्युरॉंग बर्ड पार्क आणि मेरलायन नक्कीच **पाहा**. भरपूर फोटो काढ आणि मला पाठव.

**सुबोध :** हो, नक्कीच.

**प्रतीक :** आणि ऐक! सिंगापूरला विविध प्रकारच्या फळांचे रस चांगले मिळतात. माशांचेही चांगले-चांगले पदार्थ मिळतात. तू ते खा आणि कसे करतात ते **शीक**.

**सुबोध :** बरं बाबा, हेपण करतो

**प्रतीक :** मीपण तुला माझ्याकडचे तपशील मेल करतोच. कधी निघणारेस?

**सुबोध :** अजून पंधरा दिवसांनी. एक मार्चला. रात्रीचं विमान आहे.

**प्रतीक :** घरून ३ तास तरी आधी **नीघ** आणि विमानतळावर किमान २ तास आधी पोहोच.

**सुबोध :** ठीक आहे. धन्यवाद, प्रतीक.

**प्रतीक :** अच्छा. मजा कर.
(फोन ठेवल्यावर)

**सुबोध :** किती पकवतो हा प्रतीक!




**११ वरील दिलेल्या संवादात काही शब्द रंगीत केले आहेत. त्या शब्दांचे मूळ क्रियापद ओळखता येईल?**

| रंगीत शब्द | क्रियापदाचे मूळ रूप |
|---|---|
| ---------------------------------- | ---------------------------------- |
| ---------------------------------- | ---------------------------------- |
| ---------------------------------- | ---------------------------------- |

व्याकरण

थोडक्यात

| | तू | तुम्ही |
|---|---|---|
| शिकणे | शीक | शिका |
| फिरणे | फीर | फिरा |
| भिजणे | भीज | भिजा |

थोडक्यात

| | तू / तुम्ही |
|---|---|
| राहणे | राहा / रहा |
| पाहणे | पाहा / पहा |
| वाहणे | वाहा / वहा |



**शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा.**

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर

सराव

| | |
|---|---|
| उदा० **शिक्षक/शिक्षिका**<br>तू काम शिकतोस का ?<br>तू काम शिकतेस का ? | उदा० **शिक्षक/शिक्षिका**<br>तू काम शीक. |
| **शिक्षक/शिक्षिका**<br>सतीश, लवकर उठतोस का ?<br>आई, रोहिणीला जीन्स देतेस का ?<br>बाई, मला शिकवता का ?<br>नीरज, भाजी चिरतोस का ?<br>रवी, पत्र लिहितोस का ?<br>तुम्ही देशभर फिरता का ?<br>... | **विद्यार्थी/विद्यार्थिनी**<br>सतीश, लवकर ऊठ.<br>आई, रोहिणीला जीन्स दे.<br>बाई, जरा मला शिकवा.<br>नीरज, भाजी चीर.<br>रवी, पत्र लिही.<br>तुम्ही देशभर फिरा.<br>... |

**ऐका, ग्राहकहो, ऐका.**

**ग्राहकांसाठी एक सूचना**

वस्तू नीट बघा आणि मगच घ्या. वस्तूंची योग्य तीच किंमत द्या. दुकानदाराला जास्त पैसे देऊ नका.
खरेदीला कापडी पिशवी न्या.
दुकानदाराकडून प्लास्टिकची पिशवी घेऊ नका.
दुकानात गर्दी करू नका. आपल्या वस्तू सांभाळा.

जागा हो, ग्राहका, जागा हो.



**'नाही' म्हणा!**

| | | तू | तुम्ही |
|---|---|---|---|
| जाणे | जा + ऊ | जाऊ नकोस | जाऊ नका |
| खाणे | खा + ऊ | खाऊ नकोस | खाऊ नका |
| करणे | कर + ऊ | करू नकोस | करू नका |

थोडक्यात



| | होकारार्थी<br>तू / तुम्ही | नकारार्थी<br>तू / तुम्ही |
|---|---|---|
| घेणे | घे / घ्या | घेऊ नकोस / नका |
| देणे | दे / द्या | देऊ नकोस / नका |
| करणे | कर / करा | करू नकोस / नका |
| सांभाळणे | सांभाळ / सांभाळा | सांभाळू नकोस / नका |



## १२ खालील तक्ता भरा बरं!

| | | तू | तुम्ही |
|---|---|---|---|
| न करणे | | | |
| न खेळणे | खेळू | नकोस | |
| न येणे | | | |
| न बोलणे | | | |
| न नेणे | | | |
| न लिहिणे | | | |
| न धावणे | | | नका |
| न पाठवणे | | | |
| न पाळणे | | | |
| न शिकणे | | | |

कधी कधी - ''नको करूस, नको जाऊस, नको पाठवूस...'' असेही म्हणतात.

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| तू काम कर. | तू काम करू नकोस. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| तू इथे राहा. | तू इथे राहू नकोस. |
| तू पावसात भीज. | तू पावसात भिजू नकोस. |
| तू खोटे बोल. | तू खोटे बोलू नकोस. |
| तू ओरडून गा. | तू ओरडून गाऊ नकोस. |
| तू पैसे माग. | तू पैसे मागू नकोस. |
| तू लाडू पाठव. | तू लाडू पाठवू नकोस. |
| तू लांब जा. | तू लांब जाऊ नकोस. |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| तुम्ही काम करा | तुम्ही काम करू नका. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| तुम्ही इथे राहा. | तुम्ही इथे राहू नका. |
| तुम्ही पावसात भिजा. | तुम्ही पावसात भिजू नका. |
| तुम्ही खोटे बोला. | तुम्ही खोटे बोलू नका. |
| तुम्ही ओरडून गा. | तुम्ही ओरडून गाऊ नका. |
| तुम्ही पैसे मागा. | तुम्ही पैसे मागू नका. |
| तुम्ही लाडू पाठवा. | तुम्ही लाडू पाठवू नका. |
| तुम्ही लांब जा. | तुम्ही लांब जाऊ नका. |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| तू - काम न करणे | तू काम करू नकोस. |
| तुम्ही - काम न करणे | तुम्ही काम करू नका. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| तू - काम न करणे | तू काम करू नकोस. |
| तुम्ही - काम न करणे | तुम्ही काम करू नका. |
| बाबा, - न रागावणे | बाबा, रागावू नका. |
| आई, - न रागावणे | आई, रागावू नकोस. |
| बाई, - न बोलणे | बाई, बोलू नका. |
| गीता, - न बोलणे | गीता, बोलू नकोस. |
| काका, - न खेळणे | काका, खेळू नका. |
| सतीश, - न खेळणे | सतीश, खेळू नकोस. |
| तावडेसाहेब - गाडी वेगाने न चालवणे. | तावडेसाहेब, तुम्ही गाडी वेगाने चालवू नका. |
| रोहन - गाडी वेगाने न चालवणे. | रोहन, गाडी वेगाने चालवू नकोस. |
| ... | ... |

## कसं जगायचं? कसं वागायचं? कोणीतरी सांगता का मला?

नेहमी खरे बोलावे, खोटे बोलू नये.
प्रेमाने वागावे, रागावू नये.
'हो' म्हणावे, 'नाही' म्हणू नये.
घर स्वच्छ ठेवावे, घाण करू नये.
हळू आवाजात बोलावे, मोठ्याने बोलू नये.
व्यायाम करावा, आळस करू नये.
लवकर उठावे, उशिरा उठू नये.
सावकाश जेवावे, घाई करू नये.
...





करणे - कर + आ + वे = करावे.
बसणे - बस + आ + वे = बसावे.

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| करणे | करावे |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| जाणे | जावे |
| खाणे | खावे |
| शिकणे | शिकावे |
| बोलणे | बोलावे |
| बसणे | बसावे |
| झोपणे | झोपावे |
| लिहिणे | लिहावे |
| घेणे | घ्यावे |
| नाही | नये |
| ... | ... |

## वाचू या ... चिंटू.




व्याकरण

सराव

**१३ काही माणसे चुका करत आहेत. खाली पाट्यांवर सूचना दिल्या आहेत. आपण योग्य त्या पाट्या निवडू या आणि लोकांना सल्ले / सूचना देऊ या.**

१




२




३







४




५




६




७




८

- ☐ एक माणूस रस्त्यावर थुंकत आहे.
- ☐ लोक तिकीट घ्यायला गर्दी करत आहेत
- ☐ एक व्यक्ती फोनवर बोलत आहे.
- ☐ एक व्यक्ती सिगारेट मागत आहे.
- ☐ ड्रायव्हर गाडी चुकीच्या ठिकाणी लावत आहे.
- ☐ एक जण ओरडून बोलत आहे.
- ☐ मुले खूप आवाज करत आहेत.
- ☐ एक माणूस वेगाने गाडी चालवत आहे.

### म्हणी / वाक्प्रचार

करावे तसे भरावे.
पी हळद नि हो गोरी.
अंथरूण पाहून पाय पसरावेत.
ऐकावे जनाचे, करावे मनाचे.

## करा आणि शिका

१. आता एका चिठ्ठीवर एक समस्या लिहू या व ती वर्गात वाचू या. आपले सहकारी आपल्याला योग्य सल्ला देतील.








**मी काय करू ?**

| | |
|---|---|
| मला नीट दिसत नाही. | ए.सी. लाव. |
| या बसमध्ये खूप गर्दी आहे. | स्वेटर घाल. |
| माझे वजन वाढत आहे. | डोळ्यांच्या डॉक्टरकडे जा. |
| मला थंडी वाजतेय. | पुढची बस पकड. |
| मला गरम होतंय. | व्यायाम कर. |

२. खालील सूचना वाचून व दिलेली चित्रे पाहून एक वस्तू बनवू या.





१. सर्वात आधी एक चौकोनी कागद घ्यावा.
२. तो मधोमध दुमडावा.
३. त्याची अजून एक घडी घालून छोटा चौकोन करावा.
४. आता या कागदाचे चार भाग झालेले दिसत आहेत.
५. मग त्यातील एक भाग मागे दुमडावा.




६. बाकीचे तीन भाग त्या दुमडीच्या विरुद्ध दिशेस दुमडावे.
७. आता, एक त्रिकोण तयार झालेला तुम्हाला दिसत असेल.
८. त्या त्रिकोणाचा खालचा भाग पोकळ आहे.
९. त्या त्रिकोणाच्या पोकळ भागात हात घालून त्याचा पुन्हा उभा चौकोन करावा.
१०. त्या चौकोनाच्या दोन्ही बाजू विरुद्ध दिशेस एकाच वेळी खेचाव्या.

हे काय आहे ? ओळखा पाहू. **होडी !**





## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो मसाला (ते मसाले) | ती खिडकी (त्या खिडक्या) | ते आले |
| तो मेवा (ते मेवे) | ती कोथिंबीर | ते बेसन |
| तो गोळा (ते गोळे) | ती कढई (त्या कढया) | ते मीठ (ती मिठे) |
| तो पैसा (ते पैसे) | ती पाककृती (त्या -) | ते तेल (ती तेले) |
| तो अंधार | ती भीती | ते वाटण (ती वाटणे) |
| तो पसारा (ते पसारे) | ती माहिती | ते मिश्रण (ती मिश्रणे) |
| तो डोळा (ते डोळे) | ती टॅक्सी (त्या -) | ते गणित (ती गणिते) |
| तो दवाखाना (ते दवाखाने) | ती पुस्तिका (त्या -) | ते हॉटेल (ती हॉटेले) |
| तो समुद्र (ते -) | ती बस (त्या -) | ते गेट |
| तो सूर्यास्त | ती सवय (त्या सवयी) | ते वाहन (ती वाहने) |
| तो आवाज (ते -) | ती मजा | ते तिकीट (ती तिकिटे) |
| तो मोबाइल (ते -) | ती वाहतूक | ते तोंड (ती तोंडे) |
| तो नियम (ते -) | ती गर्दी | ते नाते (ती नाती) |
| तो त्रिकोण (ते -) | ती जर (त्या जरी) | ते बद्धकोष्ठ |
| तो लाडू (ते -) | ती होडी (त्या होड्या) | |
| तो तंटा (ते तंटे) | ती लसूण (त्या लसणी) | |
| तो साहेब (ते -) | ती साल (त्या साली) | |
| तो भाग (ते -) | | |

| क्रियापद | | विशेषण |
|---|---|---|
| फिरणे | बरबटवणे | स्वच्छ |
| दुमडणे | जोडणे | घाण |
| थुंकणे | सोडणे | अस्ताव्यस्त |
| ओरडणे | निघणे | दाट |
| ठेवणे | तळणे | चपटे |
| नेणे | बनवणे | खडूस |
| उचलणे | वापरणे | मखमली |
| उघडणे | पुसणे | सोनेरी |
| काढणे | वाटणे | झकास |
| सांभाळणे | वाढणे | बिनधास्त |
| मळवणे | | पोकळ |

## आता मला हे येतं.

**आज्ञा देणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**विनंती करणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**सावध करणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**परवानगी देणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**आभार मानणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**सूचना देणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**सल्ला मागणे / देणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**मूल्ये**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी



# १ कुटुंब



## चला, शिकू या...

- संबंध दाखवणे
- स्वतःच्या कुटुंबाबद्दल माहिती सांगणे
- मालकी हक्क
- १०० च्या पुढील अंक
- प्रश्नशब्द : कोणाचा, कोणाची, कोणाचे

## १ खालील चित्रे पाहून गाळलेल्या जागा भरू या.









(तनिष्काची शाळा, आदित्यचे मांजर, योगिताचे मूल, मंदारची गाडी, अक्षयचा भ्रमणध्वनी, नेत्राचा कुत्रा)

१. अक्षयचा भ्रमणध्वनी खूप महाग आहे.

२. ---------------- ---------------- तीन वर्षांचे आहे.

३. ---------------- ---------------- सफेद रंगाचे आहे.

४. ---------------- ---------------- महात्मा गांधी मार्गावर आहे.

५. ---------------- ---------------- हल्ली सतत भुंकत असतो.

६. ---------------- ---------------- लाल रंगाची आहे.








| | | | | |
|---|---|---|---|---|
| अक्षयचा | भ्रमणध्वनी | | अक्षयचे | भ्रमणध्वनी |
| मंदारची | गाडी | त्याचप्रमाणे | मंदारच्या | गाड्या |
| योगिताचे/चं | मूल | | योगिताची | मुले/लं |

शब्द संपदा

व्याकरण

## २ महाराष्ट्राचा नकाशा वाचू या.




मुलांचा चित्रमय महाराष्ट्र, विद्याधर अमृते आणि प्रसाद गोगटे

| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
|---|---|
| हा कोणाचा लॅपटॉप आहे ? (आनंद) | आनंदचा |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| हा कोणाचा लॅपटॉप आहे ? (आनंद) | आनंदचा |
| हा कोणाचा लॅपटॉप आहे ? (कविता) | कविताचा |
| हा कोणाचा लॅपटॉप आहे ? (आरती) | आरतीचा |
| हा कोणाचा लॅपटॉप आहे ? (केदार) | केदारचा |
| हा कोणाचा लॅपटॉप आहे ? (महेश) | महेशचा |
| ... | ... |

| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
|---|---|
| ही कोणाची चावी आहे ? (आनंद) | आनंदची |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| ही कोणाची चावी आहे ? (आनंद) | आनंदची |
| ही कोणाची चावी आहे ? (अक्षय) | अक्षयची |
| ही कोणाची चावी आहे ? (आरती) | आरतीची |
| ही कोणाची चावी आहे ? (केदार) | केदारची |
| ही कोणाची चावी आहे ? (कविता) | कविताची |
| ... | ... |

| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
|---|---|
| हे कोणाचे पेन आहे ? (आनंद) | आनंदचे |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| हे कोणाचे पेन आहे ? (आनंद) | आनंदचे |
| हे कोणाचे पेन आहे ? (आरती) | आरतीचे |
| हे कोणाचे पेन आहे ? (अक्षय) | अक्षयचे |
| हे कोणाचे पेन आहे ? (केदार) | केदारचे |
| हे कोणाचे पेन आहे ? (कविता) | कविताचे |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा. **शिक्षक/शिक्षिका** | उदा. **शिक्षक/शिक्षिका** |
| ही कोणाची सायकल ? (महेश) | महेशची |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| हा कोणाचा शर्ट ? (आनंद) | आनंदचा |
| हे कोणाचे/चं घड्याळ ? (अलका) | अलकाचे/चं |
| हा कोणाचा लॅपटॉप ? (कविता) | कविताचा |
| ही कोणाची चावी ? (शैलेश) | शैलेशची |
| हे कोणाचे/चं पेन ? (आरती) | आरतीचे/चं |
| ही कोणाची बाटली ? (सुप्रिया) | सुप्रियाची |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा. **शिक्षक/शिक्षिका** | उदा. **शिक्षक/शिक्षिका** |
| हे कोणाचे पैसे आहेत ? (आनंद) | आनंदचे |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| हे कोणाचे पैसे आहेत ? (आनंद) | आनंदचे |
| हे कोणाचे कपडे आहेत ? (आरती) | आरतीचे |
| हे कोणाचे कुर्ते आहेत ? (अक्षय) | अक्षयचे |
| हे कोणाचे मोजे आहेत ? (महेश) | महेशचे |
| हे कोणाचे सामोसे आहेत ? (कविता) | कविताचे |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा. **शिक्षक/शिक्षिका** | उदा. **शिक्षक/शिक्षिका** |
| या कोणाच्या चाव्या आहेत ? (आनंद) | आनंदच्या |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| या कोणाच्या चाव्या आहेत ? (आनंद) | आनंदच्या |
| या कोणाच्या गाड्या आहेत ? (आरती) | आरतीच्या |
| या कोणाच्या चपला आहेत ? (अक्षय) | अक्षयच्या |
| या कोणाच्या खुर्च्या आहेत ? (महेश) | महेशच्या |
| या कोणाच्या सायकली आहेत ? (कविता) | कविताच्या |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा. **शिक्षक/शिक्षिका** | उदा. **शिक्षक/शिक्षिका** |
| ही कोणाची घरे आहेत ? (आनंद) | आनंदची |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| ही कोणाची घरे आहेत ? (आनंद) | आनंदची |
| ही कोणाची पुस्तके आहेत ? (अक्षय) | अक्षयची |
| ही कोणाची चित्रे आहेत ? (महेश) | महेशची |
| ही कोणाची टेबले आहेत ? (आरती) | आरतीची |
| ही कोणाची पत्रे आहेत ? (कविता) | कविताची |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा. **शिक्षक/शिक्षिका** | उदा. **शिक्षक/शिक्षिका** |
| या कोणाच्या सायकली ? (महेश) | महेशच्या |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| हे कोणाचे शर्ट ? (आनंद) | आनंदचे |
| ही कोणाची घड्याळे ? (अलका) | अलकाची |
| हे कोणाचे लॅपटॉप ? (सकीना) | सकीनाचे. |
| या कोणाच्या चाव्या ? (शैलेश) | शैलेशच्या |
| ही कोणाची पेने ? (आरती) | आरतीची |
| या कोणाच्या बाटल्या ? (मारिया) | मारियाच्या |

| | |
|---|---|
| उदा. **शिक्षक/शिक्षिका** | उदा. **शिक्षक/शिक्षिका** |
| तुम्ही मुंबईचे का ? | हो, मी मुंबईचा. |
| तुम्ही मुंबईच्या का ? | हो, मी मुंबईची. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| तुम्ही नागपूरचे / नागपूरच्या का ? | हो, मी नागपूरचा / नागपूरची. |
| तुम्ही सांगलीचे / सांगलीच्या का ? | हो, मी सांगलीचा / सांगलीची. |
| तुम्ही रत्नागिरीचे / रत्नागिरीच्या का ? | हो, मी रत्नागिरीचा / रत्नागिरीची. |
| तुम्ही नाशिकचे / नाशिकच्या का ? | हो, मी नाशिकचा / नाशिकची. |
| तुम्ही चंद्रपूरचे / चंद्रपूरच्या का ? | हो, मी चंद्रपूरचा / चंद्रपूरची. |
| तुम्ही कोल्हापूरचे / कोल्हापूरच्या का ? | हो, मी कोल्हापूरचा / कोल्हापूरची. |

सराव

## ३ सुरभीची खोली बघू या आणि काय काय दिसतंय ते लिहू या.





शब्द संपदा

उदा. **सुरभीची गिटार**

१. ----------------------------.
२. ----------------------------.
३. ----------------------------.
४. ----------------------------.
५. ----------------------------.
६. ----------------------------.
७. ----------------------------.
८. ----------------------------.

## ४ या, मी तुमची माझ्या घरच्यांशी ओळख करून देते.

१


२



५

३



४

### वरील चित्रे पाहू या, खालील वाक्ये वाचू या व चौकटीत योग्य तो क्रमांक लिहू या.

- [ ] मी मीरा, आणि हे माझं कुटुंब.
- [ ] हा माझा भाऊ अक्षय. आणि ती त्याची बायको - म्हणजे माझी वहिनी - पूजा.
- [ ] हे माझे आजी-आजोबा. माझे आजोबा ८३ वर्षांचे आहेत व माझी आजी ८० वर्षांची आहे. आजोबांचं नाव आहे सदानंद आणि आजीचं अनसूया.
- [ ] ही माझी ताई - म्हणजेच मोठी बहीण - कस्तुरी. ती २८ वर्षांची आहे. तिला प्राण्यांची आवड आहे. तो तिचा कुत्रा बूझो.
- [ ] आणि हे माझे आई-बाबा. माझे बाबा पायलट आहेत नि आई डॉक्टर.

| | |
|---|---|
| मी | माझा |
| | माझी |
| | माझे/माझं |

| | |
|---|---|
| माझा | भाऊ |
| माझी | बहीण |
| माझे/माझं | कुटुंब |

| | |
|---|---|
| माझा | कागद |
| माझी | पेन्सिल |
| माझे/माझं | पुस्तक |

व्याकरण



**स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे.**

- लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

## ५ चला, नातेवाइकांशी ओळख करून घेऊ या.

काका दादा मावशी
मामी बहीण काकी/काकू
आजी मामा आजोबा
आत्या

शब्द संपदा

१. आईचा भाऊ, माझा ---------------
२. मामाची बायको, माझी -------------
३. बाबांचा भाऊ, माझा/माझे ----------
४. काकांची बायको, माझी ------------
५. आईची मुलगी, माझी ---------------
६. मोठा भाऊ, माझा -------------------
७. आईचे/बाबांचे बाबा, माझे ----------
८. आईची/बाबांची आई, माझी ---------
९. बाबांची बहीण, माझी ---------------
१०. आईची बहीण, माझी ---------------

### ... आणि हा आहे माझा मित्र-परिवार.



हा बघा, किती छान फोटो आहे आमचा कॉलेजमधला.
हे तेजस, हृषिकेश आणि जय - माझे अगदी खास मित्र.



आणि हा फोटो बघा, शाळेतला.
ही पूजा, ही आरती, आणि ही अक्षया. या माझ्या अगदी जवळच्या मैत्रिणी. आम्ही सगळ्या अजूनही एकमेकींच्या संपर्कात आहोत. फेसबुकवर तर जवळपास रोजच भेटतो.



आणि ही आहेत माझी गिर्यारोहणातील मित्रमंडळी: आशिष, दीपाली, संकेत, राल्फ आणि योकोता.

| | |
|---|---|
| माझे | मित्र |
| माझ्या | मैत्रिणी |
| माझी | मित्रमंडळी |

| | |
|---|---|
| माझे | कागद |
| माझ्या | पेन्सिली |
| माझी | पुस्तके/पुस्तकं |

## ६ रिकाम्या जागी कंसातील योग्य तो शब्द लिहू या.

**(माझा, माझी, माझे, माझ्या, माझी)**

१. --------------- चेंडू
२. --------------- पुस्तके
३. --------------- मांजर
४. --------------- मुलगा
५. --------------- नवरा
६. --------------- आजी
७. --------------- आई
८. --------------- घर
९. --------------- बहिणी
१०. --------------- वह्या

## ७ खाली दाखविल्याप्रमाणे आदरार्थी प्रश्न बनवू या.

| | |
|---|---|
| **तुझं** नाव काय ? | आपलं नाव काय ?<br>तुमचं नाव काय ? |
| **तुझी** मातृभाषा कोणती ? | ---------------------------------<br>--------------------------------- |
| **तुझा** दूरध्वनि-क्रमांक काय ? | ---------------------------------<br>--------------------------------- |

## ८ आता खालील कोष्टक पूर्ण करू या.

| दूरध्वनि-क्रमांक | मातृभाषा | नाव |
|---|---|---|
| तुझा | --------------- | --------------- |
| --------------- | तुमची | --------------- |
| --------------- | --------------- | आपलं |

| | पु. एकवचन/अनेकवचन | स्त्री. एकवचन/अनेकवचन | नपुं. एकवचन/अनेकवचन |
|---|---|---|---|
| **मी** | माझा / माझे | माझी / माझ्या | माझे / माझं / माझी |
| **तू** | तुझा / तुझे | तुझी / तुझ्या | तुझे / तुझं / तुझी |
| **तो / ते** | त्याचा / त्याचे | त्याची / त्याच्या | त्याचे / त्याचं / त्याची |
| **ती** | तिचा / तिचे | तिची / तिच्या | तिचे / तिचं / तिची |
| **आम्ही** | आमचा / आमचे | आमची / आमच्या | आमचे / आमचं / आमची |
| **आपण** | आपला / आपले | आपली / आपल्या | आपले / आपलं / आपली |
| **तुम्ही** | तुमचा / तुमचे | तुमची / तुमच्या | तुमचे / तुमचं / तुमची |
| **ते / त्या / ती** | त्यांचा / त्यांचे | त्यांची / त्यांच्या | त्यांचे / त्यांचं / त्यांची |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>मी | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>माझा मित्र |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| मी ? | माझा मित्र |
| आम्ही ? | आमचा मित्र |
| तू ? | तुझा मित्र |
| तुम्ही ? | तुमचा मित्र |
| तो ? | त्याचा मित्र |
| ते ? | त्यांचा मित्र |
| ती ? | तिचा मित्र |
| त्या ? | त्यांचा मित्र |
| ते ? | त्याचा मित्र |
| ती ? | त्यांचा मित्र |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>मी - माझा काका. तो ? | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>त्याचा काका |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| मी - माझा काका. तो ? | त्याचा काका |
| मी - माझी बहीण. ते ? | त्याची बहीण |
| मी - माझी खोली. ते ? | त्यांची खोली |
| मी - माझी पेन्सिल. ती ? | तिची पेन्सिल |
| मी - माझा चेंडू. तू ? | तुझा चेंडू |
| मी - माझे घर. आम्ही ? | आमचे घर |
| मी - माझी मावशी. त्या ? | त्यांची मावशी |
| मी - माझे पुस्तक. तुम्ही ? | तुमचे पुस्तक |
| मी - माझी मुलगी. आपण ? | आपली मुलगी |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>हा माझा रुमाल आहे. (रुमाल) | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>हे माझे रुमाल आहेत. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| हा माझा मित्र आहे. (मित्र) | हे माझे मित्र आहेत. |
| ही त्याची बहीण आहे. (बहिणी) | या त्याच्या बहिणी आहेत. |
| हे तिचे घड्याळ आहे. (घड्याळे) | ही तिची घड्याळे आहेत. |
| ही त्यांची बाग आहे. (बागा) | या त्यांच्या बागा आहेत. |
| हा आमचा बंगला आहे. (बंगले) | हे आमचे बंगले आहेत. |
| हे आपले झाड आहे. (झाडे) | ही आपली झाडे आहेत. |
| हा तुमचा वर्ग आहे. (वर्ग) | हे तुमचे वर्ग आहेत. |
| ही तुमची खोली आहे. (खोल्या) | या तुमच्या खोल्या आहेत. |
| ... | ... |



## ९ वरील चित्रात कोण दिसतंय? काय दिसतंय?

पेपर आजी मुलगी भाजी
बाबा चहा
आई मालिका आजोबा लॅपटॉप

| कोण | काय |
|---|---|
| आई | भाजी |
| | |
| | |
| | |
| | |

## १० कोण काय करतंय, त्यांच्या जोड्या जुळवू या.

| कोण | काय करत आहे ? |
|---|---|
| आई | पेपर वाचत आहेत. |
| मुलगी | लॅपटॉपवर काम करत आहे. |
| आजोबा | भाजी चिरत आहे. |
| आजी | चहा घेत आहेत. |
| बाबा | मालिका पाहत आहे. |

शब्द संपदा

## वाचू या.

**देशमुख कुटुंबाची एक संध्याकाळ -**

मी मुक्ता. आमची रोजची संध्याकाळ साधारणपणे अशीच असते. बाबा ऑफिसमधून घरी आल्यावर गरमागरम चहा घेतात. त्यांच्याशी गप्पा मारता मारता आई रात्रीच्या जेवणाकरिता भाजी चिरते. घड्याळात सात वाजले रे वाजले, की अमितचा टी.व्ही. सुरू होतो. पण थोड्या वेळातच त्याला रिमोट आमच्या घरातल्या 'रिमोट कंट्रोल'कडे, म्हणजे आजीकडे सोपवावा लागतो. आजी तिची आवडती मालिका, 'राधा ही बावरी', अगदी न चुकता पाहते. आजीने ही मालिका लावली, की आजोबा त्यांच्या खोलीतूनच 'राधा ही चावरी' असं डोळे मिचकावून गुणगुणतात. आजीचं माहेरचं नाव 'राधा' होतं ना! आजोबांना मालिका पाहायला नाही आवडत. ते त्यांच्या खोलीत बसून पेपर वाचतात. आणि मी - जर मी त्या वेळी घरी असेन तर - लॅपटॉपवर माझं काम करते किंवा घरच्यांशी गप्पा मारते.






### ११ आता सांगा बरं, देशमुख कुटुंब रोज संध्याकाळी काय काय करतं?

| | |
|---|---|
| मालिका पेपर भाजी<br>चहा गप्पा काम | घेणे मारणे वाचणे<br>चिरणे करणे पाहणे |

उदा. आई भाजी चिरते.

----------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------

| कोण | काय | करतं ? |
|---|---|---|
| आई | भाजी | चिरते |
| मुक्ता | ---------- | ---------- |
| ---------- | ---------- | ---------- |
| आजी | ---------- | ---------- |
| ---------- | ---------- | ---------- |

शब्द संपदा

## वाचू या.

**कुटुंबातील लोकांच्या वेगवेगळ्या तऱ्हा.**



ही आहे श्रुती. श्रुतीला सगळे हळूबाई म्हणतात. ती सगळीच कामं खूप **हळू हळू** करते. ती **हळू** जेवते, **हळू** चालते, बोलतेही **सावकाश.**







आणि तिच्या उलट ओंकार. जलद हा शब्द जणू त्याच्याचसाठी बनवलाय. त्याचं सगळंच **जलद** असतं. तो **जलद** पेपर वाचतो, **भरभर** स्वयंपाक करतो आणि तितकाच वेगाने गाडीही चालवतो.



## वाचू या.

**सरदेसाई कुटुंब हे एक व्हर्चुअल कुटुंब आहे. कसं ते पाहू या.**

मी मुंबई विद्यापीठात प्राध्यापिका आहे. माझे मिस्टर कामानिमित्त दिल्लीला असतात व मुलगी अमेरिकेत नोकरी करते. आम्ही **अनेकदा** स्काईपवरच एकमेकांना भेटतो. मुलीशी मी **भरपूर** गप्पा मारते. मिस्टरांची व माझी कामाची वेळ भिन्न असल्यामुळे आमचं अगदी **क्वचित** बोलणं होतं. तसं असलं तरी **एकदा** का स्काईप सुरू केलं, की आमच्यातील अंतर **पटकन** नाहीसं होतं.




### १२ वरील दोन्ही परिच्छेदांतील ठळक शब्द योग्य त्या गटात लिहू या.

| कसा / कशी / कसे | किती / कितीदा |
| --- | --- |
| | |
| | |
| | |
| | |

शब्द संपदा

## चला, अंक कसे बनतात ते पाहू या.

१०१ - एकशे एक → १ × शे (१००) + १
१०२ - एकशे दोन → १ × शे (१००) + २
१०३ - एकशे तीन → १ × शे (१००) + ३
२०० - दोनशे → २ × शे (१००)
२०१ - दोनशे एक → २ × शे (१००) + १
३०० - तिनशे → ३ × शे (१००)
४०० - चारशे → ४ × शे (१००)
५०० - पाचशे → ५ × शे (१००)
१००० - एकहजार (हजार) → १ × हजार
२००० - दोनहजार → २ × हजार



संवाद

## १३ आता हा संवाद ऐकू या.

**सुखदा** - अरे, पेपरमध्ये आज टॉप ५ फिक्शन पुस्तकांची नावं आहेत. मला त्यांतली काही हवीयेत. आज संध्याकाळी येतोस का सोबत? 'मॅजेस्टिक'मध्ये जाऊ या.

**अथर्व** - हो, चालेल. मार्गारिट थॅचर दि ऑथराइज्ड बायोग्राफी ८९६ पानी आहे आणि किंमत ८९९ रुपये आहे. सगळ्यांत मोठं आणि महाग पुस्तक तेच आहे.

| **टॉप ५ फिक्शन** |
|---|
| **द सी ऑफ इनोसन्स** - किश्वर देसाई, पाने : ४०० / ३५० रुपये |
| **शोज ऑफ डेड** - कोटा नीलिमा, पाने : २८८ / ४९५ रुपये |
| **व्हेन स्ट्रेंजर्स मीट...** - के. हरी कुमार, पाने : २१६ / १०० रुपये |
| **जेकब हिल्स** - इस्मिता टंडन धंकेर, पाने : २६८ / २९९ रुपये |
| **कफ सिरप** - थरून जेम्स जीमानी, पाने : २७६ / २५० रुपये |

| **टॉप ५ नॉन - फिक्शन** |
|---|
| **द न्यू डिजिटल एज** - एरिक स्मिथ - जेरेड कोहेन, पाने : ३१५ / ६५० रुपये. |
| **हाऊ एशिया वर्क्स** - जो स्टुडवेल, पाने : २८८ / ४९९ रुपये. |
| **दि ऑर्फन मास्टर्स सन** - ॲडम्स जॉन्सन, पाने : ५९२ / ४५० रुपये. |
| **मार्गारिट थॅचर - दि ऑथराइज्ड बायोग्राफी** - चार्ल्स मूर, पाने : ८९६ / ८९९ रुपये. |
| **कम ऑन इनर पीस - आय डोन्ट हॅव ऑल डे** - सचिन गर्ग, पाने : १३० / १०० रुपये. |

## १४ वरील पुस्तकांची पाने आणि किंमत शब्दांत लिहू या.

१) दि सी ऑफ इनोसन्स - चारशे पाने, किंमत तीनशे पन्नास रुपये.
२) ---------------------------------------------------------------.
३) ---------------------------------------------------------------.
४) ---------------------------------------------------------------.
५) ---------------------------------------------------------------.
६) ---------------------------------------------------------------.
७) ---------------------------------------------------------------.
८) ---------------------------------------------------------------.
९) ---------------------------------------------------------------.
१०) ---------------------------------------------------------------.

### चला, नवे अंक पाहू या.

| | |
|---|---|
| १०,००० | दहा हजार |
| १,००,००० | एक लाख |
| १०,००,००० | दशलक्ष / दहा लाख |
| १,००,००,००० | एक कोटी |
| १,००,००,००,००० | अब्ज |

### म्हणी / वाक्प्रचार

शे-सव्वाशे लोक.
हजारदा सांगणे.
एकाचे दोन करून सांगणे.
स्वामी तिन्ही जगांचा आईविना भिकारी.
सख्खे भाऊ, पक्के वैरी.
सत्राशे साठ.



## १५ खालील शहरांची लोकसंख्या इंटरनेटवरून अंकात व अक्षरात लिहू या.

१. मुंबई - ---------------------------------------------------------.
२. कोलकाता - ---------------------------------------------------.
३. दिल्ली - ---------------------------------------------------------.
४. चेन्नई - ---------------------------------------------------------.
५. अहमदाबाद - ---------------------------------------------------.
६. न्यु यॉर्क - -------------------------------------------------------.
७. टोकियो - -------------------------------------------------------.
८. बर्लिन - ---------------------------------------------------------.

शब्द संपदा

करा आणि शिका

## १६ ऐकू या.

**पप्पा सांगा कोणाचे...**



पप्पा सांगा कोणाचे ? पप्पा माझ्या मम्मीचे !
मम्मी सांगा कुणाची ? मम्मी माझ्या पप्पांची !

इवल्या इवल्या घरट्यात, चिमणा चिमणी राहतात
चिमणा चिमणी अन् भवती, चिमणी पिल्लेही चिवचिवती !
आभाळ झेलते पंखांवरी, बाबांना घरटे प्रिय भारी
चोचीत चोचीने घास द्यावा, पिल्लांचा हळूच पापा घ्यावा !

पंखाशी पंख हे जुळताना, चोचीत चोचही मिळताना
हासते नाचते घर सारे, हासते छप्पर, भिंती, दारे !

■ शांता शेळके



## करा आणि शिका.

१. दोन गट करा. एका गटातील प्रत्येकाला कुटुंबातील एक-एक भूमिका द्या. घराच्या मालकीसंबंधी त्यांचे भांडण चालू आहे. त्यांचा संवाद तयार करा. दुसऱ्या गटाने ओळखा, कोण कोणाची भूमिका करत आहे.
२. लिहा - घरी तुम्ही तुमचा वेळ कसा घालवता ?
३. आता तुमच्या कुटुंबाचा परिचय द्या.
४. रिकाम्या चौकटीत तुमच्या कुटुंबाचा एक फोटो लावा व तुमच्या सहकाऱ्यास तुमच्या कुटुंबाचा परिचय करून द्या.

हा/ही मी आहे. हे माझे/माझं...हा माझा...ही माझी...
उजवीकडे...
पुढे/मागे/मध्ये आहे...

## वाचू या ... चिंटू.




## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो भ्रमणध्वनी (ते -) | ती सायकल (त्या सायकली) | ते कुटुंब (ती कुटुंबे) |
| तो लॅपटॉप (ते -) | ती चावी (त्या चाव्या) | ते मांजर (ती मांजरे) |
| तो बेड (ते -) | ती बाटली (त्या बाटल्या) | ते कपाट (ती कपाटे) |
| तो आरसा (ते आरसे) | ती आई (त्या आया) | ते झाड (ती झाडे) |
| तो कपडा (ते कपडे) | ती आजी (त्या आज्या) | ते अंतर (ती अंतरे) |
| तो भाऊ (ते -) | ती ताई (त्या ताया) | ते पान (ती पाने) |
| तो / ते बाबा (ते -) | ती मावशी (त्या मावश्या) | ते भांडण (ती भांडणे) |
| तो / ते आजोबा (ते -) | ती मामी (त्या माम्या) | |
| तो / ते काका (ते -) | ती बहीण (त्या बहिणी) | |
| तो दादा (ते -) | ती काकी / काकू (त्या काक्या) | |
| तो / ते मामा (ते -) | ती आत्या (त्या -) | |
| तो मित्र (ते -) | ती मैत्रीण (त्या मैत्रिणी) | |
| तो नवरा (ते नवरे) | ती बाग (त्या बागा) | |
| तो परिवार (ते -) | ती वही (त्या वह्या) | |
| तो प्रसंग (ते -) | ती खोली (त्या खोल्या) | |
| | ती मालिका (त्या -) | |
| | ती भूमिका (त्या -) | |
| | ती मालकी | |
| | ती वेळ (त्या वेळा) | |

| क्रियापद | क्रियाविशेषण | प्रश्नशब्द | इतर शब्द |
| --- | --- | --- | --- |
| भुंकणे | हळू | कोणाचा | महाग |
| भेटणे | जलद | कोणाची | सफेद |
| चालणे | अनेकदा | कोणाचे / चं | खास |
| | क्वचित | | भिन्न |
| | भरपूर | | स्वस्त |
| | पटकन | | |

## आता मला हे येतं.

**संबंध दाखवणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**स्वत:च्या कुटुंबाबद्दल माहिती सांगणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**मालकी हक्क**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**१०० च्या पुढील अंक**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**प्रश्नशब्द: कोणाचा, कोणाची, कोणाचे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी



# आनंदाचे प्रसंग

## १०




## चला, शिकू या...

- आवडनिवड सांगणे, विचारणे
- शुभेच्छा देणे
- वाढदिवस सांगणे, विचारणे
- वाढदिवसाचे आमंत्रण करणे
- होकार व नकार देणे

## १ तू फावल्या वेळेत काय काय करतोस / करतेस?



## २ वर्गात खालील कृतींचे हावभाव करून आवड ओळखता येते का पाहू या.

नाचणे | नाटक / सिनेमा बघणे | गाणे

चित्र काढणे | बागकाम करणे | फिरणे

चित्र रंगवणे | कविता करणे | वाचन करणे

गाणी ऐकणे | खेळणे | पत्र लिहिणे

गप्पा मारणे | स्वयंपाक करणे | सायकल चालवणे

करा आणि शिका

## ३ खालील नमुन्याप्रमाणे आपण आपापल्या सहकाऱ्याला विचारू या.

**अ :** तू वेळ मिळाला की काय करतोस?
**ब :** मी मित्रांना घरी बोलावतो आणि त्यांच्याबरोबर पत्ते खेळतो. तू काय करतोस?
**अ :** ऑफिस असतं रोज. वेळ नसतो.

| | | |
|---|---|---|
| तू फावल्या वेळेत काय काय करतोस/करतेस? | वाचन<br>लेखन<br>पोहणे<br>चित्र काढणे<br>फिरणे... | मी फावल्या वेळेत... |
| तुझा छंद कोणता? | | हा माझा छंद आहे. |

## ४ ऐकू या आणि पुढील तक्ता भरू या.

**आपण फावल्या वेळात काय करता?**

★ मी टी.व्ही. बघतो. मला रविवारी वेळ असतो. तेव्हा मी मालिका आणि चित्रपट पाहतो. कधीकधी सकाळी सायकल चालवतो किंवा फुटबॉल खेळतो. संध्याकाळी मी माझ्या मित्रांना भेटतो.

★ अं... मी फावल्या वेळात नवीन पुस्तकं वाचते. ऑफिस ५ ला सुटतं. मग मी रोज संध्याकाळी बाहेर फेरी मारते. फ्रेश वाटतं.

★ मी कराटे शिकतो. आत्ताशी सुरुवात केली आहे शिकायला. पण मज्जा येते. आई मला न्यायला येते. मग आम्ही लिंबू सरबत पितो; मस्त, थंडगार!

★ मी वेगवेगळ्या भाज्या बनवते. मला फार आवडतं वेगवेगळ्या भाज्या बनवायला. सकाळी नि संध्याकाळी मी वेगवेगळी भाजी करते. मी केलेल्या चमचमीत भाज्या फार आवडतात माझ्या मुलांना.

| | काय | कधी / केव्हा |
|---|---|---|
| **व्यक्ती १** | मालिका आणि चित्रपट पाहणे | रविवारी |
| **व्यक्ती २** | | |
| **व्यक्ती ३** | | |
| **व्यक्ती ४** | | |

संवाद

**५ आता खालील चिठ्ठ्या वाचून आपल्याला काय आवडतं आणि काय आवडत नाही ते सांगू या.**



**मंदार**
मला गप्पा मारायला आवडतं. मी गप्पिष्ट आहे आणि मला पुष्कळ मित्र आहेत. दिवसभर आम्ही वॉट्स ॲपवरच असतो. आम्हाला बोलायला आवडतं.

**अनिता**
मला गाणी ऐकायला आवडतं. मी गाणी डाउनलोड करते आणि मोबाइलवर ऐकते. मला गाडी चालवायलाही आवडतं. माझ्याकडे नॅनो आहे.





**शेखर**
मला पुस्तकं वाचायला आवडतं. माझ्याकडे तीन मोठी कपाटं भरून पुस्तकं आहेत. मला बाथरूममध्ये गायलाही आवडतं, पण मला मोबाइलवर खेळायला आवडत नाही.

**निशिता**
मला सिनेमे बघायला खूप आवडतं. दर शुक्रवारी मी मैत्रिणींबरोबर एक सिनेमा बघते. पण मला नाटक पाहायला आवडत नाही.



**थोडक्यात**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| करणे | → | कर + आयला | → | करायला |
| वाचणे | → | वाच + आयला | → | वाचायला |
| ऐकणे | → | ऐक + आयला | → | ऐकायला |
| बघणे | → | बघ + आयला | → | बघायला |
| गाणे | → | गा + आयला | → | गायला |
| | | **पण** | | |
| येणे | → | ये + आयला | → | यायला |
| देणे | → | दे + आयला | → | द्यायला |
| घेणे | → | घे + आयला | → | घ्यायला |
| पिणे | → | पी + आयला | → | प्यायला |
| लिहिणे | → | लिह + आयला | → | लिहायला |

व्याकरण

चल, आपण फिरायला जाऊ या.

तू सिनेमा बघायला येतोस का ?

आपल्याला निघायला हवं.

अरे, यायला काय हरकत आहे ?

अभ्यास करायला लागतो रे.

अगं, जेवायला बस.

**६ वर्गातल्या मित्र - मैत्रिणींना विचारून कोणाला काय आवडतं ते लिहू या. फक्त दोन मिनिटं आहेत हं ! पाहू या, कोण सर्वात जास्त लिहितं ते.**

मधुराला पुस्तकं वाचायला आवडतं. रोहितला झोपायला आवडतं. ...

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

| | |
|---|---|
| उदा. **शिक्षक/शिक्षिका**<br>तुला काय करायला आवडतं ? (गाणे) | उदा. **शिक्षक/शिक्षिका**<br>मला गायला आवडतं. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| खेळणे | मला खेळायला आवडतं. |
| फिरणे | मला फिरायला आवडतं. |
| खाणे | मला खायला आवडतं. |
| हसणे | मला हसायला आवडतं. |
| वाचणे | मला वाचायला आवडतं. |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा. **शिक्षक/शिक्षिका**<br>तुला काय करायला आवडतं ? (गाणी ऐकणे) | उदा. **शिक्षक/शिक्षिका**<br>मला गाणी ऐकायला आवडतं. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| चित्र काढणे | मला चित्र काढायला आवडतं. |
| चित्र रंगवणे | मला चित्र रंगवायला आवडतं. |
| बागकाम करणे | मला बागकाम करायला आवडतं. |
| कविता करणे | मला कविता करायला आवडतं. |
| गप्पा मारणे | मला गप्पा मारायला आवडतं. |
| सायकल चालवणे | मला सायकल चालवायला आवडतं. |
| सिनेमा बघणे | मला सिनेमा बघायला आवडतं. |
| पत्र लिहिणे | मला पत्र लिहायला आवडतं. |
| ... | ... |

## ७ सामान्यातून असामान्य...

| | |
|---|---|
| तू चमचा कशासाठी वापरतोस ? | मी मोबाईल फोटो काढायला वापरतो. |
| तू इस्त्री कशासाठी वापरतेस ? | मी इस्त्री केस सरळ करायला वापरते. |
| तू कागद कशासाठी वापरतोस ? | मी चमचा स्क्रू घट्ट करायला वापरतो. |
| तू हेअरपिन कशासाठी वापरतेस ? | मी कागद होडी बनवायला वापरतो. |
| तू मोबाईल कशासाठी वापरतोस ? | मी हेअरपिन कुलुप उघडायला वापरते. |

## ८ आपण काय म्हणतो?

लग्न

वाढदिवस | शुभेच्छा ! | बढती

निकाल



## खालील संवाद वर्गात वाचू या.

**आशा** - साधना, अगं, तुझा वाढदिवस कधी असतो ?
**साधना** - जुलैमध्ये, १५ जुलैला. तुझा कधी असतो ?
**आशा** - एप्रिलमध्ये, ८ एप्रिलला.






## ९ खालील संवाद ऐकू या आणि कोण येतंय आणि कोण येत नाहीये याची नोंद घेऊ या.

१) **मधुरा** - हॅलो, मी मधुरा बोलतेय.
**पल्लवी** - हॅलो, कशी आहेस ?
**मधुरा** - मी मजेत आहे. अगं, या शनिवारी मी माझा वाढदिवस साजरा करतेय. नक्की ये हं.
**पल्लवी** - हो, नक्की येते. किती वाजता ?
**मधुरा** - सहा वाजता, घरी.
**पल्लवी** - हो, भेटूच.

२) **तुषार** - अरे, आज अभिजितचा वाढदिवस आहे. तू येतोयस ना माझ्याबरोबर ?
**सतीश** - नाही, यार. आज माझ्या आजीचापण वाढदिवस आहे. पार्ल्याला जातोय आज.
**तुषार** - ओह, मग मी एकटाच जातो... चल, बाय.


३) **देवांग** - हॅलो, वैभव, रविवार फ्री ठेव. मी वाढदिवसाची पार्टी देतोय.
**वैभव** - सही रे ! कुठे ?
**देवांग** - 'हॉटेल गोमंतक'मध्ये. धम्माल चिकन पार्टी. अमोल, अभिषेक आणि अक्षयपण आहेत.
**वैभव** - सही यार. मजा करू. मी येतोच.

४) **नेहा** - हॅलो, सोनिया, उद्या रसिकाचा वाढदिवस आहे.
**सोनिया**- हो अगं, पण मला नाही जमणार यायला.
**नेहा** - का गं ?
**सोनिया**- माझी परीक्षा आहे. ए, तू तिला माझ्याकडून भेटवस्तू दे हं. मी तुला पैसे देते.
**नेहा** - ओके, चालेल.

| नाव | कोण येतंय | कोण येत नाहीये |
|---|---|---|
| पल्लवी | | |
| तुषार | | |
| सतीश | | |
| वैभव | | |
| अमोल | | |

| नाव | कोण येतंय | कोण येत नाहीये |
|---|---|---|
| अभिषेक | | |
| अक्षय | | |
| सोनिया | | |
| नेहा | | |

## १० खालील तक्त्याच्या मदतीने संवाद साधू या.




| निमंत्रण | + | - | + - |
|---|---|---|---|
| मी ------------- | हो, नक्की | सॉरी, मला वेळ नाहीये. | मी नक्की सांगू शकत नाही. |
| वाढदिवस साजरा करतोय/करतेय. | हो, आम्ही येऊ सगळे. | मला बाहेर जायचंय. | मला यायला आवडेल, पण... |
| नक्की यायचं. | हो, मी येऊ शकते/शकतो. | | |
| -------- माझ्या वाढदिवसाची पार्टी आहे. | हो, आम्ही येऊ. | | मी तुला दोन दिवसांनी कळवतो/कळवते. |
| नक्की ये | | | |

## वाचू या.


**पल्लवी मधुराचं घर शोधत आहे.**


**पल्लवी** : अंबिका-सदन कुठे आहे ?
**व्यक्ती १** : लक्ष्मी-सदनच्या **मागे.**
**पल्लवी** : लक्ष्मी-सदन **लांब** आहे का ?
**व्यक्ती १** : नाही, **जवळच** आहे, या बिल्डिंगच्या पुढे.
(पल्लवी आता अंबिका-सदन **जवळ** येते.)
**पल्लवी** : काका, तांबे कुठे राहतात ?
**व्यक्ती २** : तांबे बी विंग **मध्ये** राहतात.
(पल्लवी आता बी विंग **जवळ** येते.)
**पल्लवी** : दादा, तांबे कुठे राहतात ?
**व्यक्ती ३** : तांबे **वर** दुसऱ्या मजल्यावर राहतात.




संवाद


## ११ "--------- कुठे आहे?" एक संवाद लिहू या.



पुढे



मागे



जवळ


लांब


मध्ये


समोर


वर


खाली

उदा॰ चेंडू कुठे आहे ? - चेंडू मध्ये आहे.

## १२ जोड्या जुळवू या.

खाली बघ आणि चाल.

तुझं ऑफिस लांब आहे का ?



पुढे वळण आहे, गाडी सावकाश चालवा.





राधा, इथे मध्ये उभी राहा.

जवळ एक शाळा आहे.

ए, वर बघ, विमान!

जरा मागे होता का ?

शब्द संपदा







**१३ मुंबईबद्दल लिहू या. (वर, खाली, उजवीकडे, डावीकडे)**




१. वर डावीकडे गेटवे ऑफ इंडिया आहे.

२. ------------------------------

३. ------------------------------

४. ------------------------------

## १४ चौकात काय दिसतंय ते सांगू या.

(इमारत, पुतळा, सायकलवाला, ट्रक, दुकानं, जाहिरात, जिलबीवाला, फळवाला, बस, मोटरसायकली)
(मागे, पुढे, जवळ, लांब, मध्ये)





१. मध्ये एक पुतळा आहे.

२. ------------------------------

३. ------------------------------

४. ------------------------------

५. ------------------------------

६. ------------------------------

७. ------------------------------

८. ------------------------------

९. ------------------------------

१०. ------------------------------

मी नेहमी ई-मेल वाचतो.

मी हल्ली डेस्कटॉप वापरत नाही. लॅपटॉप वापरते.

आता कॉम्प्युटरमुळे सगळं सोपं झालंय. झटपट कामं होतात.

मी कधी तरी फेसबुक बघते, पण ट्विटर नेहमी.

मी कधीच एक्सेलमध्ये काम करत नाही. कठीण वाटतं मला.

☐ नेहमी ☐ हल्ली ☐ आता ☐ कधीतरी ☐ कधीच नाही

मी नेहमी ऑनलाईन असते, पण हल्ली कामांसाठी. आता जॉब लागला ना!
कधीतरी चॅट करते, पण गेम खेळायला कधीच वेळ नसतो.

## १५ आता तुम्ही

| | | |
|---|---|---|
| आम्ही कधीच बोलत नाही | आता तुम्ही → | ---------------------------------------- |
| आम्ही कधीतरी बोलतो | | ---------------------------------------- |
| आम्ही आता बोलतो | | ---------------------------------------- |
| आम्ही हल्ली बोलतो | | ---------------------------------------- |
| आम्ही नेहमी बोलतो | | ---------------------------------------- |
| आम्ही कधी शांत असतो ? | | ---------------------------------------- |

## १६ तुम्ही कधी काय वाचता ?

| | नेहमी | हल्ली | आता | कधी तरी | कधीच नाही |
|---|---|---|---|---|---|
| वर्तमानपत्र | | | | | |
| एस.एम.एस | | | | | |
| ई-मेल | | | | | |
| पत्र | | | | | |
| कविता | | | | | |
| लेख | | | | | |
| पुस्तक | | | | | |
| जाहिराती | | | | | |
| ... | | | | | |



## १७ वर्गात सांगू या: तुम्ही नेहमी काय करता ? तुम्ही हल्ली काय करता ? तुम्ही कधीच काय करत नाही ?

## १८ तुला आता काय करायचंय ?

मला आता अभ्यास करायचाय. उद्या परीक्षा आहे. सारख्या किती या परीक्षा.

सागरला आणि मला आता बाहेर जायचंय. पार्टीला. आज त्याचा वाढदिवस आहे.

काहीही नाही.

मला भूक लागलीय. मला जेवायचंय.

मला बँकेत जायचंय. पैसे भरायचेत.

भरपूर गृहपाठ आहे. खूप लिहायचंय मला.

उद्या आणि परवा मला एका कार्यशाळेत जायचंय. मला सादरीकरण करायचंय. तयारी करायचीय.

**थोडक्यात**

वाचणे → वाच + आयचे + आहे → वाचायचे आहे

**पण**

येणे → यायचे आहे
देणे → द्यायचे आहे
घेणे → घ्यायचे आहे
पिणे → प्यायचे आहे
लिहिणे → लिहायचे आहे

| उदा. शिक्षक/शिक्षिका | उदा. शिक्षक/शिक्षिका |
|---|---|
| बसणे | बसायचे आहे |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| उठणे | उठायचे आहे |
| येणे | यायचे आहे |
| जाणे | जायचे आहे |
| घेणे | घ्यायचे आहे |
| लिहिणे | लिहायचे आहे |
| जेवणे | जेवायचे आहे |
| खाणे | खायचे आहे |
| चालणे | चालायचे आहे |
| पोहणे | पोहायचे आहे |
| ... | ... |

| उदा. शिक्षक/शिक्षिका | उदा. शिक्षक/शिक्षिका |
|---|---|
| नृत्य | मला नृत्य शिकायचे/चं आहे. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| नृत्य | मला शिकायचे/चं आहे. |
| गायन/गाणे | मला गायन/गाणे शिकायचे/चं आहे. |
| पोहणे | मला पोहायला शिकायचे/चं आहे. |
| स्वयंपाक करणे | मला स्वयंपाक करायला शिकायचे/चं आहे. |
| गाडी चालवणे | मला गाडी चालवायला शिकायचे/चं आहे. |
| मराठी बोलणे | मला मराठी बोलायला शिकायचे/चं आहे. |
| ... | ... |

| उदा. शिक्षक/शिक्षिका | उदा. शिक्षक/शिक्षिका |
|---|---|
| तुला आता काय करायचं आहे ? | मला अजून तयारी करायची आहे. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| बॅग भरणे | मला अजून बॅग भरायची आहे . |
| ई-मेल पाठवणे | मला अजून ई-मेल पाठवायचा आहे . |
| पैसे भरणे | मला अजून पैसे भरायचे आहेत . |
| गृहपाठ करणे | मला अजून गृहपाठ करायचा आहे. |
| वर्तमानपत्र वाचणे | मला अजून वर्तमानपत्र वाचायचं आहे. |
| ... | ... |

व्याकरण

सराव

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| फुटबॉल | मला फुटबॉल शिकायचा आहे. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| फुटबॉल | मला फुटबॉल शिकायचा आहे. |
| कॉम्प्युटर | मला कॉम्प्युटर शिकायचा आहे. |
| पिआनो | मला पिआनो शिकायचा आहे. |
| अभिनय | मला अभिनय शिकायचा आहे. |
| ... | ... |



| | लिहिताना | बोलताना |
|---|---|---|
| तो पेपर | वाचायचा आहे. | वाचायचाय |
| ते पेपर | वाचायचे आहेत. | वाचायचेत |
| ती कादंबरी | वाचायची आहे. | वाचायचीय |
| त्या कादंबऱ्या | वाचायच्या आहेत. | वाचायच्यात |
| ते पुस्तक | वाचायचे आहे. | वाचायचंय |
| ती पुस्तके | वाचायची आहेत | वाचायचीयेत |

## १९ खालील ई-मेल वाचू या आणि योग्य उत्तरे लिहू या.

ताईस,

कशी आहेस? मी ठीक. अगं, इथे खूप कामं असतात. सगळं एकट्यावरच पडतं ना! आताच बघ, मला मोठं पत्र लिहायला वेळ नाही. मला बाजारात जायचं आहे (जाणे). भाज्या ----------------- ----------------- (घेणे). मग मित्राला ------------------ ----------- (भेटणे). घरी येऊन स्वयंपाक --------------------- -------------- (करणे). घर ------------------ --------------- (आवरणे). आणि ढीगभर पुस्तकं --------------------- --------------- (वाचणे). अमेरिका आणि इथला अभ्यास... उद्या फोन करतो.

तुझाच अभी.

## २० रिकाम्या जागा भरू या.

अ. ★ अरे, काय यार, मला आता क्लासला जायचंय (जाणे). कंटाळा आलाय खूप.

○ मग दांडी मार.

आ. ★ काय ------------------ (खाणे) ?

○ खायला नको काही. मला कॉफी -------------------- (पिणे)

इ. पैसे कुठे ------------------------ (भरणे) ?

ई. तुला ई-मेल --------------------- (पाठवणे). तुझा ई-मेल आय.डी. काय आहे ?

उ. दर दिवशी नवीन काय --------------------------- (करणे) खायला ?

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>तुला काय वाचायचंय ? | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>मला वर्तमानपत्र वाचायचंय. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| ई-मेल | मला ई-मेल वाचायचाय. |
| पुस्तक | मला पुस्तक वाचायचंय. |
| कादंबरी | मला कादंबरी वाचायचीय. |
| लेख | मला लेख वाचायचाय. |
| कविता | मला कविता वाचायचीय. |
| ग्रंथ | मला ग्रंथ वाचायचाय. |
| जाहिरात | मला जाहिरात वाचायचीय. |
| एस.एम.एस | मला एस.एम.एस वाचायचाय. |
| ... | ... |

## २१ योग्य रूप निवडू या आणि वाक्ये पुन्हा लिहू या.

अ. चला, उठा, अभ्यास करायचीय / करायचाय / करायचंय.

--------------------------------------------------------------------------------

आ. मला हे काम आजच संपवायचाय / संपवायचंय / संपवायचीय.

--------------------------------------------------------------------------------

इ. उद्या ही पत्रं पाठवायचीयत / पाठवायचेयत / पाठवायच्यात.

--------------------------------------------------------------------------------

सराव

ई. कुठला खेळ खेळायचंय / खेळायचाय / खेळायचीय ?

-----

उ. तुला कुठलं पुस्तक वाचायचंय / वाचायचीय / वाचायचाय ?

-----

ऊ. अरे आजच द्यायचंय / द्यायचाय / द्यायचीय ना तो चेक ? मी विसरलेच.

-----



## करा आणि शिका

१. तुम्हाला तुमचा वाढदिवस साजरा करायचा आहे. त्यासाठी काय काय करायचंय त्याची यादी करा.
२. तुमचा वाढदिवस तुम्ही कसा साजरा करता ? पाच वाक्य लिहा.
३. तुमचा आवडता सण तुम्ही कसा साजरा करता ? पाच वाक्य लिहा.

## वाचू या ... चिंटू.




## म्हणी / वाक्प्रचार

करायला गेलो एक आणि झालं भलतंच.
देव लागला द्यायला, पदर नाही घ्यायला.



## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो हवालदार (ते) | ती फेरी (त्या फेऱ्या) | ते बागकाम (ती बागकामे) |
| तो ट्रक (ते) | ती इस्त्री (त्या इस्त्र्या) | |
| तो लेख (ते) | ती इमारत (त्या इमारती) | |
| तो पत्ता (ते पत्ते) | | |
| तो सण (ते सण) | | |
| तो वाढदिवस (ते -) | | |

| क्रियापद | विशेषण | शिष्टाचार शब्द | इतर शब्द | |
|---|---|---|---|---|
| गप्पा मारणे | फावला | यायचं हं | मागे | उजवीकडे |
| संपवणे | | नक्की या | पुढे | डावीकडे |
| साजरा करणे | | | लांब | नेहमी |
| | | | जवळ | हल्ली |
| | | | मध्ये | आता |
| | | | वर | कधी तरी |
| | | | खाली | कधीच नाही |



## आता मला हे येतं.

**आवडनिवड सांगणे आणि विचारणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**शुभेच्छा देणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**वाढदिवस सांगणे, विचारणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**वाढदिवसाचे आमंत्रण करणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**होकार वा नकार देणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी



## Photo Credits - Cover Page

| | |
|---|---|
| | Gabriele Siebert |
| Christopher | Tanya Mehta |
| John Kennedy | Sebastian Griese |
| Kimberly Rodricks | Aasim Khan |
| Mugdha Sharma | Shashank Mishra |
| | ... |

## Photo credits

| | |
|---|---|
| Nesen Ertugrul | Amol Kunjir |
| Ameya Poyrekar | Anuja Korde |
| Ashok Korde | Arvind Basutkar |
| Nidhi Patankar | Asha Kelkar |
| Narayan Kelkar | Bandhu Chavan |
| Arvind Nair | Bhakti Keni |
| Shripad Kale | Devang Tayde |
| Ketaki Siddhaarth | Gauri Kelkar |
| Vaishnavi Rane | Jara Schmidt |
| Prashant Samant | Kaivalya Nerurkar |
| Purvesh Unhalrkar | Manisha Kelkar |
| Padma Korde | Maria Imada |
| Saroj Mehta | Mugdha Deosthali |
| Prathamesh Kanawaje | Namrata Darekar |
| Aditi Ranade | Ninad Patil |
| Prachita Kanawaje | Omkar Dalavi |
| Saurabh Bhosale | Pallavi Korde |
| Sharad Korde | Pooja Samant |
| Trisha Fernandis | Prachi Kelkar |
| Rama Gadre | Prajakta Deshpande |
| Namrata Kelkar | Pranjali Kargutkar |
| Jayesh Mhatre | Rahul Korgaokar |
| Chintamani Jog | Rajas Deshpande |
| Nikita Deshpande | Raman Jeejha |
| Rashi Patankar | Ritika Gondhalekar |
| Eva Kaufmann | Saba Zafar |
| Sayli Patil | Samata Patil |
| Yash Desai | Sanjay Bhatia |
| Nandini Kelkar | Sarah Egger |
| Julia Twesten | Sarthak Korde |
| Bhakti Korde | Soham Thakur |
| Juilee Ghadge | Usha Kelkar |
| Urja Deshpande | Vedashree Patil |
| Ajay Chavan | ... |

# NOTE

## NOTE

- Marathi textbook for beginners' level 1:

  Communicative texts, poems, exercises, pattern drills, do/play & learn, idioms & proverbs, cartoons, overview, self-evaluation
- An integrated communicative approach
- Systematic and effective learning of the Language
- For young & adult learners
- For classroom study as well as self-learners
- Language skills: understanding, speaking, reading, writing Marathi

**The set contains:**

1. A Textbook
2. A Workbook
3. A DVD (with audio & audio-visual content)
   Online access link: https://mu.ac.in/mymarathi1

Publisher:
**Granthali**
Woolen Mill Municipal School,
Gr. Floor. J. K. Sawant Marg,
Near Yashwant Natya Mandir,
Matunga (West), Mumbai 400016
Tel.: 022 2421 6050 / 2430 6624
Email: granthali01@gmail.com

Printer:
**India Print Works**
India Print House,
42, G. D. Ambekar Marg,
Wadala, Mumbai 400031

ISBN 978-93-84475-07-9

9 789384 475079 >

Price: Rs. 1250 | 25 USD | 20 EUR
(For the complete set of Textbook + Workbook + Free DVD)

**University of Mumbai**

**Join us on Facebook:** https://www.facebook.com/LearnMarathiAtMumbaiUniversity